रविवार, 22 मे 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 263
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SUNDAY 22 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-263 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5

# पेट्रोल ९.५ तर डिझेल ७ रुपयांनी स्वस्त

## सर्वसामान्यांना मोठा दिलासा : केंद्राने कमी केला अबकारी कर

आधुनिक केसरी न्यूज

**नवीदिल्ली : पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींवरून सुरू असलेल्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने या उत्पादनांवरील अबकारी कर कमी करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. शनिवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ट्विट करून यासंदर्भात माहिती दिली आहे. जनतेला दिलासा देत केंद्र सरकारने शनिवारी पेट्रोल-डिझेलवरील अबकारी करात कपात केली आहे. ही माहिती देताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या, आम्ही पेट्रोलवरील केंद्रीय उत्पादन शुल्क प्रति लिटर ८ रुपये आणि डिझेलवर ६ रुपये प्रति लिटरने कमी करत आहोत. यामुळे पेट्रोलचे दर प्रतिलिटर ९.५ रुपये आणि डिझेलचे दर ७ रुपयांनी कमी होणार आहेत.**

याशिवाय, केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या ९ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना प्रति गॅस सिलेंडर (१२ सिलेंडरपर्यंत) २०० रुपये सबसिडी देण्याची घोषणा केली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, यामुळे आपल्या माता-भगिनींना मदत होईल.

एकामागून एक केलेल्या १२ ट्विटमध्ये अर्थमंत्र्यांनी अनेक उत्पादनांवरील अबकारी, कस्टम, आयात आणि निर्यात शुल्क कमी करण्याबाबत माहिती दिली आहे. आमची आयात अवलंबित्व जास्त असलेल्या प्लास्टिक उत्पादनांसाठी आम्ही कच्चा माल आणि मध्यस्थांवर सीमाशुल्क देखील कमी करत आहोत. यामुळे अंतिम उत्पादनांची किंमत कमी होईल. त्याचप्रमाणे आम्ही कच्चा माल आणि मध्यस्थ यांच्या किंमती कमी करण्यासाठी लोखंड आणि पोलाद यांच्यावरील सीमाशुल्क कमी करत आहोत. काही स्टील कच्च्या मालावरील आयात शुल्क कमी केले जाईल. मात्र, काही पोलाद उत्पादनांवर निर्यात शुल्क आकारण्यात येणार आहे, असे सीतारमण यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.



### प्लास्टिकवरील कस्टम ड्युटीही कमी

सीतारामन म्हणाल्या की, ज्या प्लास्टिक उत्पादनांवर आमची आयात अवलंबित्व जास्त आहे त्यांच्यासाठी आम्ही कच्चा माल आणि मध्यस्थांवर कस्टम ड्युटी कमी करत आहोत. काही स्टील कच्च्या मालावरील आयात शुल्कही कमी केले जाईल. काही स्टील उत्पादनांवर निर्यात शुल्क आकारले जाईल. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, सिमेंटची उपलब्धता सुधारण्यासाठी नियम लागू केले जात आहेत आणि सिमेंटची किंमत कमी करण्यासाठी उत्तम लॉजिस्टिकचा अवलंब केला जात आहे.

### चर्चेतली बातमी

## बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी ओम प्रकाश चौटाला दोषी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** हरयाणाचे माजी मुख्यमंत्री ओम प्रकाश चौटाला यांना बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने दोषी ठरवले आहे. शनिवारी झालेल्या सुनावणीवेळी ओम प्रकाश चौटाला कोर्टात हजर होते. आता 26 मे रोजी कोर्टात ओम प्रकाश चौटाला यांच्या शिक्षेवर सुनावणी होणार आहे. या प्रकरणातील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद संपल्यानंतर दोन दिवसांपूर्वी दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने निकाल राखून ठेवला होता.

26 मार्च 2010 रोजी सीबीआयने माजी मुख्यमंत्री ओम प्रकाश चौटाला यांच्याविरोधात कोर्टात आरोपपत्र दाखल केले होते. ओम प्रकाश चौटाला यांनी 1993 ते 2006 या कालावधीत 6.09 कोटी रुपयांची मालमत्ता कथितरित्या जमा केली आहे, जी त्यांच्या वैध उत्पन्नापेक्षा खूपच जास्त आहे. दुसरीकडे, ओम प्रकाश चौटाला यांचे कुटुंबीय नेहमीच त्यांच्यावरील आरोपांना राजकीय हेतूने केल्याचे म्हणत होते.

# वादळी वाऱ्यासहित आलेल्या तुफान पावसाने बिहारला झोडपले

आधुनिक केसरी न्यूज

**पटणा :** भीषण उष्णतेच्या समस्येला तोंड देणाऱ्या बिहारमध्ये शुक्रवारी अचानक मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. वादळी वारे, मेघगर्जनेसहीत बिहारमधील अनेक भागांमध्ये पाऊस पडला. काही तासांच्या या पावसामुळे मोठे नुकसान झाले असून वीज पडल्याने तसेच वादळी पावसाच्या तडाख्याने १६ जिल्ह्यांमध्ये ३३ जणांचा मृत्यू झाला. बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतची घोषणा केली. मृतांच्या नातेवाईकांना सरकारकडून प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत देणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. बिहारमधील या आस्मानी संकटासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही खेद व्यक्त करतानाच, मदतीचे आश्वासन दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बिहारमधील वादळी पावसामुळे आणि वीज पडून मृत्यूमुखी पडलेल्या लोकांना श्रद्धांजली अर्पण करताना घडलेल्या घटनेबद्दल खेद व्यक्त केलाय. मोदींनी ट्विटरवरुन या घटनेसंदर्भात खेद व्यक्त करताना बिहारमधील या घटनांमुळे फार दुःख झाल्याचे म्हटले आहे. देव मृतांच्या नातेवाईकांना हे दुःख सहन करण्याची ताकद देवो, अशी प्रार्थनाही मोदींनी केली. राज्य सरकारच्या नेतृत्वाखाली स्थानिक प्रशासन मदत कार्य करत असल्याचंही मोदींनी म्हटले.

# एकतर्फी प्रेमातून विद्यार्थिनीची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहर खुनाच्या घटनांनी हादरले आहे. गेल्या 24 तासात शहरात दोन खुनाच्या घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. शहरातील रेल्वे स्टेशन भागात भरदिवसा कॉलेजजवळ तरुणीची भोसकून हत्या झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. एकतर्फी प्रेमातून ही हत्या करण्यात आल्याचा अंदाज वर्तवला जात असून घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहे. ग्रंथी सुखप्रीत कौर प्रितपालसिंग (वय 22 वर्षे) असे मृत हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीबीएच्या प्रथम वर्गात शिकत असलेल्या ग्रंथीचा आज देवगिरी महाविद्यालयाच्या पाठीमागील भागात मृतदेह आढळून आला आहे. तर या तरुणीच्या अंगावर जखमा पाहायला मिळून आले आहेत. धारदार शस्त्राने तिची हत्या करण्यात आल्याचे बोलले जात आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकतर्फी प्रेमातून हा खून करण्यात आल्याचा अंदाज आहे. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी दाखल झाले असून आरोपीच्या शोधात पथक तैनात करण्यात आले आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी शहरातील नारेगाव भागात एका तरुणीचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच आज पुन्हा एका तरुणीचा खून झाल्याने शहर हादरले आहे.

हत्या झालेली मुलगी आणि आरोपी दोन्ही एकाच समाजातील असून दोन्ही एकमेकांना चांगले ओळखत होते. खुनाची घटना समोर येताच पोलिसांचे चार पथक आरोपीच्या शोधात रवाना करण्यात आले आहे. तर मुलीचा मृत्तदेह उत्तर तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठवण्यात अली आहे.

# रस्ता खचल्याने यमुनोत्री महामार्ग पुन्हा बंद; हजारो यात्रेकरू अडकले

आधुनिक केसरी न्यूज

**ऋषिकेश :** उत्तरकाशी जिल्ह्यातील स्यानाचट्टी आणि रणचट्टी दरम्यानचा रस्ता खचल्याने यमुनोत्री महामार्ग शुक्रवारी संध्याकाळी पुन्हा मोठ्या वाहनांसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे यमुनोत्री परिसरात हजारो प्रवासी अडकले. दामटा ते जानकीचट्टी दरम्यानही सर्व प्रवासी यमुनोत्री महामार्ग कधी उघडण्याची वाट पाहत आहेत. राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता राजेश पंत म्हणाले, रस्ता लवकरच खुला केला जाईल.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, यमुनोत्री मंदिराकडे जाणाऱ्या महामार्गाची सुरक्षा भिंत कोसळल्याने सुमारे १०,००० लोक अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाली असून, महामार्गालगत विविध ठिकाणी १० हजार लोक अडकल्याचे सांगण्यात येत आहे. रस्ता पुन्हा खुला होण्यासाठी ३ दिवस लागू शकतात. जिल्हा प्रशासन काही छोट्या वाहनांमधून प्रवाशांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र मोठ्या वाहनांमध्ये दूरवरून आलेल्या लोकांना बाहेर पडता आलेले नाही.

**हरिद्वार आणि ऋषिकेशमध्ये अनेक प्रवासी अडकले**

चारधाम यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंची ऑफलाइन नोंदणी बंद करण्यात आली आहे. नोंदणीशिवाय यात्रेकरूंना ऋषिकेशच्या वर जाऊ दिले जात नाही. अशा स्थितीत




ऋषिकेश, हरिद्वारसह परिसरात साडेनऊ हजार यात्रेकरू अडकून पडले आहेत. सर्वांनी हॉटेल, धर्मशाळा, लॉजमध्ये आश्रय घेतला आहे, त्यामुळे ऋषिकेश आणि हरिद्वार पूर्णपणे खचाखच भरले आहेत.

**आता ऑफलाइन नोंदणीची कडक प्रणाली**

पर्यटन विभागाने ऑफलाइन नोंदणीची व्यवस्था अधिक कडक केली आहे. आता ऑफलाइन नोंदणी आठवडाभरासाठीच होईल, असे पर्यटन सचिवांनी सांगितले. एका आठवड्यापेक्षा जास्त काळाची नोंदणी करण्यात येणार नाही.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# देखो रुठा ना करो ...

आधुनिक केसरी

पुणे तेथे काय उणे असे म्हणतात ते उगीच नाही. झालं असं की परवाच्या दिवशी ( हा ' परवाच्या दिवशी ' फार सोयीस्कर शब्द आहे बरं का ! यात खरोखरच्या परवाच्या दिवसापासून तो थेट आठवडा, पंधरवडा एवढंच काय वर्ष दोन वर्ष देखील खपून जातात. ही गोष्ट नक्की केव्हा घडली हे सांगण्याची आवश्यकता राहत नाही. ) पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी एक पत्रकार परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी जे काही सांगितले ते अतिशय महत्वाचे आहे. अशा पद्धतीने आजपर्यंत ( आणि तेही एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने अधिकारवाणीने सांगणे )कोणी सांगितले नव्हते.

ते म्हणाले, " नवरा बायकोच्या भांडणाच्या खूप तक्रारी आमच्याकडे येतात. पण माझ्या मते सगळ्या पुरुषांनी जर आपल्या बायकांचे ऐकले तर भांडणे होणार नाहीत. " तात्पर्य म्हणजे असा सल्ला त्यांनी समस्त पुरुष वर्गाला दिला आहे. पण त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीने देखील हे सांगावे म्हणजे त्यात निश्चितपणे काही तरी अर्थ असलाच पाहिजे असा अर्थ आमच्या सुमार बुद्धीनुसार आम्ही काढला. अर्थात तुम्हाला म्हणून सांगतो आम्ही आयुष्यभर हेच करत आलो आहोत. आमच्यात भांडणे नाहीत असे नाही. पण शेवटी आम्ही आमची चूक मान्य करून माघार घेतो. त्यामुळे एवढी वर्षे झाली तरी आमचा सुखी संसार सुरु आहे. खरे तर वारंवार घटस्फोट घेणाऱ्या पाश्चात्य लोकांनी आमच्याकडे येऊन काही दिवस प्रशिक्षण घ्यायला हरकत नाही. मागे एकदा एक किस्सा वाचलेला आठवतो. बहुधा अकबर बिरबलाच्या गोष्टीतला असावा. एकदा दरबारात प्रश्न विचारला जातो की आपल्या पत्नीच्या आज्ञेत कोण कोण आहेत त्यांनी हात वर करा. तेव्हा अगदी बादशहापासून सगळी मंडळी हात वर करतात. पण एका कोपऱ्यात एक गरीब फाटका माणूस हात वर न करता उभा असलेला त्यांना दिसतो. सगळ्यांनाच त्याचे मोठे आश्चर्य आणि कौतुक वाटते. त्याच्या धैर्याचा हेवा वाटतो. बादशहाला तर वाटते की आपण बादशहा असूनही काय कामाचे ? हा सामान्य माणूस आपल्यापेक्षा लाख पटीने श्रेष्ठ. तेव्हा सगळे खोदून खोदून त्याला त्याच्या वागण्याचे रहस्य विचारतात. तेव्हा तो सांगतो, ' माझ्या पत्नीनेच मला असे सांगून ठेवले आहे की जेव्हा असा काही प्रश्न तुला विचारेल तेव्हा तू नाही म्हणून सांगायचे. ' घ्या, आता काय बोलणार ?

आणखी एक मजेदार किस्सा आठवला. पुरुष हा लग्नापूर्वी वाघ असतो. तो लग्नानंतर देखील वाघच असतो. फक्त त्या वाघावर दुर्गादेवी स्वार होते. मग दुर्गादेवीची आरती म्हणण्यावाचून गत्यंतर नसते. ' दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी...' असो. **(क्रमशः)**




# आनंदी पहाट

## मूल्यशिक्षणाची गरज

आधुनिक केसरी

शिक्षणामुळे आपली भावनिक बुद्धिमत्ता सुधारते, आपण एक चांगले नागरिक, चांगली व्यक्ती बनू शकतो. अधिक समजूतदार, दयाळू, आत्मनिर्भर, इतर कोणाच्याही आधी स्वतःवर प्रेम करणारे बनत असतो, म्हणजेच शिक्षणाने जीवन चांगले बनते. एखाद्या व्यक्तीने आपले ज्ञान आणि कौशल्ये अशा प्रकारे विकसित केले तर ती व्यक्ती शिक्षित मानली जाऊ शकते ज्याचा परिणाम समाज जीवनात त्या व्यक्तीच्या सकारात्मक योगदानात होतो. ज्ञान मिळवून त्याचा उपयोग समाजाच्या सुखासाठी आणि चांगुलपणासाठी केल्याने माणूस खऱ्या अर्थाने शिक्षित बनतो. विद्यार्थ्यांच्या जन्मजात बौद्धिक क्षमता विकसित करण्याच्या पुरेशा संधी शिक्षणाद्वारे उपलब्ध करून देतात, शिक्षणाद्वारे बुद्धीमत्तेच्या विकासामुळे मुलांना आत्मविश्वासाने स्वतंत्र जीवन जगता येऊ शकते. हे त्यांना जगण्याचा सर्वोत्तम मार्ग शिकवते, ज्या व्यक्ती तसेच त्यांच्या सभोवतालच्या लोकांसाठी फायदेशीर ठरू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांना अधिकाधिक जबाबदार आणि समंजस बनण्यास मदत करते. हे त्यांना जीवनाचा दृष्टीकोन चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि जबाबदार नागरिक म्हणून यशस्वी जीवन जगण्यास मदत करते. शिक्षणाने मुलांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, कारण नैतिक मूल्ये केवळ व्यक्तीच नव्हे, तर संपूर्ण मानव बनविण्यास मदत करतात. ती मुल्ये त्यांना त्यांच्या भविष्यातील भूमिकेसाठी तयार करते. नैतिक मूल्याचा अभाव हे भ्रष्टाचाराचे मूळ कारण आहे. चांगली अभ्यास कौशल्ये आपला आत्मविश्वास, क्षमता आणि आत्मसन्मान वाढवू शकतात. ते चाचण्या आणि मुदतीबद्दलची चिंता देखील कमी करू शकतात. प्रभावी अभ्यास कौशल्ये विकसित करून, आपण अभ्यासात घालवलेल्या तासांची संख्या कमी करू शकतो, आपल्या आयुष्यातील इतर गोष्टींसाठी जास्त वेळ काढू शकतो.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

**भाग-23**

# सोबत जेवू या....

दिवसभर सगळ्यांची धावपळ व घाई असते. त्यामुळे रात्री सोबत जेवण केलेच पाहिजे. खूप फायदे होतात. जेवताना कोणी चुकत असेल तर लक्षात येते कोण किती?? व काय??? जेवतात ते पाहिल्या जाते. म्हणजे आवडीनिवडी कळतात. एखाद्याला न आवडणारी भाजी दुसरे खातात .त्या व्यक्तीला त्याच्या आवडीची भाजी मिळते. जेवताना गप्पा होतात. गप्पांच्या ओघात जेवण कधी संपले कळतही नाही. आणि एकत्र जेवल्याने खूप आनंद मिळतो. गृहिणीचा आनंद तर दुप्पट वाढतो. जेवतांना कधी काय विषय निघेल आणि त्यावर किती गप्पा होतील सांगता येत नाही. पण जेवताना विषय चांगलाच असावा. उगाच कोणाच्या दुःखावर फुंकर नको. जेवताना विषय हलकाफुलका असावा .गहन विषय नको .कारण जेवताना आनंदी राहावं .जेवण चांगले पचते. काहींना जेवताना तिखट विषय काढायची सवय असते. तिखट नको गोड विषय काढा .जेवण सुद्धा गोड होईल. गप्पा होतील. एकूणच सारं गोड होईल. जेवणात काय पदार्थ आहेत ते कसे बनवले? भाज्यांची ओळख ही सर्व माहिती मुलांना सुद्धा होते. कधीकधी जेवतांना भाजी छान झाली तर मुलं विचारतात सुद्धा. कुठून आणली? कशी बनवली? कोणी बनवली? तुला येत होती का? ती कोणी शिकवली? मग आईचा त्यावर छान पाल्हाळ लावून सविस्तर माहिती सांगणं... तिचा तो निखळ आनंद काही औरच असतो. आणि सगळे एकत्र जेवले तर आईला होणारा आनंद गगनापेक्षा मोठा असतो. जेवताना आई एखादा श्लोक सुद्धा म्हणायला लावतेच. तेव्हा कृपया सर्वांनी एकत्र जेवण करूया....

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी

**जाड्यं ह्रीमिति गण्यते व्रतरूचैर्दम्भः शुचौ कैतवं**
**शूरे निर्घृणता मुनौ विमतिता दैन्यं प्रियालापिनि।**
**तेजस्विन्यवलिप्तता मुखरता वक्तर्यशक्तिः स्थिरे**
**तत् को नाम गुणो भवेत् स गुणिनां यो दुर्जनैर्नाङ्कितः।।**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अर्थ :** दुर्जन लोक गुणी जनांच्या लज्जेला मूर्खता, व्रताच्या आवडीला दंभ, शुद्धतेला कपट, शौर्यास निर्घृणता, विचारशीलतेस बुद्धीचा अभाव, सुन्दर अर्थात मधुर वाणीला दीनता, तेजस्वितेला गर्व, वाक्पटुत्वाला मुखरता, स्थिरतेला दुर्बलता असे उल्लिखित करतात. गुणवानाचा असा कोणता गुण असतो, ज्यावर दुर्जनांद्वारे बोट दाखविले जात नाही? अर्थात सज्जनांच्या सर्व गुणांना दुर्जन दोष म्हणूनच प्रस्तुत करीत असतो. या जगात अशी कोणती वस्तु आहे, जी दुर्जनांना वाईट दिसत नाही? आणि अशी कोणती वस्तु आहे, जी सज्जनांना चांगली दिसत नाही? खरे तर हा फरक सज्जन आणि दुर्जन यांच्या दृष्टिकोनांमधील असतो. दुर्जन लोक सज्जनांच्या प्रत्येक गुणात कशाप्रकारे दोष पाहतात; याचे विवेचन कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात केले आहे.

# अट्टाहासाने नामस्मरण करावे

नामाइतके सूक्ष्म आणि स्थूल साधन नाही. एखादी गोष्ट अगदी कळकळीने सांगायची झाली म्हणजे 'अगदी बेंबीच्या देठापासून सांगतो' असे आपण म्हणतो. त्याप्रमाणे नामही बेंबीच्या देठापासून घ्यावे, कारण सर्व वासनांचा उगम तिथेच अहे. आपण नामाची वस्ती तिथे ठेवून दिली म्हणजे आपोआप वासनाक्षय होईल. उगीच वरवर नामस्मरण करू नये. ते अट्टाहासाने आणि अंतःकरणपूर्वक घ्यावे, यातच खरे हित आहे. आता वासनाच मेली तर आम्ही विषय कसे भोगू, याची नाही काळजी करू.

भगवंताची सत्ता जाणली की त्याला सहज जाणता येते. जो जाणेल भगवंत त्याला म्हणावे संत. आपण खेड्यात गेलो की तिथले सभ्य आणि प्रतिष्ठित कोण याची चौकशी करतो. पाटील आम्हाला दिसतो, लोक सांगतात, म्हणून आम्ही त्याची भेट घेऊ शकतो. पण परमात्मा निर्गुण, निराकार, त्याची ओळख कशी करून घ्यावी कळत नाही. आम्हाला कळत नाहीत त्या सर्वच गोष्टी आम्ही कधी खोट्या मानतो का ? आपल्याला असणारी तळमळ ही भगवंताची म्हणजे पूर्णत्वाची तळमळ आहे. नास्तिकाचासुद्धा पूर्णत्वाकडे ओढा असतो. तेव्हा या तळमळीला भगवंत हेच औषध आहे. कोणतीही



गोष्ट तळमळी वाचून चांगली होत नाही. प्रत्येक जीवाला तळमळ आहे खरी,पण ती कशासाठी हवी ते चुकले. ती तळमळ विषयाकडे गेल्याने जीवाला खरे समाधान मिळत नाही. आपला जन्म वासनेत होतो, म्हणून वासनातृप्तीची तळमळ स्वाभाविक लागते. तिकडून काढून ती भगवंताकडे लावणे, यात माणसाची खरी कर्तबगारी आहे. काय केले तर मी भगवंताचा होईन, अशी तळमळ लागावी. ती न लागली तर आपले चुकले, वासनेच्या मागे जाणारी तळमळ भगवंताकडे लावण्यासाठीच सगळी साधने आहेत. तळमळ निर्माण झाली की भगवंत हात देतो. जगामध्ये असे कोणतेही दुःख नाही, की जे भगवंताच्या आनंदाला विरजण घालील. प्रत्येकाला आनंद पाहिजे आहे, आनंद हेच भगवंताचे स्वरूप आहे, तर मग त्याचा अभ्यास करण्याचे काय प्रयोजन ? तर त्याचे कारण हेच, की आपल्याला भगवंताची विस्मृती झाली आहे. भगवंत हा प्रेममूर्ती आहे, म्हणून मंदिरात जिकडे तिकडे प्रेम भरून टाकावे. दुसरा काय करतो हे न पाहता, आपण काय करायला पाहिजे याचा अगोदर विचार करावा.

**आजचे बोधवचन :** १४२. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. भगवंताकडे लक्ष लागले की आत्मज्ञान आपोआप होते.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# महाभारत

आधुनिक केसरी


महाभारतात असे म्हंटले आहे की सुमारे ८०% मनुष्यबळ युद्धाच्या अठराव्या दिवशी मृत्युमुखी पडले होते. जेव्हा युद्ध संपले तेव्हा संजय युद्ध झाले तिथे म्हणजेच कुरुक्षेत्राच्या मैदानात आला. त्याचा मनात शंका आलेली होती की हे युद्ध खरंच झाले आहे का? खरंच एवढा मोठा नरसंहार झालेला आहे का? ती हिच जागा आहे का जिथे सामर्थ्यवान पांडव आणि भगवान श्रीकृष्ण उभे होते? ही तीच जागा आहे का जिथे श्रीमद् भगवत गीता सांगितली गेली? हे सगळे खरंच झाले आहे की मला तसा भ्रम होतोय?

"तुला कधीच ह्याचे सत्य माहित होणार नाही !", एक शांत वयोवृद्ध आवाज त्याचा कानी पडला. संजयने आवाज आलेल्या दिशेला पाहिले तर त्याला एक साधू तिथे दिसला. साधू हलक्या आवाजात परत म्हणाला, "मला माहित आहे तू इथे कुरुक्षेत्राचे युद्ध खरंच झाले आहे का ? ते पाहायला आला आहेस. परंतू तुला ह्या युद्धाबद्दल सत्य कधीच समजणार नाही जोपर्यंत तुला खरे युद्ध कसले होते ते कळणार नाही."

संजय म्हणाला, "म्हणजे ?"

साधू म्हणाला, "महाभारत हे एक महाकाव्य आहे - एक वास्तवीकता आहे परंतू त्यापेक्षा अधिक ते एक तत्वज्ञान आहे." आणि एवढे सांगून तो हसू लागला.

साधूचे हसणे पाहून संजय अजून जास्त भ्रमित झाला आणि विनंती करू लागला की, "मला तुम्ही ते तत्त्वज्ञान सांगू शकतात



का?"

साधू ते तत्वज्ञान सांगू लागला, पांडव म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपले ५ ज्ञानेंद्रिये आहेत. डोळे (दृश्य), कान (आवाज), नाक (गंध), जीभ (चव) आणि त्वचा (स्पर्श). आणि कौरव म्हणजे १०० दुर्गुण (विषये) आहेत जे दररोज ह्या ५ पांडवांवर आघात करतात. पण आपण ह्या आघाता पासून आपल्या ५ पांडवांचे रक्षण करू शकतो.

साधू म्हणाला, "संजय, तुला सांगता येईल ह्यांचे रक्षण करणे कधी शक्य होईल ?"

"जेव्हा आपल्या रथाचे सारथी - ह्या ५ पांडवांचे मित्र भगवान श्रीकृष्ण असतील तेव्हा ?".

साधू उत्तर एकून खूप खुश झाला. तो म्हणाला, "अगदी बरोबर! श्रीकृष्ण म्हणजे आपल्या आतला आवाज, आपला आत्मा, आपला पथदर्शी प्रकाश. जर श्रीकृष्णचे आपण ऐकतोय तर आपल्याला चिंता करायची काहीही आवश्यकता नाही."

संजयला बराच मतितार्थ आता कळला होता. तरी त्याने परत प्रश्न केला,

"मग जर कौरव हे दुर्गुणच होते तर त्यांच्या बाजूने गुरु द्रोणाचार्य आणि पितामह भीष्म लढले त्याचा काय अर्थ होतो ?"

"त्याचा असा अर्थ होतो की, जसे तुम्ही लहानाचे मोठे होत जातात तुमच्यापेक्षा वयाने मोठ्या लोकांबद्दल असलेला तुमचा दृष्टीकोन बदलत जातो. जेव्हा आपण लहान असतो तेव्हा आपल्याला ते एकदम परिपूर्ण वाटतात परंतु जेव्हा आपण मोठे होऊन जातो तेव्हा आपल्याला त्यांच्यात त्रुट्या दिसायला सुरु होतात आणि एकदिवशी आपल्याला ठरवावे लागते की आपण ह्या मोठ्यांचे ऐकायचे की नाही, ह्यांनी आपले ठरवायचे की आपण स्वतःच स्वतःसाठी निर्णय घ्यायचा ! म्हणून अशा धर्मसंकटात श्रीमद् भगवत गीतेचे उपदेश महत्वाचे ठरतात."

संजयला आता सगळेच कळले होते. त्याने शेवटचा प्रश्न केला, मग कर्ण हा पांडव असून त्यांच्याच विरोधात का?"

"अरे हा ! कर्ण हा, ५ ज्ञानेंद्रिये सारखाच आपला असतो. तो आपलाच एक भाग असतो परंतू साथ देतो त्या १०० दुर्गुणांची ! हा कर्ण दुसरा तिसरा कोणी नसून आपल्या स्वतःच्या वासना असतात. हे आपल्याच असतात परंतू त्यांची मैत्री १०० दुर्गुणांशी असते. कर्णाला सारखा पश्चात्ताप होत असतो आणि तो दुर्गुणांची साथ का देतोय त्याचे सतत कारणे देत राहतो. आपली वासना पण अशीच असते - पश्चात्ताप करते आणि परत तिथेच जाते.!"

संजयच्या डोळ्यातून अश्रू येत असतात. त्याला जगातले सगळ्यांत मोठे महाकाव्य "महाभारत" खऱ्या अर्थाने समजलेले असते. तो दूरवर पसरलेल्या कुरुक्षेत्राला पाहत उभा असतो. तो साधूला नमन करण्यासाठी मागे वळतो आणि पाहतो तर त्या जागी कोणीच नसते. तो साधू दिसेनासा होतो परंतू एक गहन तत्वज्ञान तिथे ठेवून जातो...







# सामाजिक सलोख्यासाठी पत्रकारांनी पुढाकार घ्यावा : वसंत मुंडे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील ईद मिलन कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राजकारणी सत्तेसाठी सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा काळात पत्रकारांनी पुढाकार घेऊन सामाजिक सलोखा आबाधित ठेवण्यासाठी काम करणे गरजेचे आहे. पत्रकारांवर समाजाचा विश्वास आहे. त्यामुळे पत्रकारांनी या विश्वासाचा अशा सत्कार्यासाठी उपयोग करावा, असे आवाहन वसंत मुंडे यांनी केले.

औरंगाबाद येथील विभागीय कार्यालयात शनिवारी सायंकाळी आयोजित ईद मिलन कार्यक्रमात वसंत मुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. कैलास पाटील, काँग्रेसचे शहराध्यक्ष हिशाम उस्मानी, भाजपचे एजाज देशमुख, कम्युनिस्ट नेते ॲड. अभय टाकसाळ, नगरसेवक अफसर पठाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुर्व कार्याध्यक्ष तथा संपादक जावेद खान, अजमत खान, नंदकिशोर नजन, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य अशोक थोरात, माजी सभापती मारोतराव साळवे, अनवर खान, प्राचार्य नामदेव सानप, कवी, साहित्यीक श्रावण गिरी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे आदींसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग-व्यापार क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले की, सध्या




समाजात भेदभाव निर्माण करणाऱ्या काही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात सक्रीय झाल्या आहेत. वेगवेगळ्या कारणावरुन आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी समाजा-समाजात दरी निर्माण केली जात आहे. पत्रकार हा समाजाचा महत्त्वाचा घटक असल्यामुळे अशा प्रवृत्तीपासून समाजाला दूर ठेवून एकता अबाधित ठेवण्याचा प्रयत्न ईद मिलन यासारख्या कार्यक्रमातून केल्या जात आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. कोरोना महामारीमुळे पत्रकारांसोबतच समाजातील सर्वच घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पत्रकार संघ पुढाकार घेत आहे. या कार्यात समाजातील जाणकारांचे बहुमूल्य मार्गदर्शन व योगदान मिळत आहे. सामाजिक उपक्रमातून समाज प्रबोधनाची गरज लक्षात घेऊन आम्ही दिवाळी स्नेहमिलन व ईद मिलनचा उपक्रम राज्यभर राबवत आहोत. याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून या माध्यमातून समाजातील विविध समस्यांवर साधक-बाधक चर्चा होऊन मार्गही सापडू लागले आहेत. एकीकडे राजकीय विरोधकांची व्यकक्तिक मैत्री संपुष्टात येत असताना पत्रकार संघाच्या अशा कार्यक्रमातून हे विरोधक एकत्र येऊन काही काळ का होईना राजकीय विरोध विसरत आहेत. राजकारणाला बाजूला ठेऊन समाजासाठी पत्रकारांना सोबत घेऊन काय करता येईल, यावर चर्चा होऊ लागली आहे आणि आम्हालाही हेच अपेक्षित आहे. पत्रकारांनी आपआपल्या गावात असे सामाजिक सलोख्याचे उपक्रम राबविण्यावर भर द्यावा, असे आवाहनही शेवटी वसंत मुंडे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुनिल वाघमारे, आरेफ देशमुख, विभाकर खांदेवाले, विलास शिंगी, छब्बुराव ताके, मनोज पाटणी, संजय व्यापारी, संदीप मानकर, सचिन उबाळे, काजी रफिक अहेमद, अनिस रामपूरे, तय्यब जफर, अखलाख देशमुख, अर्जुन पवार, सलमान नवाब पटेल, अभय विखणकर, शेख अमीर, आकाश ठाकूर, प्रकाश लकडे, अय्युब पठाण आदी उपस्थित होते.













# विद्युत कर्मचाऱ्यांसाठी 'एक राष्ट्र, एक नियम' असावा

## अखिल भारतीय विद्युत मजदूर संघाच्या अधिवेशनात ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ऊर्जा क्षेत्र कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाचा दुवा आहे. भारतातदेखील ऊर्जा क्षेत्र गेल्या कित्येक दशकापासून आर्थिक विकासात मोठा हातभार लावत आहे. त्यामुळे भारत सरकारने २०२२ पर्यंत ऊर्जा क्षेत्रात २२७ गिगावॅट क्षमता प्राप्त करण्यासाठी रोडमॅप तयार करायला हवा. सध्या भारतात कोळशावर आधारित २०२.४१ गिगावॅट वीज अपेक्षित आहे. त्यासाठी सरकारने वीज कर्मचाऱ्यांसाठी 'एक राष्ट्र, एक ग्रीड, एक नियम' याबाबतचे धोरण आखावे, असा प्रस्ताव अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाच्या दोनदिवसीय अधिवेशनात मांडण्यात आला.

नाशिक येथील पुणे विद्यार्थी वसतिगृह संचलित देवधर अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी कार्यकारिणीकडून पाच प्रस्ताव मांडण्यात आले. त्यामध्ये 'विद्युत उत्पादन, पारेषण आणि वितरण उद्योगावर औद्योगिक त्रिपक्षीय समितीचे पुनर्गठण करणे, केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात एक संयुक्त उद्यमच्या माध्यमातून राज्य विद्युत निगम तथा कंपन्यांना मजबूत करणे, विद्युत क्षेत्रात ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्याने संघटित क्षेत्र कमी झाले असून, असंघटित क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे ठेकेदारांकडून येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर रोख लावणे, सरकारकडून उत्पादन, पारेषण आणि वितरण क्षेत्राचे होत असलेले खासगीकरण रोखणे आदी प्रस्ताव यावेळी मांडण्यात आले. अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाचे अध्यक्ष आर. मुरलीकृष्णन यांनी सर्वप्रथम प्रस्तावाचे वाचन केले. त्यानंतर महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करीत त्यास अनुमोदन दिले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरसिंह साखला उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान, विद्युत क्षेत्रापूढे येणाऱ्या आव्हानांचा तितक्याच खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी संपूर्ण जबाबदारी युवा नेतृत्वाकडे सोपवण्यात आली. यावेळी नुतन कार्यकारिणीची घोषणा करताना प्रत्येक राज्यात संघटनावर भर देण्यासाठी महामंत्रींची निवड करण्यात आली.

यावेळी महामंत्री अमर सिंह, उपमहामंत्री अरुण देवांगण, विद्युत क्षेत्राचे प्रभारी अख्तर हुसेन, केंद्रीय सचिव जयेंद्र गढवी, संघटन मंत्री विलासराव झोडगेकर, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एल.पी. कटकवार यांनी कार्यकारिणीच्या रूपरेषेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या अधिवेशनासाठी भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय संघटन मंत्री बी. सुरेंद्रन, राष्ट्रीय मंत्री रामनाथ गणेशे, भारतीय मजदूर संघाचे क्षेत्रीय संघटन मंत्री सी.व्ही. राजेश, उद्योग प्रभारी अख्तर हुसेन आणि भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि विद्युत निगम प्रभारी एल.पी. कटकवार यांनी विविध सत्रांमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन केले.

विद्युत क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्या, केंद्र व राज्य सरकारकडून घेत असलेले परस्परविरोधी निर्णय, कामगार व कामगार संघटना विरोधी पारित झालेले कायदे, शासकीय विद्युत क्षेत्रात होत असलेला संकोच आदी विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांच्यासह विविध तज्ज्ञांनी यावेळी उपस्थितांना वेगवेगळ्या सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# धर्म एवढा प्रबळ का?



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**या विश्वाच्या पसाऱ्यात मानव जातीचा इतिहास म्हणावा तर फार कमी आहे. त्यातही धर्म वगैरे गोष्टी काळाच्या परीगणनेत फारच नवीन. तरीही तो आपणास फार म्हणजे फार प्राचीन वाटतो. आजघडीला निधर्मी असणं जवळपास अशक्य आहे. कारण धर्म जगण्याची एक चौकट देतो. अनिर्बंध आयुष्याला आकार देतो. नास्तिकता आणि निधर्मीपणा वेगळ्या गोष्टी आहेत. तसेच आपण आपली चौकट संविधानाने बद्ध केली, मग धर्माची गरजच काय? हाही प्रश्न महत्त्वाचा आहे.**

वैदिक आर्य, ज्यू, पारशी यांच्या तुलनेत अलीकडील म्हणजे बौद्ध, जैन, ख्रिश्चन, इस्लाम, शीख इत्यादी धर्म तसेच जगाच्या पाठीवर असणारे हजारो संप्रदाय या सर्वांची माणसास खरंच गरज आहे का? उत्तर दोन्ही बाजूंनी देता येईल. पण नकारात्मक उत्तर वरवरचे असेल. धर्म या शब्दाची व्याप्ती फार मोठी आहे. धृति क्षमा... या व्याख्येतील दहा लक्षणे तर येतातच, सोबत चालीरीती, विधिसंकेत, अचरणविषयक नियम, विविध प्रकारच्या स्मृती, लौकिक-पारलौकिक गोष्टी याही बाबी येतात. या सर्वांच्या कडबोळ्याने धर्म प्रबळ होतो का? नाही. धर्म आपणांस इतरांपेक्षा वेगळा प्रतीत करण्याचा नेहमी प्रयत्न करतो. श्रेष्ठत्वाची भावना प्रदान करतो. व्यक्तीगत अहंला समूहिकतेशी जोडून तू एकटा नाहीस ही जाणीव सतत करून देतो. हा सामूहिक प्रबळ अहं शक्यतो माघार घेऊ देत नाही. म्हणून धर्मावर केलेली टीका ही आपल्यावरच केलेल्या टीकेसारखी भासते, म्हणून माणसांच्या धार्मिक भावना तीव्र असतात. अन्यतः या भावना तीव्र असण्याचे काहीच कारण नाही. धर्म म्हणजे काहीतरी चांगले असणे असते कारण त्याशिवाय अधर्म हा शब्दच निर्माण झाला नसता. धर्म ही अफूची गोळी असते अशा प्रकारच्या अत्यंत प्रचारकी वाक्यांमुळे चांगल्याचीही बदनामी झाली. यास दोन कारणे आहेत. ज्या गोष्टीचा पगडा पूर्ण समाजावर आहे त्यावरच हल्ला केल्याशिवाय आपली कोणी दखल घेत नाही, हा एक भाग. दुसरी गोष्ट म्हणजे धर्म आचरण करणाऱ्यांकडून निर्माण होणारा गोंधळ. खरेतर धर्मावर टीका करणाऱ्यांनी फक्त एकाच पैलूचा विचार केला. धर्म द्विमिती आयामाने चालतो. ज्ञानकांड आणि कर्मकांड. ज्ञानकांड म्हणजे त्या धर्माचे सिद्धांत, तत्त्वे, मूल्ये इ. तर कर्मकांडात सामान्य बहुजनांचे प्रत्यक्ष जगणे आणि त्यातून प्रतिबिंबीत होणारे धर्माचे अत्यंत मिणमिणते, फिकट पैलू. वास्तविक धर्मावर टीका करणाऱ्यांनी सिद्धांतावर टीका
करणे अधिक स्पृहणीय झाले असते, परंतु नंतर आलेल्या धर्मसुधारकांनी ज्ञानकांड सोडून कर्मकांडावरच जास्त भर




दिला, जो की बारा कोसावर पाणी बदलावे तसे बदलणारा असतो. यात टीकाकारांची चूक आहे का? नाही. कारण प्रत्यक्ष पृष्ठस्तरीय जिवंत वातावरण त्यांच्यासमोर हेच तर वास्तव होते. मग आचरण करणाऱ्यांची चूक आहे का? नाही. कारण जीवन जगत असताना निव्वळ पुस्तकी कसे जगता येईल.
कोणत्याच पुस्तकानुसार जगता येत नाही. म्हणून तर भारतीय जनमानसात कोणतेही एक आणि एकच पुस्तक प्रमाण नाही. त्याचे कारण यात दडले आहे. हे गमक आपण समजून घेतले पाहिजे. झरथूस्ट्रींचा अवेस्ता, ज्यूंचा जुना करार, ख्रिश्चनांचा नवा करार किंवा इस्लामचा कुराण असे भारताच्या बाबतीत आपण ठामपणे सांगू शकत नाही की, अमुकच हा ग्रंथ महत्त्वाचा किंवा पवित्र आहे. अगदी बौद्ध धर्माच्या बाबतीत सुद्धा.
खरेतर धर्म ही अत्यंत व्यक्तिगत आणि खाजगी बाब असायला हवी, नव्हे ती तशीच असते. म्हणून तर भारतात एकाच कुटुंबात विविध उपासना पद्धती दिसून येतात. ज्या व्यक्ती धर्म आपल्या स्वतःत शोधतात त्याच उर्जावान. कारण निर्मिती आणि लय या दोन्ही उर्जापूर्ण गोष्टी स्वतःत होत असल्यामुळे अशा व्यक्तींना बाह्य कोणत्याच आणि कसल्याच ऊर्जेची आवश्यकता पडत नाही. धर्मातील हा भाग प्रत्येकाने उचलला पाहिजे व सुखी झाले पाहिजे. बाह्य अवडंबर हा धर्माचा भाग असला तरी तो अत्यंत क्षुद्र समजला पाहिजे. अध्यात्मिक-सांस्कृतिक अंगाने आणि प्रापंचिक-लौकिक पध्दतीने धर्माला त्याच्या स्थापनेपासूनच कार्य करावे लागत असल्यामुळे एक तारेवरची कसरत या बाबतीत आपणांस पहावयास मिळते. धर्माची स्थापनाच मुळात भौतिकता लक्षात घेऊन झालेली असल्यामुळे त्यापासून धर्म दूर जाऊ शकत नाही. धर्म निर्माण होण्यापूर्वी या जगात संस्कृती अस्तित्वात होत्या. सर्व संस्कृतीचे मूळ पारलौकिक स्वरूपाचे असल्यामुळे धर्म स्थापनेनंतर हा भाग जसाच्या तसा धर्मात परावर्तित झाला आणि स्वतःचा भौतिक भागही सांभाळावा लागला. धर्माच्या अस्तापर्यंत हे सांभाळणे त्याचे भागदेय आहे.
खरेतर विज्ञानाच्या प्रगतीबरोबर धर्माचे प्राबल्य कमी होईल अशी भाबडी आशा अनेकांना होती, ती काही फलद्रूप झाली नाही. त्याचे कारण विज्ञान तुमचे जगणे सुसह्य करील पण का जगायचे हे मात्र धर्मच सांगेल. जन्मापासून मरेपर्यंत का व कसे याची उत्तरे देणे, व्यक्तिगत अहंचा धागा समूहाशी जोडून सकारात्मक नवनिर्माणसाठी उद्युक्त करणे, श्रेष्ठ मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना आणि संवर्धन करणे आणि सर्वांत महत्त्वाचे पूर्णांशाने माणूस घडविणे हे काम धर्माचे आहे. जोपर्यंत अशा स्वरूपाचे काम शिल्लक आहे, तोपर्यंत धर्म अस्तित्वात राहणार, यात शंका नाही.
**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत.)**

### बोंबाबोंब कशासाठी?

**या ना त्या कारणास्तव ज्या दंगली उसळतात, जाळपोळ, हिंसाचार होतो त्यास धार्मिक असे न म्हणता अधार्मिक म्हटले पाहिजे. कारण धर्म आणि नकारात्मकता या अत्यंत व्यस्त गोष्टी आहेत. संस्कार, मूल्यभान, सकारात्मकता, नवनिर्माण, आध्यात्मिकता हा धर्म तर दंगे, हिंसाचार, विधिनिषेध शून्यता, आपपर भाव, द्वेष आणि तत्सम नकारात्मक गोष्टी हा अधर्म समजावा. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे.**

# वैयक्तिक जीवनानुभवही समष्टीचे : सखी सख्यम सख्या सुख्यम...!



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**पंढरपूर येथील कवी रवी वसंत सोनार हे चांगले साहित्यिक आणि व्यक्तिमत्त्व आहे. हरहुन्नरी असे हे व्यक्तिमत्त्व सामाजिक कार्यातही रत असते. वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा छंद असलेले रवी सोनार यांनी 'युट्युब'वर नाना प्रकारचे उखाणे हा उपक्रम राबविला होता. सहजीवन किती सुखकर असते याचा अनुभव घेणारे हे जोडपे. हा परिचय करून देण्याचे कारण म्हणजे - सखी सख्यम - सख्या सख्यम...! या ललित पद्य रचना पुस्तकाचे निमित्त झाले आणि एका सुखी सहजीवनाचा परिचय करून घेता आला. हा वैयक्तिक अनुभव असला तरी तो समष्टीचाही अनुभव होऊ शकतो.**

जन्म, बालपण, तारुण्य आणि विवाह सोहळा प्रत्येकाला अनुभवायला मिळतो. त्यातील गंमत जंमत आगळीच असते. आपल्या आयुष्याचा आलेखच त्यांनी या संग्रहातून मांडला आहे. आत्मचरित्र लिहिणे वेगळे परंतु खुमासदार आणि विनोदी शैलीने काव्यात्मक ललित लिहिणे हे निराळेच असल्याने हा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख-दुःख, आनंदाचे सोहळे येत असतात. सहजीवनात पती पत्नी संवाद आणि कधीकधी विसंवाद घडत असतो.
'नभी खुलले इंद्रधनुचे रंग' ही पहिली कविताच आपल्याला भावते. आपल्या विवाहाच्या व त्यानंतर होणारे सण त्यातील उत्साह याचे वर्णन करणारी पहिलीच कविता (ललित पद्य) आहे. कवीच्या आयुष्यात लग्नानंतर पहिलाच सण रंगपंचमीचा आला. रंग खेळायला, धुडगूस घालायला सर्वांनाच आवडते परंतु कारणपरत्वे कुणाकुणाला रंगाचा तिटकारा असतो. त्यातही महाराष्ट्रात रंगांऐवजी व्हार्निश, ऑइलपेंट असे दुष्परिणामकारक रंग खेळले जाऊ लागल्याने त्यातील रंगतच गेली असा निर्देश करीत आपण खिडकीतूनच रंगपंचमी पाहून आनंद लुटतो. ही कविता वाचताना रंगपंचमीचे उत्साहवर्धक चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. पत्नीने नकळत रंग लावल्याने रागावलेली पतीदेवाची स्वारी आणि नंतर झालेला सुखसंवाद प्रत्येकाच्या वाट्याला येतो. त्यामुळे ही कविता समष्टीची वाटते.
'झाली कडुनिंबाची सावली गोड' ही कविता सासुरवाडीला जावयाचे किती कोडकौतुक असते, हे सांगते. अधिक मास किंवा धोंड्याचा महिना हा जावयासाठी जन्मभर खासच असतो. त्यावेळी मिळणारे वाण म्हणजे तीस अन् तीन (३३) अनारसे, पुरणाचे उंडे अथवा कणीकगोळे हे




त्या त्या ठिकाणचे वैशिष्ट्य. अति आग्रह आणि फिरकी घेण्याचा सासू, मेव्हणे व इतर मंडळींचा स्वभाव असतो. भूक लागली तरी पाहुणचार, उपचार, उखाणे यातच वेळ काढून जावयाची उत्सुकता ताणली जाते, इत्यादी वर्णन प्रत्येकाला अधिकवाणाची आठवण करून देईल. उंडे खाताना मुद्दामच जावयाला सतावण्यासाठी एका उंड्यात काही बारीक खडे घालून त्याची फजिती केली जाते. कंगणकाठी पोशाखाबरोबरच खड्यांचाही प्रसाद मिळणे स्वाभाविकच असे सांगून कवीने सर्वांचेच रंजन केले आहे. 'मनात एक मधुर आला विचार कडुनिंबाची सावली गोड' या ओळींतून जीवनात कडू आणि गोड क्षण येतच असतात. त्यांचे स्वागतच केले पाहिजे असे कवी सुचवून जातो.
बागेत नववधू- वराने फिरायला जाणे काही नवीन नाही, अर्थात जुन्या पिढीला. आताच्या पिढीला रोजच फिरणे, आउटिंग आणि हॉटेलिंग चालूच असते. कवी बागेत घडलेल्या गमतीजमती सांगतो. बागेचे, बागेतील फुलांचे वर्णन रम्य केले आहे. 'प्रीतीचं जणू झुळझुळ पाणी' कोकणाचे दर्शन घडवून आणते. पंढरपुरातून निघण्यापासून ते परतपर्यंतच्या घटना कवीने रंगवून सांगितल्या आहे. 'झाले मन हे झिम्माड झिम्माड' ही कविता निसर्ग, सर्व महिन्यांतील आणि ऋतूंतील बदलाचा निर्देश ही कविता करते. उन्हाळ्यानंतर येणारा पावसाळा किती आल्हाददायक असतो याची महती ही कविता गाते. पावसाची नानाविध रुपं या कवितेत भेटतात. श्रावणातील सोमवारची आणि शिवदर्शनाची महती गात गात कोर्टी येथील कोटी शिवलिंगाचे दर्शन घेऊन स्वारी येते. पाऊस यावा म्हणून बालपणीचे येरे येरे पावसा हे गीत तो आनंदाने गातो, त्याच्या आवाहनाला भुलून पाऊसही येतो. श्रावणाचा शेवट पोळा या सणाने होतो. श्रमाची पूजा बैलाच्या रूपात केली जाते, असे कवी नमूद करून श्रावण सरीत भिजून मन झिम्माड झिम्माड होते असे तो म्हणतो.
'चंद्रच होता साक्षीला जणू' असे सांगत दसऱ्यानंतर येणारी कोजागरी पौर्णिमा त्यावेळचे दूधप्राशन आणि जोडीला गरम गरम भजी असे रसाळ वर्णन करीत पंढरपुरी चुरमुऱ्यांचे गुणगान गात कवी स्पेशल भट्टीतून भाजून आणण्यासाठी शेंगादाणे खरेदी करून मग आपला नंबर येईपर्यंत खरपूस वास घेत आपण तल्लीन होऊन बसलो याचे मनमुराद कथन तो करतो. मसाले दूध आणि पंढरपुरी पेढा ही वर्णने रसिक वाचकांना खवय्येगिरीचा आनंद देतात. संध्याकाळी संधिप्रकाशात चिवड्याचा आस्वाद घेत कोजागरीच्या चंद्राची वाट पाहणे किती रम्य हे कवी रंगवून सांगतो. परंतु दर्शन देण्याऐवजी चंद्र ढगांत दडून बसतो ऐन रात्री बारा वाजता त्या दुधात चंद्रदर्शन घ्यायचे ही संकल्पना आहे, परंतु चंद्र न दिसल्याने सखा व सखी एकमेकांच्या डोळ्यांतच चंद्र पाहतात. मग परसबागेत जाऊन विजेच्या दिव्यांच्या उजेडात चंद्राऐवजी दुधाच्या पातेल्यात एकमेकांचा मुखचंद्रमा पाहून समाधान मानावे, ही भन्नाट कल्पना कवीने मांडली आहे. परंतु एकेकाळच्या या सुरम्य कल्पना.
'नभी साऱ्या तारकाही सुखावल्या'मध्ये कवीने दिवाळीचे, फराळाचे वर्णन करतानाच वृद्धाश्रमात ते बिचारे पोरके आईबाप दिवाळीचा आनंद कुठून मिळवणार, असा सवाल करीत हे जोडपे वृद्धाश्रमात जाऊन तेथील आजी-आजोबांसमवेत दिवाळी फराळाचा आनंद घेतात, सामाजिक दृष्टिकोन बाळगून दिवाळी कशी साजरी करता येते, याचा वस्तुपाठ ही कविता देते.
'जणू जगण्यालाही आली शिर्शिरी'मध्ये थंडीचा आनंद लटता 'माझ्या प्रीतीची ललकारी' वाजवत कवी वेगळ्या विश्वात नेतो 'आम्हा पंख लाभले अवचित'मध्ये वैवाहिक जीवनाचे दशक पार केल्यानंतर या दहा वर्षांतील सौख्याचे क्षण एकवार कवी पुन्हा अनुभवतो. वाचकांनाही त्यांच्या तारुण्यातील त्या दहा वर्षांचे स्मरण नक्की होईल. शेवटची कविता 'सखी सख्खम सख्या सुख्खम' प्रापंचिक जीवनातील कटू गोड आठवणीत कवी रमतो. या कवितेतील 'पती-पत्नी आम्ही म्हटल्यावर मतभेद जरूर आमचे' अशी प्रांजळ कबुली देत या कुरबुरी 'क्षणभंगूरच त्यांना ठरवत , ताणले नाही कधीच आम्ही तेही' हा सुखी जीवनाचा मंत्र सागून कवी या संग्रहाला तूर्त अर्धविराम देतो आणि सर्व दांपत्यांसाठी 'विचाराअंती स्वतः मी जाणला, जीवनामध्ये एक धागा भक्कम जाणले माझ्या आनंदाचे गमक, सखी सख्यम सख्या सुख्यम' असा सुखी जीवनाचा मार्ग कवीने नक्की दाखवला आहे. एकंदरीत वैवाहिक जीवन सुखी व्हायचे असेल तर सखीचे म्हणजेच सौभाग्यवतीचे महत्त्व जाणून तिचाही सल्ला मानावा तरच सखा सुखी राहू शकतो हे स्वानुभवाचे बोल वाचकांना सुनावून जातो. एकमेकांचे 'इगो' दुखावत आणि प्रसंगी 'इगो' कुरवाळत त्यांना सुखावत सुखी वैवाहिक जीवनाचा आनंद घेता येतो, असे कवीने सुखनैव सुचवले आहे. सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी यांचे पैठणीचे चित्र सुखी संसाराचे द्योतक आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महामानव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर




सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

आधुनिक केसरी

**बाबासाहेब म्हणतात, वाचून मोठे होऊं नका तर वाचून मोठे व्हा. खरच आता वाचनाच महत्व कळायला लागलय, तरी आजच्या तरुण पिढीला वाचनाचं गांभीर्य नाही ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. जोपर्यंत माणसातील भेद मिटत नाहीत आणि जोपर्यंत हुकुमशाहीच राज्य आहे तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही, वाचाल तरच वाचाल हे जितक खर आहे तितकेच लिखाणालाही महत्व दिले पाहीजे. लक्षात ठेवा तलवारीच्या धारेपेक्षा लेखणीची धार कायम टिकणार आहे. आणि सर्वात खतरनाक शस्त्रही आहे. महणून तलवार हातात घेऊन अन्यायावर मात करा. किती काळजात खोल रूतणारे शब्द आहेत.**

जर तुमच्याकडे दोन नाणी असतील तर,एका नाण्याची भाकर घ्या आणि एका नाण्याचे पुस्तक घ्या. भाकर तुम्हाला जगवील तर पुस्तक जगवण्याची कला शिकवेल. डॉ. आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये महू छावणी येथे झाला. प्राथमिक शिक्षण दापोली येथे घेऊन सातारा येथे १० वी पास होऊन मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमधून बी. ए. झाले. घरची परीस्थिती हलाखीची तरीही त्याकाळी शिक्षणाचे महत्व कमी असतानादेखील परीस्थितीवर मात केली. प्रसंगी ग्रंथांलयात वडापाव वर दिवस काढून वकीलीचा अभ्यास केला. एवढ्यावरच न थांबता १८९३ मधे त्यांनी न्यूयॉर्कला जाऊन एम. ए. ची पदवी मिळवली. त्यांच्या कार्याविषयी लिहू तेवढे थोडच आहे. मुकनायक हे पाक्षीक त्यांनीं सुरु केले. बहीष्कृत भारत हे पत्र त्यांनी ३एप्रिल १९२७ रोजी सुरू करून बहिष्कृत वर्गाच्या समस्या त्यांनी मांडल्या. त्याकाळी अस्पृशता, भेदभाव मोठ्या प्रमाणात होता.आबेडकर त्यांच्यापरीने समाजात बदल घडविण्याचा प्रयत्न करतच होते. त्यानंतर बाबासाहेबांनी एक फार मोठा ऐतिहासीक निर्णय घेतला, तो म्हणजे धर्मांतराचा. त्यांनी लोकांना आवाहन केले की ज्या धर्मात समान न्याय, समान संधी व समान वागणूक मिळते अशा धर्मातच प्रवेश करा. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे देशातील सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, वैचारिक मंडळे यांना धक्काच बसला. धर्मांतराच्या घोषणेने एकच खळबळ निर्माण झाली धनंजय कीर यांनी तर विजेचा कडकडाट असे वर्णन केले आहे, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर ठरले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली. आणि १९५० रोजी ती अमलात आणली गेली. भारताचे हे संविधान त्यामुळे देशाचा कारभार कसा चालवावा आणि एक आदर्श शासन कसे असावे याचा एक उत्तम नमूना आहे.

देशप्रेमापुढे ज्याने स्वतःच्या विश्रांती चा त्याग केला, स्वाभीमान शिकवला, संकटाशी सामना करायला शिकले असा एकमेव तारा म्हणजे बाबासाहेब आंबेडकर होत. दलितांच्या हक्कांसाठी लढणारे ते लढवय्ये होते. दलितांसाठी पाण्याचे स्त्रोत



खुले करुन दिले. आणि अस्पृश्यतेला मुळापासून नष्ट केले.

बाबासाहेब यांना पहिल्या बायकोपासून एक मुलगा झाला. त्याचे नाव यशवंत होते. पहिली पत्नी दीर्घ आजाराने गेल्याने त्यांनी मुंबई मधे योगायोगाने भेटलेल्या ब्राम्हण डॉ शारदा यांच्याशी त्यांचे लग्न १९४८ मधे झाले. मधुमेहाने त्रस्त असलेले आंबेडकरांची तब्बेत खालावत गेली. आणि एके दिवशी हा उगवता सूर्य दिर्घ आजाराने मावळला गेला. ६ डिसेंबर १९५६ रोजी आपल्या राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

बाबासाहेबांनी सामाजिक आणि आर्थिक रुपाने देशाच्या प्रगतीत महत्वपूर्ण योगदान दिले.

बाबासाहेबांनी मसुदा तयार करताना कठोर परिश्रम घेतले होते. म्हणूनच त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणतात. त्यानी विद्यार्थ्यांना सांगितले की, शिक्षण ही दुधारी तलवार आहे. तिचा वापर तिला धारण करणाऱ्यावर असतो. म्हणून शिक्षणासोबत शील असणे ही महत्वाचे. शिक्षणाने कितीही मोठे झालात तरी आई वडिलांना विसरू नका.

एका कविसंमेलनात आंबेडकर यांच्याविषयी खूप छान कविता ऐकली.

बाबासाहेब तुम्ही जन्माला या पून्हा
तुम्ही लावलेले रोपटे, त्याचा काटेरी झालेला वृक्ष
पहाण्यास जन्माला या पून्हा...
जातीपातीच राजकारण इथे
फरक पडत नाही घटनादुरुस्तीत इथे
कायदा हातात घेऊनच
राज्यकारभार चालतोय इथे
बाबासाहेब जन्माला या पुन्हा
तुम्ही लावलेल्या रोपट्याचा काटेरी वृक्ष झालाय पहा
बाबासाहेब जन्माला या पून्हा...

खरच देशाला आता बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या महान नेत्यांची गरज आहे.

आता वेळ आलीय बाबासाहेब धरतीवर पुन्हा जन्म घेण्याची...

# तृणधान्याचे सणानुसार महत्त्व व बनवले जाणारे पदार्थ

आधुनिक केसरी

**बाजरी, ज्वारी, गहू, तांदूळ, नाचणी, वरई, मका हे तृणधान्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. हे आपण शाळेत असतानापासून शिकत आलो. आपले आरोग्य चांगले, निरोगी राहण्यासाठी आहारात तृणधान्य फार महत्त्वाचे आहेत. यात प्रोटीन व फायबर चे प्रमाण जास्त असल्यामुळे हे कॅन्सर, मधुमेह, रक्तदाब व हृदयविकार असणाऱ्या रूग्णांसाठी फायदेशीर ठरतात. हे आपण अभ्यासले आहेच. आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या तृणधान्यांचा संपूर्ण जगात प्रसार व्हावा, म्हणून १६ नोव्हेंबर २०१८ हा दिवस 'राष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य दिवस' म्हणून साजरा केला गेला.**

तृणधान्याची लागवड मुख्यतः बियांच्या रुपात करतात. प्रत्येक धान्याचे सुरवातीचे रूप हे तृणधान्यच असते. शेतामध्ये पिकाची वाढ होत असताना त्यात निर्माण झालेले बी म्हणजेच तृणधान्य होय. उदाहरणार्थ, मका, तांदूळ, गहू, ज्वारी, नाचणी इत्यादी.

तृणधान्यांमध्ये तीन प्रकारच्या घटकांचा समावेश असतो. प्रथिने, कार्बोदके आणि तंतूमय पदार्थ. सध्याच्या व्यस्त , बैठ्या जीवनशैली मुळे स्थुलपणा हि समस्या निर्माण झाली आहे. त्यासाठी DR. WHOLE GRAIN खाण्याचा सल्ला देतात . आपल्या लोकांना वाईट सवय आहे. पिकतं तिथं विकत नाही ही म्हण प्रचलित आहे. तसं आपल्या लोकांना म्हणजे मी पण त्यात आले .आयुर्वेदचे आयुर्वेदा, योगचे योगा, नाचणीला रागी, एक काना जोडला गेला की ते भारी ..... आता काय मिलेट्स खावा ... आपली संस्कृती बोंबलून सांगते तेव्हा आपण त्याकडे दुर्लक्ष, काना डोळा करतो. माझे वाक्य आगाऊपणाचे वाटेल पण हेच खरे आहे . असो वादाचा मुद्दा न करता आपल्या तृणधान्य यावर येवू. तृणधान्यांचे फायदे वर दिले आहेत. म्हणून तर पुर्वी पासुन आपल्या जेवणात यांचा वापर पुरेपूर करत असतील.

पुर्वीची जीवनशैली भरपूर काम कष्ट अशी. 'खायला कोंडा आणि निजेला धोंडा ' ही सार्थ आहे. भरपूर कष्ट केल्यावर गरमागरम वरणभात, भाकरी किंवा पोळी, कोशिंबीर, लोणचे चटणी, असे चारी ठाव जेवण जेवल्यावर आणि तेही वेळेत ..... कशाला जाडी वाढते कोलेस्टेरॉल, बीपी, शुगर यांचे राज्य आले असते का ?

आता हाकेच्या अंतरावर जाण्यासाठीदेखील दोन चाकीचा सर्रास वापर करतात. तासनतास एका जागी त्या कॉम्प्युटरवर चिकटलेले असतात वर खाणं म्हणजे तळलेले, वेफर्स, पाव, बर्गर, फ्रेंचफ्राईज असल्या पदार्थांचा भडीमार होतो . हे खायचं नाही असे न म्हणता.... हे खाणं टाळलं पाहिजे.

माणसाच्या स्वभावानुसार त्याला देवाधर्माची जोड दिली किंवा याला अनुषंगाने सांगितले की लगेचच नकाराचे रुपांतर होकारात होते. म्हणूनच या सणा दिवशी किंवा ह्या देवाला हाच नैवेद्य त्या त्या भौगोलिक, स्थानिक, काळ-वेळेनुसार ठरवला गेला असेल .

गणपती बाप्पासाठी उकडीचे तांदळाचे मोदक, वेळ आमवस्या दिवशी बाजरीचे उंडे, दिवे, ज्वारीच्या पिठाचे आंबील असे प्रकार करत असतील. हे सर्व तृणधान्यांचे प्रकार पोटभरीचे, पौष्टिक असणारेच . सहा महिन्यांच्या बाळापासून ते नव्वदीच्या ज्येष्ठ मंडळींनी चालणारी ही धान्ये. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत नाचणी, ज्वारी , तांदूळ ही धान्यं पचायला हलकी पटकन मिळणारी. त्यापासून अनेक उत्तमोत्तम चविष्ट, रुचकर, पौष्टिक पदार्थ







तयार करता येतात .

ज्वारीच्या पिठाचे आपण बरेच पदार्थ करुन शकतो ज्वारीच्या पिठाचे आंबील, लाडू, आंबोळी,उकडपेंडी, शेंगोळे, थालिपीठ, भाकरी इत्यादी. ज्वारी, बाजरी, नाचणी ह्यापासून आता आपण तीन पदार्थ बघूया.

## ज्वारीच्या पिठाचे लाडू

मुलांच्या वाढीच्या वयात त्यांच्या पोटात सर्व काही गेले पाहीजे असा माझ्या सासूबाईंचा कटाक्ष असतो. मुलांना आवडत नसलेल्या पदार्थाचे रुपांतर त्याच्या आवडीप्रमाणे कधी तिखट तर कधी गोड करून दिला की आपण बेमालूम फसवणूक करुन देखिल त्यांच्या पोटात तो पदार्थ गेला की त्याचा आनंद काय असतो ? हे त्या आईच्या चेहऱ्यावरच कळते !!! असे माझ्या सासूबाईंचे म्हणणे असते . त्यासाठी म्हणून हा खटाटोप !!!.

**साहित्य :** एक वाटी ज्वारीचे पिठ, अर्धी वाटी तूप, दोन ते तीन चमचे खारीक पूड , दोन ते तीन चमचे सुके किसलेले खोबरे, एक ते दिड चमचा डिंक, सुकामेवा, खसखस, वेलची, पिठी साखर अर्धी अगर पाऊण वाटी आपल्या आवडीप्रमाणे, आवडीप्रमाणे ड्रायफ्रूटचे तुकडे ... इत्यादी

**कृती :** कढईत तूप टाकून डिंकाची लाही फुलवून घ्या. त्याच कढईत तूप घालून ज्वारीचे पिठ खमंग भाजून घ्या. चमचाभर तूप घालून खारिकपूड भाजून घ्या . किसलेले सुके खोबरे गुलाबीसर भाजून घ्या, खसखस भाजून घ्या. डिंकाची लाही बारिक करुन घ्या, त्यावर तूपावर भाजलेले ज्वारीचे पिठ घाला, त्यावरच भाजलेले खोबरे, खसखस, खारिकपूड घाला. वेलची पूड, पिठीसाखर, ड्रायफ्रूट तूकडे घालून मिश्रण एकजीव करुन घ्या. गरज वाटल्यास तूपाची पातळ धार घालावी.मस्त गोल गरगरित लाडू वळावेत.

## बाजरीच्या पिठाचे सूप

थंडीच्या दिवसात सूप पिणं हे आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीसाठी, चांगल्या आरोग्यासाठी त्यांना रेडी टू कुक सूप्स देण्यापेक्षा कधीही घरी केलेलं ताजं सूप हे जास्त पौष्टिकच असतं.

हिवाळ्यात थंडी तर असतेच थंडीमध्ये गरम सूप थंडी तर पळवतेच आणि तोंडाला चांगली चवही देते शिवाय आजारी व्यक्तींसाठी हे सूप फायद्याचे आहे. पचण्यास हलका-फुलका आहार म्हणून सूप पिण्याचा सल्ला दिला जातो. भाज्यांचे सूप आरोग्यासाठी लाभदायक असते. पण आपल्याकडचे माडगं, पेज, कढण, पिठवणी, अंबील ह्यासारख्यां पदार्थांतून आपण हलका पौष्टिक आहार मिळवतोच. सूप हे त्यांचे नवीन व्हर्जन म्हणता येईल. आपण बाहेर जेवायला गेलो की पहिल्यांदा सुप मागवतो. डायटफ्रि, न्युट्रिश्नल व्हल्यु म्हणून आपण ह्या खाण्याला प्राधान्य देतो. सूप हे चटकन तयार होणारी, तब्येतीला उपयुक्त आणि फायदेशीर, स्वादिष्ट असणारे आणि वेळ वाचवणारी अशी ही डिश आहे.

सूप बनवायला सोपे तर आहेच ( पण हे एक न्यूट्रिशन पावर हाऊस असून, त्यात कार्बोहैड्रेट्स, प्रोटीन्स, व्हिटॅमिन्सचा समावेश असतो.

बहुतेक करून सर्वांना पालक, टोमॅटो, स्वीटकार्न , आजकालचे चायनीज सूप आवडते. पण आज मी तुम्हाला बाजरीच्या पिठाचे सूपची रेसिपी सांगणार आहे. बाजरीच्या पिठाचे रेसिपी घरी असलेल्या उपलब्ध साहित्याच्या मदतीने बनवू शकतो. त्यासाठी बाजार गाठायला नकोच ! मग घ्या साहीत्य आणि कृती.



लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

**साहित्य :** दोन ते चार चमचे बाजरीचे पिठ, दोन ते चार मोठे चमचे तूप, एक चमचा तीळ, एक चमचा ओवा आणी जिरे, अर्धी किंवा एक हिरवी मिरची, चिमुटभर हिंग, एक चमचा ओले खोबरे किंवा डेसिकेटेड कोकोनट, सजावटीसाठी सायीचे दही, धूवून बारीक चिरलेली कोथिंबीर, चार ते पाच मोठ्या वाट्या पाणी इत्यादी.

**कृती :** कढईत दोन चमचे तूप टाकून बाजरीचे पिठ खमंग भाजून घ्या, भाजले की बाजूला काढून ठेवा आता त्याच कढईत तूप घाला त्यात जिरे, ओवा, तीळ घाला. मिरचीचे एकदम छोटे, पातळ काप करून घाला. गस मंद करुन त्यात भाजलेले पिठ घाला, चिमुटभर हिंग, घाला, एकसारखे हलवून गार पाणी थोडे थोडे घालतकाळजी घ्या. आता गस मोठा करुन उकळी येवू द्या. चवीनुसार मीठ घाला, बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. गरमागरम सायीचे दही किंवा तुप घालून सर्व्ह करा. नक्कीच आवडेल. बाजरी सप्ताहासाठी नवीन हलका, पौष्टिक, पटकन होणारा पदार्थ खास तुमच्यासाठी करुन बघीतला आणि घरात सगळ्यांनाच खुप आवडला, तुम्हाला पण नक्कीच आवडेल.

## उकडीची नाचणीची भाकरी

नाचणीची भाकरी आरोग्यासाठी अतिशय महत्वाची आहे. तुम्हाला मधुमेहाचा त्रास असेल तर नाचणीची भाकरी तुम्हाला माहित असेलच, नाचणीची बिस्कीट लहान मुलांना दिली जातात, त्यापेक्षा लहान मुलं जेव्हा खायला लागतात, तेव्हा त्यांना नाचणीची भाकरी, लापशी खायला देणं कधीही सर्वोत्तम आहे.

**साहित्य :** दोन वाट्या नाचणीचे पीठ, अंदाजे दीड ते दोन वाट्या पाणी, पाच ते सहा चमचे तूप किंवा लोणी, चवीनुसार मीठ धूवून बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे तीळ, दोनकुड्या ठेचलेला लसूण, किसलेले आले थोडेसेच, जिरे इत्यादी.

**कृती :** पातेल्यात पाणी गरम करून त्यात एक चमचा लोणी किंवा तूप घालावे, पाणी चांगले गरम झाले कि त्यात ठेचलेला लसूण आले, कोथिंबीर, तीळ, जिरे घालावे. आता नाचणीचे पीठ आणि मीठ घालून मिक्स करावे. छानशी वाफ काढा. पिठ गरम असल्यामुळे हळू हळू मिक्स करून मळावे, पीठ चांगले मळले गेले पाहिजे. मळलेल्या पिठाचे ४ किंवा ५ गोळे करावे व लगेच भाकरी करायला घ्यावी. तवा गरम झाला की गॅसमध्यम आचेवर ठेवावा. मळलेल्या पिठाचा गोळा कोरड्या पिठात बुडवून हलक्या हाताने लाटावा. भाकरी तव्यावर टाकावी वरच्या त्यावर तूप टाकावे एकसारखे पसरवून भाजावे आता भाकरी दुसऱ्या बाजूने तशीच तूप सोडून भाजून घ्यावी, गरमागरम तर छानच लागते पण गार झाल्यावर खाल्ली तरी मऊमाऊ राहते. मग करुन बघा. नाष्ट्याला, जेवणात कधीपण छानच लागते, सोबत कोशिंबीर, चटणी, दही, ठेचा, ओल्या हळदीचे लोणचे बहारच आणतील. शिवाय आजकालच्या डायटफ्रिक लोकांना ग्लुटेन फ्री रेसिपी. मग बघा करुन आणी कळवा हो ! कशी वाटते ते ? रंगरुपावर न जाता पौष्टिकता बघा.

अश्या रितीने तृणधान्यांचा वापर आपण वेगवेगळ्या पद्धतीने करू शकतो. तृणधान्य ही अधिक कर्बोदके देणारे स्त्रोत आहेत. या मध्ये बाजरी, गहू, तांदूळ, ज्वारी, मका या पिकांचा समवेश होतो. त्यांची लागवड मुख्यत्वेकरून त्यांच्या बियाद्वारे केली जाते. तृणधान्यांचा उपयोग मानवाच्या पोषणासाठी, जनावरांच्या खाद्यांत आणि औद्योगिक उत्पादनात केला जातो . "सेवन करु या तृणधान्यांचे, पळवून लावू या संकट रोगांचे" हे सार्थ ठरविण्यासाठी आहार, विहार, चर्या या त्रिसूत्रीचा वापर करून देशांबरोबर प्रत्येकव्यक्ती सुजलाम सुफलाम करू या. अखंड भारत सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी आहारात तृणधान्य, तंतूमयपदार्थ, कडधान्ये, संपूर्ण शाकाहारी पदार्थ यांचा वापर करू .

## जादूगार...!

मुले रिंगण करून
बसली घालून मांडी,
जादूगाराच्या हातात
होतीया जादूंची कांडी.

जादूगाराने काढला
टोपीमधून रूमाल,
साऱ्या मुलांना वाटली
त्याची खुपच कमाल.

जादूने पेटाऱ्यातून
काढला पांढरा ससा,
ससा म्हणाला, मुलांनो
आता तुम्ही शांत बसा.

नंतर जादूगाराने
काढला सुंदर पक्षी,
पक्ष्यावर काढलेली
होती छान छान नक्षी.

गोड-गोड आवाजात
पक्षी लागे गाणे बोलू,
जादूगाराच्या जादूने
मुले लागलीया डोलू.

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## झुंज

झुंज आयुष्यात दिली
किती संकटे पाहिली
नाही थांबले कधीच
फुले तयास वाहिली...

मन खंबीर म्हणून
दिले तोंड वादळास
मीच लढत राहिले
मीच समजे मनास...

दिली नाही साथ कुणी
पाठ फिरवे नियती
किती यातना मनास
झुंज एकटी साहती..

आता समजले पुरे
काटे वाटेत पेरले
नाही माघार घेणार
मनी स्वप्न साकारले

-सीमा मंगरूळे तवटे वडूज

## “ कातरवेळी”



किनारे धुंडाळूनी सागराच्या कवेतले
नौकेस बस्तान मांडून देती
झरे खळाळती कडेकपारीतले
झुळझुळ पाण्याचे पाट वाहती
सोबतीस वारे नभापलीकडले
हवेत झुळूक होऊनी बसती
पळस लाल-पिवळे झाले
कोवळी पाने सुकून जाती
सुतार पक्षी माळरातले
कातरवेळी किरकिर करती
डोंगर मातले पिकं करपले
काळी माती जमिन उपजती
दुपार टळून खेळ सारे संपले
आता थकली उन्हे सावल्यांस बिलगती!
-प्रदीप बडदे, नवी मुंबई, मो. ९५९४०२७९९५



## जगण्यात असावी धुंदी

जगण्यात असावी धुंदी
प्रत्येक क्षण अनुभवावा
हरपून जावे भान
आनंद ओथंबून वहावा
कष्टातही असते मजा
सेवेत अनुभवा देवा
विश्वासाची मजा कुछ और
सत्यानेच जिंका सबकुछ
सर्वांशी नाते जोडा
जातींचे बंधन तोडा
ना भांडती कधी पक्षी
आपण तर भले शहाणे
कर्माने मिळते सारे
हे साधे गणित समजा

स्वच्छंदी जगणे असावे
जरी चार दिस जगावे
प्रेमाची किमया भारी

प्रेमाने जग जिंकावे
आस्वाद घेता यावा
सुख-दुःखाच्या क्षणांचा
साधावयास भाव
मन मळा करा भक्तीचा
हे जीवन असते दुर्मीळ
ज्याला हे सारे कळले
जिंकला तोच मग सारे
ही धुंदीच असते न्यारी
नेईल सुखाच्या द्वारी

@संजय काव्या 7743918559

## भोग...!



कुणबी हाकतो वखर
उन्हामध्ये गाळतो घाम,
शेतीच्या मेहनतीसाठी
दिनरात करीतो काम.

हिरवे रान करण्यास
पावसाला मारीतो हाका,
सालोसाल बळीराजाला
पाऊस देत आला धोका.

पाऊस पडल्यावरती,
करीतो कष्टांची पेरणी,
रानातल्या काळ्या मातीत
चोहीकडे पाझरे पाणी.

पिकासाठी पाणी भरीतो
हातापाया लागे चिखल,
बळीराजाच्या जीवनाची
मग होती सारी उकल.

संकटाला तोंड देण्यास
कधी मानीत नाही हार,
दिवसरात राबवून
हिरवी करीतो शिवार.

पिके जोमात येऊनही
पिकांवर पडतो रोग,
कुणबी, कधी सरणार
तुझ्या रे जीवनाचा भोग.
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## संगत

घडवू आपण आपुले प्राक्तन
वाढवू निरामय आयुष्य स्वगत
वाजतील मनात आनंद पैंजण
धरूया सद्विचारांची संगत

ढळूनी जावो अज्ञान तिमिर
असीम वृद्धनी विवेक पंगत
देई शीतलता वाहता समीर
धरूया सद्विचारांची संगत

मिटवूनी चिंता, वाढवूनी चिंतन
करूनी स्वसांत्वन बनूया उन्नत
घालूनी विवेकांना घट्ट आलिंगन
धरूया सद्विचारांची संगत

फेकूनी अंधश्रद्धा अवडंबर
फुलवू कष्टाने इथेच जन्नत
त्यागूनी मरगळ कसूनी कंबर
धरूया सद्विचारांची संगत

-मनोज अग्रवाल, औरंगाबाद

## कधी भेटशील मला

ओढ तुला भेटण्याची
क्षणात होते बावरी
तुझ्या येण्याच्या वाटेला
नजर होते कावरी...१
ही मनाला हुरहूर
कधी भेटशील मला
नयन झाले व्याकुळ
साद ही घालते तुला...२
तुझ्या पाऊल खुणांचा
भास होतो या श्वासांना
अतुरलेल्या मनाला
भास तुझ्या इशाऱ्यांचा....३
तुला भेटण्यास झाले
अधर हे वेडेपिसे
तुझ्या गोड भेटीसाठी
घेतसी मन उसासे...४
होता नभी सांजवेळ
वाढे ओढ मिलनाची
स्वप्न सुखवती जणू
सृष्टी सजली प्रितीची...

अनिता देशमुख, नांदुरा
(बुलढाणा), हमु.-कल्याण

## अहंकार

मनुष्यत्वाचा तमोगुण
असे अहंभाव अहंकार
मनातल्या सात्विक वृत्तीचा
नाश करी अहंकार

इतिहास साक्षी असे
मातीत सारे भस्म झाले
अहंकाराने सत्ता सल्तनत
सिंहासन राजांचे गडगडले

दानव असो की कौरव
कंस असो की रावण
अहंकाराची उतरता मस्ती
महाशक्तीचे होई पतन

अरे माणसा माणसा
अहंकाराचा वारा न लागो जीवा
नम्रतेचा कर सदैव अंगीकार
सुख लाभेल सदा जीवा

-सुनिल माथने, अकोला
मो. 9403282970

## धागे दोरे

धागे दोरे आयुष्याचे
घट्ट विणत जाऊ
विण नको उसवायला
नाती आता समजाऊ..

बंध नको तोडू कधी
जीव गुंतत गेलाय
कसा राहू तुझ्या विना
हेच लक्षात आलंय...

माझी जन्माची सोबत
किती वर्षांची बंधने
दिली माया केले प्रेम
कशी विसरू स्पंदने...

तुझे माझे नाते कसे
दिवा आणि वात जसे
तुच माझ्या जीवनाचे
तारु नेसी पार कसे...

तुझी आठव येता क्षणी
ओढ लागे जीवा किती
माझे जीवन व्यापले
तुझ्या आठवणी साठी..

-सीमा मंगरूळे तवटे, वडूज




# आनंदाचे झाड...!

आधुनिक केसरी

**उन्हातान्हात या रस्त्याने जाताना मी अनेकदा याच्या छत्रीसारख्या गर्द सावलीत काही क्षण का होईना थांबतोच; त्यावेळी जणूकाही हा हिरवाईने बहरलेला तरु माझ्यासोबत अंतरीच्या गुजगोष्टी करत मित्रा तुझ्यासारख्या अनेकांना या वळणावर मी नित्यनव्याने भेटत असतो;त्यांचेही हालहवाल जाणून घेताना थंडगार सावलीतल्या आनंदाचे भागीदार करत असतो हे तर सांगत नसावा ना...**

डोक्यावर आग ओकणारा सूर्य..अक्षरशः भाजून काढणारी उन्हाची प्रचंड काहिली..तहानेने जीव व्याकूळ होऊन घशाला पडलेली कोरड आणि घामाच्या धारांनी चिंब भिजून गेलेली काया अशीच काहीशी स्थिती प्रत्येकजण सध्या अनुभवतोय..अशातच रस्त्याने जाताना एखाद्या सुंदर वळणावर डेरेदार झाडाची छान दाट सावली पडलेली असेल तर क्षणभर का होईना त्याच्या त्या तनामनाला आणि अगदी अंतरआत्म्यालाही थंडावा देणाऱ्या सावलीत अंमळ थांबवे असे प्रत्येकाला मनोमन वाटतेच..!





मोठमोठ्या शहरांत होत असलेले आधुनिकीकरण आणि उंचच्या उंच टॉवर्स,गगनचुंबी इमारतींची बांधकामे सुरु असताना झाडांची बेछूटपणे कत्तल होते आहे..! सिमेंटच्या प्रचंड वेगाने वाढणाऱ्या जंगलात त्यामुळे झाडे जीव मुठीत धरुन आपल्या अस्तित्वासाठी भेदरुन उभी आहेत.. पूर्वी सगळीकडेच दिसणारी वनराई दुर्मिळच होत चाललीय जणू..! गजबजलेल्या शहरांतही जर एखाद्या पेठेत किंवा चौकात खूप जुने झाड असेल तर त्याच्या सावलीत आपली गाडी पार्क करण्यासाठी अनेकजण धडपडतात..त्याच्याच विस्तारलेल्या डेरेदार सावलीत एखाद्या कष्टकऱ्याचा उसाचा चरक किंवा थंडगार मसाले ताकाचा गाडा हमखास असतोच आणि हे सर्व वैभव दिसले तर आपल्या आत्माराम महाराजांना थंडावा देण्यासाठी पावले आपोआपच तिकडे वळतात..! तिथे झाडाचं असणं गरजेचं का आहे हे नकळतपणे समजतं..!

पण झाडांची खरी गर्दी आणि मज्जाही गाव खेड्यांतच बरं का..! पुणे-नगर रस्त्यावर जिथपर्यंत दृष्टी जाईन तिथपर्यंत झाडे तशी कमीच..! सुपा-केडगाव पर्यंत डोळ्यांत फक्त उजाड माळराने आणि पिरॅमिड सारख्या टेकड्या..! त्यात तुरळक झाडे अधूनमधून दर्शन देतात..नगर सोडल्यानंतर आपल्या वांबोरीच्या रस्त्याला 20 वर्षांपूर्वी बोटांवर मोजण्याइतके वृक्ष होते..जास्त करुन वडाची झाडे रस्त्याच्या दुतर्फा होती..काहीसं भकास वातावरण होतं..! हल्ली मात्र या उघड्या बोडक्या माळरानावर शेती केली जातेय आणि जवळच असलेल्या पिंपळगाव माळवीच्या तलावामध्ये असलेल्या मुबलक पाण्यामुळे परिसरात वनराई आणि हिरवाई वाढत चाललीय..! गर्भागिरी डोंगररांगेच्या परिसरातही अनेक सामाजिक संस्था आणि पर्यावरणप्रेमी,निसर्गसंवर्धक आणि शेतकरी बांधवांकडून मोठया संख्येने वृक्षारोपण झाले आहे..! वांबोरी घाटाच्या पायथ्याशी असलेल्या वृक्षप्रेमी श्री संजुभाऊ चंगेडिया यांच्या 'तुराग' या शेतीत हजारो देशी वृक्षांची लागवड आणि जतन केलं जातंय हे खरे तर आश्वासक आहे..! फोटोतील झाड हे वांबोरीहून सडेमार्गे राहुरीला जाताना रस्त्याच्या कडेला मला रोज आपल्या विशाल फांद्यांच्या हातांनी मला गच्च मिठी मारुन भेटणारे आहे;एखाद्या जिवलग मित्रासारखे..! उन्हातान्हात या रस्त्याने जाताना मी अनेकदा याच्या छत्रीसारख्या गर्द सावलीत काही क्षण का होईना थांबतोच;त्यावेळी जणूकाही हा हिरवाईने बहरलेला तरु माझ्यासोबत अंतरीच्या गुजगोष्टी करत मित्रा तुझ्यासारख्या अनेकांना या वळणावर मी नित्यनव्याने भेटत असतो;त्यांचेही हालहवाल जाणून घेताना थंडगार सावलीतल्या आनंदाचे भागीदार करत असतो हे तर सांगत नसावा ना ..!

असे आनंदाचे झाड प्रत्येकाला आयुष्याच्या वळणावर भेटत असतेच..! पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्यांचे महत्व आहेच परंतु त्यांच्याकडून घेण्यासारखा सर्वात मोठा गुण म्हणजे कुठलेही झाड हे नेहमी भरभरुन देतच असते..! फळे-फुले असोत की डेरेदार सावली..! जिवंत असतानाही त्याची परोपकारी वृत्ती लक्षात राहते आणि वाळून गेलेल्या वृक्षांची जळणापासून कित्येक ठिकाणी उपयुक्तता असते हे आपण पाहतोच..!

तूर्त आनंदाचे आणि दातृत्वाचे असे सुंदर झाड बनण्याचा प्रयत्न करुयात..!!

**आदिनाथ शेवंताबाई बाबुराव मोरे**
संपर्क क्र. 8788662022

## व्यथा बळीराजाची

औंदा माझ्या बळीराजावर
निसर्ग कसा कोपला आहे
लाख विनवितो देवाला पण
देव मात्र झोपला आहे

रात्रंदिस ज्याला मोठ केलं
तेच सोन मातीमोल झालं
बळीराजाच स्वप्न उद्याच
निसर्गाने हिरावून नेलं

आधीच नव्हता बाजारभाव
त्यात हा ओला दुष्काळ
सांगा कधी येईल हो
त्याची आनंदाची सकाळ

कधी फिटेल बँकेचे कर्ज
कधी मुलीच लग्न होईल
पोरांच्या ह्या शिक्षणाला
सांगा कोण पैसे देईल



नाही उरली साथ कोणाची
जगून काय करावे
एकच विचार मनी त्याच्या
आता आपण मरावे

कुणी घेतलं विष तर
कुणी फासावर लटकून मेला
शेतकर्याचा जन्म मात्र
आला तसाच गेला

सरकार आणि पुढार्यांनो
ईकडे देता का हो लक्ष
अन्नदात्यासाठी जरा
बाजूला ठेवा पक्ष

कर्जमाफी करुन तुम्ही
त्यास आर्थिक आधार द्यावा
पुन्हा नव्या जोमाने
शेतीस मोहोर यावा

पुन्हा एकदा नव्याने
बळीराजा हा ऊभा राहील
देशाचा हा कणखर कणा
पुन्हा एकदा ताठ होईल

पुन्हा होईल भारतमाता
सुजलाम आणि सुफलाम
म्हणु आपण गर्वाने
जय जवान जय किसान

**-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे**
संपर्क क्र. ८४११९४७९९६

# समाजभान जपणाऱ्या खऱ्या मित्रांचा "याराना"



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**वर्षानुवर्षे मैत्रीचे नाते हे असेच चालू राहील, पिढ्या बदलल्या, माणसे बदलली, नवीन शोध लागले, जग बदलले,तरीही मैत्री हे असे नाते आहे ...जे कधीच बदलणार नाही आणि ते बदलूच शकत नाही. म्हणूनच मैत्रीचे नाते जपायला हवे, एकमेकांमधे द्वेषभाव विसरून सगळ्यांनी मैत्रीच्या नात्याने एकत्र आले पाहिजे, ही काळाची गरज आहे.**

आजच्या धकाधकीच्या व धावपळीच्या काळात वैयक्तिक काम सोडून एकत्र येणे दुरापास्त झाले आहे.कोरोनाच्या परिस्थितीनंतर अनेकांनी माणुसकी अनुभवली.कोरोनाने अनेक नव्या गोष्टी कळल्या.एका कार्यक्रमाच्या निमित्ताने माझा काही सहकाऱ्यांशी परिचय झाला आणि अवघ्या तीन ते चार दिवसांत आमची नाळ एकदम घट्ट जुळली.मातीशी नाते सांगणारे आम्ही कधी सख्खे जीवाचे मैत्र होऊन गेलो,आम्हाला कळलेच नाही.ना कुणी जात बघितली, ना कुणी शिक्षण बघितले,ना वयोगट...ना इतर काही... केवळ आणि केवळ चांगल्या विचारमंचच्या कार्यक्रमासाठी आम्ही एकत्र आलो...निमित्त होते 'वांबोरी कला व प्रबोधन महोत्सव'... आणि आम्हाला एकत्र आणणारे व्यक्तिमत्त्व होते अभ्यासू अशोक व्यवहारे सर...

'मैत्रीची' सहज अशी व्याख्या कधीच कोणाला करता येणार नाही. ज्याप्रकारे प्रेम ठरवून करता येत नाही तशी मैत्री ही ठरवून करता येत नाही. आयुष्यात जे काही जिवलग मित्र आणि मैत्रिणी भेटत गेले. त्यांच्या सोबत राहून मैत्रीची व्याख्या उलगडत गेली.काही स्वतःच्या अनुभवाने तर काही दुसऱ्यांनी जगलेल्या अनुभवावरून, हे सारे अनुभव मैत्री या शब्दात बंदिस्त केले जाते.मैत्रीचे अनेक दाखले आजवर प्रत्येकजण देत आलेय.श्री कृष्णा- सुदामाच्या मैत्री पासून शिवबा-बाजीप्रभु, कर्ण-दुर्योधन, पार्थ-माधवा पर्यंत सगळ्यांची मैत्री अगाध आहे. दृढ विश्वासावर अवलंबलेली आहे त्याची खोली ही तितकिच व्याप्त आहे . पुस्तकातल्या पानासारखे आपण जवळ येतो, हसतो , बोलता आणि यातून कळत ही नाही की आपसात कधी मैत्री जुळून येते.खरच मैत्री कधी कुणाशी कशी होईल काही सांगता येत नाही. शाळेत गेल्यावर आपल्याला पहिल्यांदाच बाहेरच्या जगाशी ओळख होते. शालेय जीवनापासून ह्या निरागस प्रवासाला सुरुवात होते त्यामुळे सगळी नाती समजायला आणि नवीन नाती आत्मसात करायला शिकवते.पण जसे वय वाढत जाते, आपणही समाजाच्या दृष्टीकोनातून विचार करायला लागतो. समोरच्या माणसाच्या स्वभावातील विविध कंगोरे जाणून घ्यायला लागतो. तिथेच ओळख होते आपल्याला ती खऱ्या मैत्रीची तोपर्यंत शालेय जीवन मागे टाकून मनावर आपण




सज्ञान झाल्याच बिंबवीत कॉलेज जीवनात प्रवेश केलेला असतो. सगळ्यांशीच ओळख असूनही तिथे प्रत्येकाचे गट पडत जातात. कुठलाही वैयक्तीक फायदा न बघता आमचा ग्रुप जमला. अशोक व्यवहारे सरांनी कला व प्रबोधन महोत्सवाची रूपरेखा समजून सांगितली.मग मी,आदिनाथ मोरे,निवृत्ती पाटील,ईश्वर कोरडे,संतोष महापुडे,प्रीतम व्यवहारे,एकनाथ महापुडे, नासिर कोतवाल, डॉ.विशाल तिडके,विशाल दाते,इंद्रजित पाटील,स्वरूप कासार व आदिनाथ पागिरे आणि स्वागताध्यक्ष बाळासाहेब साखरे असा आमचा ग्रुप तयार झाला.गावातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या कलागुणांना संधी मिळणे या हेतूने आम्ही सारे एकत्र आलो आणि या सर्व मुलांना एकत्र आणता- आणता, आम्ही देखील एकत्र कधी आलो कळलेच नाही..आमच्यात नकळत मैत्री निर्माण झाली..लहान मुलांसोबत आम्ही देखील लहान झालो.. दर्जेदार पुस्तके मुलांनी जिंकली.एकेक मुलांचे नृत्य,गायन व कथाकथन ऐकून या मुलांना प्रचंड मोठी दाद मिळत होती.त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाचे नियोजन करताना प्रत्येकजण जबाबदारीने व विचारपूर्वक काम करत होता...सगळ्यांची काम करण्याची पद्धत काबिलेतारिफ होती.अशोक सरांनी ज्याला जे काम दिले होते, त्याने ते काम एकदम व्यवस्थित चोख पार पाडले. त्यामुळे कार्यक्रम एका वेगळ्या उंचीवर गेला.गावातील लोकांनी व रसिकांनी आमच्यावर विश्वास टाकला आणि 'न भूतो न भविष्यती' अशी अलोट गर्दी कार्यक्रमाला लाभली..हेच आमच्या मैत्रीने तयार केलेले एक फार मोठे यश होते.कार्यक्रम संपताना प्रत्येकाचे डोळे भरून आले होते. मैत्रीच्या बाबतीत असे म्हणतात...आपले नातेवाईक जन्मानेच आपल्याला मिळालेले असतात,पण आपले मित्र-मैत्रिणी तरी आपण निवडू शकतो हे देवाची कृपाच म्हणायला हवी.अनेक वेळेला रक्ताच्या नात्यापेक्षा स्नेहाचे नाते अधिक जवळचे होऊन जाते. बऱ्याच जणांची मैत्री ही अतूट असते अगदी चिरकाल टिकते पण अनेकजण शालेय, कॉलेज जीवन संपले की मैत्री पण संपते. समाजात वावरताना स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीव झाली की,मैत्रीच्या संबंधापासून दुरावत जातात मग कधीतरी रस्त्यात भेट झाली की,नाही तर आपण अनुभवलेल्या अतूट नात्याची आठवण झाली च तर फोनवर विचारपूस करतात. आजच्या काळात फोन, मोबाइल, इंटेरनेट यामुळे जग जवळ आले असेले तरी माणसे एकमेकांशी दूर जाऊ लागली आहेत.

पुर्वी लोक पत्रव्यवहार करून-मैत्री टिकवत असे,आता मात्र इंटेरनेटचा उपयोग करून मैत्री करू लागलेत.ना ओळखणारी, एकमेकाना न भेटलेली, न बघितलेली माणस ही इंटेरनेट मुळे मैत्री करू लागली आहेत. पण त्याच्यातील मैत्री भावनिक दृष्ट्या उच्च पातळी गाठू शकते का ? उपकरणाद्वारा एकमेकाबदल काळजी, आस्था , प्रेम वाटू शकते का? या प्रश्नांना जन्म देत आहे. आपण जसेजसे मोठे होत जातो तसेतसे मैत्रीची व्याख्या बदलत जाते, शालेय जीवनात तारुण्यातील गमती-जमती शेयर करायला मित्र – मैत्रीणी ची साथ हवी असते. त्यापुढे जीवनात येणाऱ्या अनेकविध अडचणीतून मार्ग काढण्यासाठी योग्य ते मार्गदर्शक म्हणून मित्र-मैत्रीणी हवे असतात. पुढे वृद्धापकाळात एकाकी, समाजापासून दुर्लक्षित झाल्यामुळे जीवनाची अंतिम वाटचाल सुखाची व्हावी म्हणून मित्र -मैत्रिणी हवे असतात.

वर्षानुवर्षे मैत्रीचे नाते हे असेच चालू राहील, पिढ्या बदलल्या, माणसे बदलली, नवीन शोध लागले, जग बदलेले,तरीही मैत्री हे असे नाते आहे जे कधीच बदलणार नाही ते बदलूच शकत नाही म्हणूनच मैत्रीचे नाते जपायला हवे, एकमेकांमधे द्वेषभाव विसरून सगळ्यानी मैत्रीच्या नात्याने एकत्र आले पाहिजे. सगळ्यांमध्ये मित्रता नांदली पाहिजे.ही भविष्यकाळातील माणूस म्हणून सुखी जगण्याची खरी ओळख असेल.या कार्यक्रमाने मला माझ्या हक्काचे मित्र दिले... ज्यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले...हेच प्रेम आणि मैत्री मला आयुष्यभरासाठी कायम स्मरणात राहणार आहे..अजून या मैत्रीच्या टीमला खूप काही करायचे आहे..अनेक संकल्प आहेत..सगळ्या गोष्टी होण्यासाठी पुन्हा आम्ही एकत्र येणार आहोतच..तूर्तास सलाम या मैत्रीला...

# वैविध्यपूर्ण विषयांनी बहरलेली प्रीतफुले



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**साहित्य निर्माण करणारी व्यक्ती ही सर्वसामान्यांपैकीच एक असते. मात्र जीवनातील अनुभव घेण्याची तिची दृष्टी आणि आपली दृष्टी यामध्ये फरक असतो म्हणूनच ती लेखक व कवी बनते. सर्वसामान्य माणूस अत्यंत व्यवहारी दृष्टिकोनातून भोवतालचे जग पाहत असतो. त्यातून त्याला आवडलेले, त्याने अनुभवलेले, त्याच्या भावनांना कितपत व्यक्त करायचे याच्या मर्यादा आखून तो स्वतःचे लेखन करीत असतो. तसेच निसर्गाकडे व समाजाकडे बघून ते जीवन व ते सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न साहित्यातून सुरु असतो. म्हणजे सत्य दृष्टीतून तो कल्पनाविश्व उभे करीत असतो.**

'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' अशी संस्कृत मीमांसक जगन्नाथ यांनी केलेली काव्याची व्याख्या आहे. तर पाश्चात्य साहित्यशास्त्रकार कोलरिज यांनी 'उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे काव्य' अशी काव्याची व्याख्या केलेली आहे. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करणारी कविता सर्वांनाच भावते. लय, ताल, नादयुक्त रचना मनाला भुरळ पाडतात.

ज्येष्ठ पत्रकार, लेखक, कवी बाळासाहेब तोरस्कर यांचा 'प्रीतफुले' हा काव्यसंग्रह जीवनातील सर्व भाव- भावनांनी ओथंबलेला आहे. भक्ती, माया, प्रेम, विरह, निसर्ग, सामाजिक, प्रबोधनात्मक अशा विविधांगी काव्यछटा या काव्यसंग्रहात अनुभवायला मिळतात. यातील कविता छंदात्मक असल्याने वाचताना सहजता जाणवते आणि अर्थबोधही होतो. मनातल्या शुद्ध भावना कवी तोरस्कर यांनी सहजगत्या व्यक्त केल्या आहेत. कवी तोरस्कर हे अभ्यासू आणि हसरे व्यक्तिमत्त्व. अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. सातत्याने ते साहित्यिक वर्तुळात वावरत असतात. अनेक मानाच्या पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. शिक्षण घेत असतानाच त्यांना कवितालेखनाची आवड निर्माण झाली आणि ती ऊर्जा आणि स्फूर्ती त्यांनी आजही टिकवून ठेवली आहे, हे विशेष.

'प्रीतफुले' काव्यसंग्रहाची सुरुवात 'गणेश वंदन' या कवितेने होते.

**वंदन करितो तुज गणेशा**
**पुरी करावी माझी आशा ||**

गणरायाचं नामस्मरण करून कवीने ही काव्यांजली त्या बुद्धिदात्याला अर्पित केली आहे.

'ब्रह्मानंद', 'देवदर्शन', 'वारी वारकऱ्याची', 'भक्तिरस' या कवितांमधुन भक्तिभाव निर्मळ झऱ्याप्रमाणे प्रवाहित झाल्याचे दिसते.

**आई तुझे प्रेम अपार**
**जसा उसळता अथांग सागर**
**तव प्रेमाची साक्ष देतसे**
**अनंत असे आकाश निळसर !!**


'आई' या कवितेतून आईच्या मायेची, वात्सल्याची जाणीव, आईविषयीच्या आपल्या प्रत्येकाच्या असणाऱ्या भावना कवीने शब्दबद्ध केल्या आहेत. 'प्रीतफुले', 'मनमोहिनी' या कवितेतुन प्रेमभाव सुन्दररित्या व्यक्त झाला आहे. किती नेमक्या आणि सुयोग्य शब्दात मनाची घालमेल या कवितेतुन कवीने मांडली आहे.

**'अगा विधाता ! तुझी विविधता किती असे ही महान,**
**पाताळ स्वर्गही जिच्यापुढे लवते आपुली मान !"**

'अगा विधाता' या कवितेतून आपल्या भारत देश किती वैविध्यपूर्ण आहे, सर्वधर्मसमभावाचं प्रतीक आहे, किती महान आहे, त्याची पार्श्वभूमी यात प्रगट होते. 'उपासक' ही कविता माणसात देव पाहा आणि भुकेलेल्या अन्न द्या, हा मोलाचा सन्देश देणारी आहे. 'पराक्रमाची गाथा' आणि 'बंड' ह्या कविता मनात नवचेतना जाग्या करतात. 'पाऊस मुंबईचा' या कवितेतून पावसाची विविध रूपे आणि त्यामुळे माणसाची उड़णारी तारांबळ चित्रित केली आहे.

समाज कितीही प्रगतिपथावर असला तरी जाता जात नाही ती जात. आजही जातिपातिच्या कारणांवरुन खुन, मारहाण ह्या गोष्टी घड़ताना दिसून येतात. जात समाजाच्या मनात इतकी खोलवर रुजली आहे की ती माणसाकडे माणुस म्हणून पाहण्याची वृत्तीच नष्ट झाली आहे. जातिव्यवस्थेवर भाष्य करणारी 'जातिधर्म' ही कविता डोळ्यात अंजन घालणारी आहे. माणुसकीचा धर्म जपा ही शिकवण देणारी ही कविता आहे.

कवी तोरस्कर यांची ही प्रीतफुले भक्तिभाव, निसर्ग, सामाजिक, प्रेम, मनातील तळमळ, देशप्रेम, वीररस या सगळ्या भावनांचा सुगंधी दरवळ देणारी आहेत. समाजाविषयी आंतरिक तळमळ त्यांच्या कवितांमधून जाणवते. मनाच्या या सर्व भाव- भावना एकत्रित अनुभवण्यासाठी ही 'प्रीतफुले' नक्की आपल्या ओंजळीत घ्या !




# युगंधर



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**मराठी साहित्यात रोज नव्याने अनेक कथा, कादंबऱ्या, ललित लेखनाची पुस्तके दाखल होत आहेत. आजच्या काळाला अनुसरून, वर्तमानाचे दाखले देत, आजची आव्हाने आणि काळानुरूप होणारे बदल या नवीन साहित्यात परावर्तित होत आहेत. ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. ज्या प्रमाणे पाया भक्कम असेल तर त्यावर उभी राहिलेली इमारत देखील तशीच भक्कम असते, त्या प्रमाणे मराठी साहित्याचा पाया देखील अशाच कसदार साहित्य कृतींमुळे आपली पाळेमुळे खोलवर रुजलेला आहे ज्यावर आजच्या फळाफुलाला आलेला साहित्याचा बहर दिमाखाने उभा राहिलेला आपल्याला बघायला मिळतो.**




अशाच लोकप्रिय आणि अजरामर साहित्यकृती पैकी एक म्हणजे म्हणजे शिवाजी सावंत यांची 'युगंधर' ! आजकालच्या अनेक पुस्तक परीक्षणात म्हंटले जाते की एखादे पुस्तक एका बैठकीत वाचून काढले, तशी ही कादंबरी नाही! महाभारत, कृष्ण, भगवदगीता आणि श्रीमदभागवत या विषयांवर ज्यांना वाचायला, लिहायला, चर्चा करायला आणि अभ्यासपूर्ण चिंतन करायला आवडते अशांसाठी उत्कृष्ट अशी ही कादंबरी! कादंबरी म्हणण्यापेक्षा 1000 पानांचा एक ग्रंथच आहे असे आपण म्हणुया!

या ग्रंथाचे लेखन करताना लेखकाने त्याविषयाशी निगडित वाचन, मनन, चिंतन आणि संशोधन केले आहे हे आपल्याला कादंबरी वाचतानाच लक्षात येते. भाषेवर, शब्दांवर असलेले प्रभुत्व, विषयाची सुसंगत मांडणी, मुद्देसूद घटना क्रम, वाक्य रचना हा एक परिक्षणाचा नाही तर स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. कादंबरी वाचताना अर्जुन, सात्यकी आणि उद्धव (कृष्णचा सर्वात जवळचा सखा, अविवाहित, कृष्णाचा चुलतभाऊ म्हणजे वसुदेवाच्या भावाचा आणि कंसाच्या बहिणीचा मुलगा) अशी व्यक्तिमत्व आपल्याला भेटतात आणि असे व्यक्ती आपल्याला कथा सांगत जातात. ज्यांना कृष्ण ज्याला जाणून घ्यायचा आहे त्यांना ह्या कादंबरीतून तो नक्कीच जाणून घेता येईल. वर्णनात्मक आणि माहितीपर असा या लेखनाचा बाज आहे. महाभारत काळातील प्रसंग, व्यक्ती, यांचे जसेच्या तसे वर्णन यात वाचायला मिळते. उदाहरणार्थ कणीदार दह्याच्या कवड्या आणि तो रुक्मिणीच्या हातचा ओदन! घटोत्कचाच्या पोटाचे वर्णन करतांना लेखक त्याला पालथ्या काळ्या कढईची उपमा देतो.

प्रस्तावनेत लेखक म्हणतात की एक माणूस म्हणून कृष्ण कसा होता, कसा जगला हे मांडण्याचा प्रयत्न या लेखनात केला आहे. आपल्याला माहीत असणारे, अनेक ठिकाणी वाचनात आलेले प्रसंग यात वगळले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना माहीत नसलेल्या अनेक प्रसंगांबद्दलची माहिती वाचकांना मिळते. अनेक नाविन्यपूर्ण आणि कधीही न ऐकलेल्या गोष्टी मात्र यात वाचायला मिळतात. राधेला सुद्धा लेखकाने थोडेसेच दाखवले आहे. कृष्णाच्या शरीराचा रंग नेमका कसा होता हे दाखवायला लेखकाने वापरलेली उपमा उल्लेखनीय आहे.

कृष्णाच्या जीवनात सांदीपनी आणि घोर अंगिरस हे दोन गुरू येतात. यापैकी घोर अंगिरस हे कालांतराने जैन धर्म स्वीकारतात ही माहिती आपल्याला यात कळते. कृष्ण बलराम यांच्यातील नाते वाचकांसमोर योग्य पद्धतीने समोर येते. तसेच बलराम कौरवांकडे कसा आणि का झुकतो हेही वाचकांना कळते.


सुदामा कृष्ण यांची भेट फक्त शिक्षण घेतांना आणि पोहे आणतो तेव्हा होत नाही तर नेहमी द्वारकेत होत राहते हेही नव्याने कळते. एकंदरीत कादंबरीतील सर्वच ऐतिहासिक व्यक्तिरेखांची स्वभाव वर्णन वाचणे हा रंजक आणि नावीन्यपूर्ण अनुभव आहे. कृष्णाच्या जीवनातील संपूर्ण घटनाक्रम आणि व्यक्ती, स्थळे यांची माहिती मिळवायची असेल तर एकमेवाद्वितीय अशी युगंधर कादंबरी वाचकांनी नक्की वाचावी.

# मरण पावलेल्या नऊ मजुरांच्या नातेवाईकांसाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली मदत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चंद्रपूर-मूल महामार्गावर अजयपूर येथे झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नऊ जणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. अजयपूर गावाजवळ काल रात्री पेट्रोल टँकर आणि ट्रकमध्ये अपघातानंतर मोठी आग लागून ट्रकमधील नऊ मजुरांचा होरपळून मृत्यू झाला होता. मुख्यमंत्र्यांनी या घटनेवर शोक व्यक्त केला असून आर्थिक मदत जाहीर केली आहे.

अजयपूर गावाजवळ गुरुवारी मध्यरात्री रात्री २ ट्रकमध्ये भीषण अपघात झाला. डिझेल वाहतूक करणारा टँकर आणि लाकूड नेणाऱ्या ट्रकमध्ये समोरासमोर धडक झाली. अपघातानंतर टँकरमधील डिझेलमुळे भीषण आगीचा भडका उडाला. ट्रकचे टायर फुटल्याने आग अधिकच पसरली. मूल-चंद्रपूर अग्निशमन पथकाने मोठ्या प्रयत्नांनंतर ही आग विझवली. मात्र ही आग इतकी भीषण होती की मरण पावलेल्या सर्व नऊ जणांचे मृतदेह या आगीत जळून खाक झाले. या दुर्घटनेत मरण पावलेल्यांना मदत केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाच्या अधिकृत ट्विटर हॅण्डलवरुनही देण्यात आली. चंद्रपूर-मूल महामार्गावर अजयपूर येथे झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ९ जणांच्या कुटुंबियांप्रती मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शोक व्यक्त केला आहे. तसेच प्रत्येकी ५ लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्याची घोषणा केली आहे, असे ट्विट मुख्यमंत्री कार्यालयाच्या ट्विटर हॅण्डलवरुन करण्यात आले.



# पुरुषाचा माणूस झाला पाहिजे

आधुनिक केसरी



डॉ. लेखिका मेश्राम
meshramlekhika@outlook.com

**महिलांवर नेमके कोणकोणत्या प्रकारचे अन्याय, अत्याचार होत असतील असे वाटते? घरगुती हिंसाचार, यात हुंड्यासाठी मारहाण, प्रसंगी जिवे मारणे, मनाविरुद्ध शरीरसंबंधांसाठी पतीची बळजबरी, कधी सासरा-दीर, वडील-भाऊ यांची बळजबरी, सासूचा जाच, आईनेच पोटच्या मुलीला वाममार्गाला लावणे... वगैरे गोष्टी येतात. याशिवाय बलात्कार, मानसिक घुसमट, मनाविरुद्ध लग्न होणे, पुढे शिकायला न मिळणे, लायकी असूनही केवळ स्त्री म्हणून बढतीची किंवा कोणतीही संधी नाकारली जाणे... अशा कितीतरी गोष्टींतून आपण म्हणजे समाज बायकांवर अन्याय -अत्याचार करत असतो. पण यापेक्षाही वेगळ्या पद्धतीने महिलेवर अन्याय -अत्याचार केला जाऊ शकतो, याचा कोणी विचारही केलेला नसेल. कदाचित तशी उदाहरणे असतीलही, पण अजून तरी ती समाजापुढे आलेली नाहीत.**

आयएएस अधिकारी शाह फैजल यांनी फेसबुकवर एक पोस्ट टाकली आहे. त्यांच्या एका महिला सहकाऱ्याने दिलेल्या राजीनाम्यासंदर्भात ही पोस्ट आहे. वर वर दिसायला हे प्रकरण खूपच साधे, नेहमीचे वाटते; पण ते तसे नाही. खूप गुंतागुंतीचे, गंभीर, विचार करायला प्रवृत्त करणारे आहे. एकविसाव्या शतकाच्या गप्पा करणाऱ्या आपल्यापुढे अनेक प्रश्न उभे करणारे आहे.


**पत्नीच्या नावे राजीनामापत्र...**

शाह फैजल यांना एक दिवस एक पत्र मिळाले. त्यांच्या एका महिला सहकाऱ्याचे ते राजीनामा पत्र होते. इंग्रजीत लिहिलेल्या या पत्रात राजीनाम्याचे काही विशिष्ट कारण दिलेले नव्हते, पण आता सरकारी नोकरी करायची नसल्याचे त्यात म्हटले होते. सध्या नोकऱ्या सहजासहजी मिळत नाहीत. अशा काळात हाती असलेली नोकरी कोणी सोडतंय म्हणून शाह यांना आश्चर्य वाटले. पण एखाद्याची इच्छाच असेल तर काय? म्हणून त्यांनी ते पत्र पुढील कारवाईसाठी आपल्या सहकाऱ्याकडे दिले. सगळी तपासणी होऊन काही महिन्यांनी पुन्हा ती फाइल शाह यांच्याकडे आली. ती फाइल चाळत असतानाच एक महिला तीरासारखी त्यांच्या केबिनमध्ये शिरली.

तिने इकडे तिकडे बघितले आणि शाह यांच्या हातातील फाइल हिसकावून घेतली. कोणाला काही कळण्याच्या आत आतील कागदपत्रे तिने फाडून टाकली. ती महिला तिथेच बसकण मारून जोरजोरात रडू लागली. काही वेळाने शाह यांना कळले, की काही महिन्यांपूर्वी ज्या महिलेने राजीनामापत्र पाठवले होते आणि आत्ता जिची फाइल आपल्या हातात होती, ती हीच महिला आहे. तिच्याही नकळत तिच्या नवऱ्याने तिचे राजीनामापत्र पाठवून दिले होते. कारण एकच तो तिच्यापेक्षा कमी शिकलेला होता. त्याच्याकडे नोकरी नव्हती आणि बायको नोकरी करते, कमावते, यशस्वी होते हे त्याला बघवत नव्हते... आणि आता "मला माझ्या मुलांसाठी नोकरी करायची आहे," असे ती परोपरीने शाह यांना विनवत होती. शाह म्हणतात, "या महिलेला तिच्या एका सहकाऱ्याने ही माहिती दिली होती. ती अगदी वेळेत आमच्यापर्यंत पोचली." महिलेवरील अन्यायाचा हा प्रकार मला तरी नवीन आहे. म्हणजे पत्नीची प्रगती न बघवणे, तिच्या प्रगतीत खो घालणे; प्रसंगी नोकरी सोडण्यासही तिला भाग पाडणे हे प्रकार कोणालाच नवीन नाहीत. पण पत्नीच्या नकळत तिच्या नावाने, तिचे राजीनामापत्र पाठवणे ही गोष्ट नुसतीच गंभीर नाही तर भयावहही आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावर तर हा घाला आहेच, पण पती-पत्नी या नात्याला, त्यांच्यात अपेक्षित असलेल्या विश्वासाला तडा देणारा आहे. हा तडा कसा भरून निघणार? गमावलेला विश्वास कसा परत मिळवणार? मग मनात प्रश्न येतो, इतक्या थराला जाणाऱ्या माणसाला नातेसंबंधांची खरेच इतकी चाड असेल का? असती तर त्याने आपली मर्यादा ओलांडलीच नसती. महिलांनी सावध राहावे, असे प्रत्येक जणच म्हणतो, पण ज्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्या आपले सगळे आयुष्य ज्याच्यावर सोपवतात, त्या पतीपासूनही सावध राहण्याची वेळ त्यांच्यावर यावी, या दुर्दैवाला काय म्हणावे? अर्थातच सगळे पुरुष-पती असे नसतात किंवा अशा घटनाही रोज रोज घडत नसतात, तरीही शंकेला वाव उरतोच. एका घटनेवरून कोणताही निष्कर्ष काढू नये, तरीही ज्याच्या मनातच पाप आहे अशी समविचारी मने पुन्हा असे कृत्य करणारच नाहीत, याची कोणीच खात्री देऊ शकत नाही.

**बाईकडेच नैतिकतेची मक्तेदारी!**

एखाद्या बाईवर कोणत्याही प्रकारचा अन्याय-अत्याचार झाला, की पहिल्यांदा तिला नैतिकतेचे धडे दिले जातात. तिच्या पेहरावापासून तिच्या वागण्या-बोलण्यापर्यंत सगळ्यावर जोरदार मतप्रदर्शने केले जाते. तिच्यावर अन्याय करणाऱ्या पुरुषावर मात्र अभावानेच टीका होताना दिसते. बलात्कारासारख्या गंभीर प्रकारातही समाज स्त्रीला जेवढा दोष देतो, तेवढा पुरुषाला देत नाही. त्यामुळेच अन्याय झालेल्या स्त्रीवर तोंड लपवून राहण्याची



किंवा आत्महत्या करण्याची वेळ येते. पुरुष मात्र राजरोस सगळीकडे वावरू शकतो.

कुठल्याही शाळेत बघा, मुलांपेक्षा मुली अधिक प्रगती करताना दिसतात. बालसुधारगृहातही मुली कमी आणि मुलगेच अधिक दिसतात. तुरुंग, व्यसनमुक्ती केंद्रांतही मुलगेच अधिक दिसतात. रस्त्यावर दंगा करणारे, दगडफेक करणारे, विचित्र हेअरकट करून रस्त्यात कुठेही पचापच थुंकणारे मुलगेच असतात. तरी देशात कुठेही थोड्याफार फरकाने अशीच परिस्थिती दिसते. हे सगळे बघता, भविष्यात किती नवरे आपल्या पत्नीच्या नकळत तिचा राजीनामा पाठवणार आहेत, याबद्दल चिंता वाटते. एकूणच या परिस्थितीवर उपाय काय?

**विशेष वागणूक नको**

आपल्या समाजात पुरुषांना नेहमीच विशेष वागणूक मिळत आली आहे. याउलट महिलांना मिळणारी प्रत्येक संधी ही तिच्यासमोर टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यासारखीच असते. खूप कमी मुली भाग्यवान असतात, ज्यांना सहजपणे शिकता येते, मनासारखे वागता येते. पण बहुतांश मुलींना संधीची वाट बघत तिचा लाभ घ्यावा लागतो. त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो, खूप झगडावे लागते. सगळ्या गोष्टी सहजपणे, आयत्या मिळणाऱ्या काही पुरुषांना आणि काही भाग्यवान महिलांना याचे मोल समजणार नाही. त्यामुळे महिलांवरील अन्याय - अत्याचार कमी करायचे असतील तर याची जाणीव समस्त पुरुषवर्गाला (खरे तर महिलांनाही) करून द्यायला हवी. (अनेक पुरुषांना याची जाणीव महिलांपेक्षाही अधिक असते, त्यांचा अपवाद आहेच, पण हे प्रमाण वाढायला हवे). त्यासाठी अगदी घरापासून प्रयत्न व्हायला हवेत. दुसरे म्हणजे, महिलांनीच घाबरणे वगैरे सोडून सजग व्हायला हवे. खंबीर व्हायला हवे. आपल्या हक्कांची तिला जाणीव असावी आणि ते तिने वापरावेत. तसेच वर उल्लेख केला, त्याप्रमाणे पुरुषांवर आता 'संस्कार' व्हायला हवेत. त्यामध्ये त्याच्या मनातील आणि इतरांच्याही मनातील तो 'पुरुष असल्याचा' अहंगंड पहिल्यांदा दूर करावा, त्याच्या मनातील असुरक्षितता कशी दूर करता येईल हे बघावे, त्याच्या जबाबदारीची जाणीव करून द्यावी. त्याचबरोबर समाजमनही बदलण्याचा प्रयत्न करावा. कारण या सगळ्या गोष्टी समाज नावाचा 'पुरुष'च करत असतो. हा 'पुरुष' एकदा 'माणूस' झाला, की त्याच्यासाठीही खूप काही बदलेल...


# सिटी ऑफ ड्रीम्स : रक्तरंजित सत्तासंघर्ष

आधुनिक केसरी

**अहंकाराला कुरवाळणारी सत्ता, सत्ता मिळवण्यासाठी पैसा, पैसा मिळवण्यासाठी दमबाजी/गुंडगिरी आणि त्यामुळे मिळालेली अनिर्बंध सत्ता ! आणि हे सगळं दुष्टचक्र सुरू असतं, तेव्हा कुटुंबाकडे सपशेल दुर्लक्ष... नुसते दुर्लक्षच नाही तर अविश्वास, द्वेष यांची बीजे लहानपणीच रुजवली जाण्यात हातभार !! घरातल्या निखळ आनंदाच्या बाबींना बायपास करून सत्ता आणि पैसा यांच्यामागे धावत सुटणाऱ्या स्वार्थी, अहंकारी व उन्मत्त माणसात माणूसपण शिल्लक राहिलेलं नसतं, त्याचं मदांध व रक्तपिपासू जनावरात रूपांतर झालेलं असतं !!!**

## चित्रपट परीक्षण





नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

अतुल कुलकर्णी यांनी रईस या सिनेमात शस्त्रास्त्र साठवून दहशतवाद्यांना विकणाऱ्या दादागुंडाची भूमिका उत्तम वठवली होती, शाहरुखखानपेक्षा भारी होती ती. या सिरीजमध्ये निम्म्या भागांत अर्धांगवायूने पलंगाला खिळलेल्या हतबल मुख्यमंत्र्याची ताकद त्याच्या डोळ्यांतून व किंचित हलणाऱ्या हातावरून दिसते. आणि इतर वेळेस त्याचा सत्तेचा माज, खुनशीपणा, थंड डोक्याचे क्रौर्य त्याच्या संवाद व मुद्राभिनय यांद्वारे पोचवण्यात अतुल कुलकर्णी यशस्वी ठरले आहेत.

प्रिया बापटने अशा बापाची अगदी त्याच्याविरुद्ध स्वभावाची, नैतिकता जपू इच्छिणारी, वडिलांच्या प्रेमाला आसुसलेली, प्रसंगी निष्ठुरही वागणारी मुलगी नीटच उभी केली. सिद्धार्थ चांदेकरने आयत्या आरामात लोळणारा, चैनीला चटावलेला, मठ्ठ मुलगा व्यवस्थित दाखवला. सचिन पिळगावकर यांचा स्वामीनिष्ठ नोकर काही काळानंतर मालकाच्या घरातल्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन बेइमानी करत कसा स्वतःची लयलूट करून घेतो, हे डोळ्यांच्या माध्यमातून आणि दिखाऊ गोड गोड बोलण्यातून हुबेहुब उतरवले आहे. छोट्या पण महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये आदिनाथ कोठारे, संदीप कुलकर्णी, उदय टिकेकर यांनी चांगली साथ केली आहे . ऐजाजखान यांचा धाडसी पोलिस इन्स्पेक्टर, नंतरचा राजकारणातला एकनिष्ठ व इमानदार हस्तक हा रोल संस्मरणीय ठरला आहे.

बाप, मुलगा व मुलगी या तिघांचे समान वैशिष्ट्य आहे - एकमेकांना दगा देऊन सत्तेच्या मागे जाणे, आपल्या माणसांची जबाबदारी टाळून त्यांची ताबेदारी हाती ठेवणे, कोणत्याही मार्गांनी पैसा व सत्ता मिळवणे, त्यासाठी काहीही करण्याचा विधिनिषेध




नसणे. या सगळ्या अवैध व गैर गोष्टी करताना घरातल्या अर्धवट वयातल्या मुलाचा, त्याच्या मनाचा शून्य विचार करणे आणि त्याच्या वाढाळ वयाची अजिबात जाणीव नसणे. एकमेकांमधले द्वेषपूर्ण संबंध ताणले जात असताना त्या कोवळ्या निरागस जिवाला बेफाम निष्काळजीपणे दुर्लक्षित ठेवणे या सगळ्याची परिणती काय होते ? अखेर कोणाच्या पदरात काय पडते ? परिणामी काय घडते ? हे पडद्यावरच पाहणे बरे !

नागेश कुकनूर यांचे दिग्दर्शन प्रभावी आहे. राजकारण हेच मध्यवर्ती वातावरण असल्याने हिंसा, लैंगिकता, शिवराळ भाषा अटळ असणारच. राजकीय नातेसंबंधात कोणीच आपला नसतो आणि सगळे आपले होऊ शकतात. आजचा मित्र उद्याचा शत्रू आणि बरोबर उलटेही घडू शकते. जाड, संवेदनाशून्य कातडीची व्यक्तीच राजकारणात निर्ढावलेपणाने वागू शकते. हळव्या, संवेदनशील मनुष्याचा त्यात बळीच जातो. आज एक तर उद्या विरुद्ध टोकाचे वर्तन असे नाटकी/खोटे वागणे जमले नाही तर अशा कमकुवत व्यक्तींचा गुलाम म्हणून वापर केला जातो. राजकारण हा घाणेरडा खेळ आहे हे या सिरीजमुळे प्रेक्षकांना नक्कीच पुराव्यांनिशी पटते आणि ते उद्विग्न होऊन जातात. हॉटस्टार या ओटीटी प्लटफॉर्मवर ही वेबसिरीज पाहता येईल.

# उडू उडू रे : उद्धव साहेब

आधुनिक केसरी

**अखिल भारतीय राष्ट्रीय राजकीय पक्ष शिवसेना आणि त्या पक्षाचे अखिल भारतीय पक्ष प्रमुख श्रीमान उध्दव साहेब ठाकरे यांनी परवा मुंबईत मोठ्ठी सभा घेतली. पडेल खासदार चंद्रकांत खैरे पून्हा संभाजीनगरच्या हक्काच्या मतदारांसमक्ष उताणे पडले, त्यांच्याच पक्षप्रमुखाचे बोलण्याने. उध्दवराव म्हणाले औरंगाबाद चे नाव संभाजीनगर करण्याची गरजच काय? ज्या हिंदुत्वाचे जोरावर आणि औरंगजेबाला लाखोली वाहात चंद्रकांत खैरे औरंगाबाद चे नाव बदलून संभाजीनगर करण्याचे आश्वासन देत मते मागत होते. पण त्यांचेच पक्ष प्रमुख त्यांचेच समक्ष त्याची गरज नाही म्हणाले.**

आपल्या विकृत मनोवृत्तीचे दर्शन घडवित उध्दव साहेब म्हणाले देवेंद्र फडणवीस बाबरी पाडायला गेले होते म्हणे, कसे शक्य आहे. ते पाळण्यातून गेले होते वाटते. त्यांना उटपटांग बोलण्याची सवयच आहे. बाबरी पडली तेंव्हा देवेंद्र फडणवीस नागपूर महानगरपालिकेत भाजपचे सर्वात तरूण नगरसेवक म्हणून निवडून आलेले होते. नंतर त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. आयुष्यात एकही निवडणूक न लढवलेले, वडीलांचे पुण्याईने पक्ष प्रमुख झालेले उध्दव साहेबांना किती वय असल्यावर निवडणूक लढवता येते हे ही माहीत नसेल. मुख्यमंत्री झाल्यावर सहा महीन्याचे आंत आमदार होणे गरजेचे होते. कोविड मुळे निवडणूका लांबत होत्या तेंव्हा नरेंद्र मोदींचे पाय धरूनच ते आमदार बनू शकले. एक जागा भाजपाला देण्याचे बदल्यात आमदारकीची भिक्षा पदरात पाडून घेतली होती. घ्यावी लागली होती. त्याही वेळी सवयीप्रमाणे तिरकी चाल चालत विधानपरिषदेचे सहा जागांसाठी निवडणूक घ्यायची तयारी मोठे साहेब करत होते. तेंव्हा हेच उध्दवसाहेब सरकारचा राजीनामा देतो असे धमकावत होते. आणि अतिशय केवीलवाण्या पध्दतीने कसेबसे आमदार झाले. पण खाल्ल्या ताटात छेद करायची सवय असल्याने ते सतत भाजपावर आणि नरेंद्र मोदींवर टीका करत असतात. बुजदिल लोग ही बाप के नाम का सहारा लेते है या उक्ती प्रमाणे स्वकर्तुत्व शुन्य असल्याने ऊठसूट बाळासाहेबांचे नावाचा सहारा घेत असतात. मी आज अडुसष्ट वर्षाचा आहे. मी उभ्या आयुष्यात एवढा घाबरट, धांदरट, बोलघेवडा राजकारणी पाहिलाच नाही. महाराष्ट्र सरकार चालवणे म्हणजे रोज सकाळ पासून रात्री पर्यंत देवेंद्र फडणवीस यांचेवर टीका करत राहणे असेच वाटते बहूतेक. देवेंद्र फडणवीस यांचे वजन,माप काढणे, टरबुज्या म्हणून उल्लेख करणे, एवढेच त्यांना जमते. परवा म्हणे शक्ती प्रदर्शन करत भव्य सभा घेतली. परंतू उपस्थित श्रोते पाहील्यावर ते जमवलेले आहेत हे लक्षात येत होते. नेहमीचा जोश, घोषणाबाजी कांही नव्हते. जमवलेला समुदायही एवढे सुमार भाषण ऐकुण कंटाळला होता.

भाषणात नविन कांहीच नव्हते. ना सरकारच्या कामांचा पाढा वाचला, ना विकासाचे बाबत कांही योजना सांगितल्या. अर्धावेळ देवेंद्र फडणवीस यांचेवर टीका करण्यात आणि बाकी अर्धा वेळ राज ठाकरेंना मुन्नाभाई म्हणत आपल्याच डोक्यात केमिकल लोच्या झाल्याचे सिध्द केले. मान्य की राज ठाकरे दर सहा महिन्यांनी नवीन विषय घेऊन पुढे येतात, भूमिका लावून घरत नाहीत. परंतू जे पण विषय घेतात ते जोशपूर्ण आणि बाळासाहेबांची आठवण करून देणारे असतात. पवार साहेब आणि सोनियाजींचे दबावा खाली धड हिंदूत्वावर ठामपणे बोलता येत नाही आणि मग आमचेच हिंदूत्व खरे असे मरगळलेल्या, आत्मविश्वास शुन्य आवाजात उसणे आवसान आणत म्हणने शोभलेच नाही. कांहीच विषय नसला आणि मुंबई मराठी माणसांची म्हणायचे असले की भाजपा मुंबई ला महाराष्ट्रापासून तोडणार, आम्ही हे होवू देणार नाही म्हणत बोंबाबोंब करायची हे नेहमीचेच आहे.

मुंबई महानगर पालिका दिर्घकाळ शिवसेनेचे हातात असूनही दरवर्षी पावसाळ्यात दुर्दशा ठरलेलीच. त्यावर चकार शब्द बोलले नाहीत. स्टॅंडिंग कमिटी चे यशवंत जाधव आणि त्यांचा भ्रष्टाचार यावर अवाक्षर काढला नाही. कसे बोलणार यशवंतरावांचे डायरीत मातोश्री वर अडीच कोटी आणि महागडे घड्याळ पोहोचवल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे चिडीचूप. सरकारच्या एकाही उल्लेखनिय निर्णयाचा उल्लेख ही करता आला नाही. मात्र संपूर्ण भाषणातून स्वतः च्या अकलेचे दिवाळे जाहीर झाले. त्या सभेतील उध्दव साहेबांचे भाषणाने नुकसान झालेच तर ते फक्त शिवसेनेचे होणार आहे. बाळासाहेबांचा वाघ आणि स्वतः बाळासाहेब परवाचे भाषण ऐकुण शरमिंदे झाले असतील. काल देवेंद्र फडणवीस यांनी मात्र उत्तर सभा घेऊन सगळ्या मुद्यांचे धिंडवडे काढले. अत्यंत खिलाडू वृत्तीने वैयक्तीक टीकेवर दिलखुलासपणे व्यक्त होवून आपली वैचारिक, सामाजिक, राजकीय उंची मात्र अधोरेखित करून दुसऱ्याची रेघ लहान करण्यासाठी ती न खोडता आपली मोठी रेष काढली की दुसऱ्याची आपोआप लहान होते असेच फडणवीस यांचे भाषण होते.

पीपीएम, पुणे

तुकारामनीती
भाग 9

# लोक जैसा ओक धरितां धरवेना



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**लोककवी तुकोबाराय म्हणजे सहज बोलत बोलत समाजाच्या सर्वांगीण हिताचा विचार करून उपदेश करणारे सामांन्यातून सर्वमान्य झालेले असामान्य व्यक्तिमत्व ! लोकांचा लोकधर्म जवळून निरखणारे तुकोबा म्हणजे महान समाज सुधारक ! कोणत्याही शस्त्र-अस्त्राविना समाजाच्या सर्वांगाचे पोस्टमार्टेम करून सडेतोड विश्लेषण करणारे अलौकिक रसायन, शास्त्रज्ञ म्हणजे संत तुकाराम ! त्यांचे अभंग वाङ्मय ही एक विशालकाय वास्तू असून दैनंदिन समाज व्यवहाराचे चिंतन-मंथन याच वास्तुद्वारे तुकोबांकडून सदोदित होत आले आहे. सर्वसामान्य माणसांचे जगणे आडमार्गाने जात असतांना संत-वचने योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य करतांना वाटेतील भेदाचे आणि अज्ञानाचे काटे बाजूला सारण्याचे काम सर्वच संतांनी केले आहे. देव-ईश्वर आदि संकल्पना स्पष्ट करतांना तुकोबा त्यांच्याशी सरळ संवाद साधतांना दिसतात. त्यांचे लेखन-प्रबोधन हे दैनंदिन जीवन आणि व्यवहार याचा परस्पर संबंधाचा मेळ बसवून आपले प्रबोधन-बीज समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे महत्कार्य तुकोबा सहजतेने करतांना दिसतात. अगदी याच प्रकारे संत कबीरजी आपल्या दोह्यामधून प्रबोधन करतांना लोकांना सहजच उपदेश करतात.**

**जहाँ दया तहा धर्म है, जहाँ लोभ वहां पाप ।**
**जहाँ क्रोध तहा काल है, जहाँ क्षमा वहां आप ।**

असे दोहे लिहून समाजाला खरी ईश्वरानुभूती करून देण्याचं काम संतांनी केलं. धर्म आणि तत्ससंबंधी विचार प्रकट करतांना कबीरांनी दया-क्षमा आणि राग-लोभ याचा पाप-पुण्य या दोन संकल्पना स्पष्ट करून लोकांना उपदेश केला आहे. अगदी याच अनुषंगाने समाजातील माणसांचा दैनंदिन लोकव्यवहार कसा स्वार्थी आणि संकुचित आहे याचे सुंदर विवेचन तुकोबाराय या अभंगातून करतात.

**ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥१॥**
**संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥ध्रु.॥**
**आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥२॥**
**संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासि ज्ञान नाहीं ॥३॥**
**धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ॥४॥**
**बहु बोलों जातां म्हणति हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥५॥**
**भेटिसि न वजातां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ॥६॥**
**लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ॥७॥**
**निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥८॥**
**लोक जैसा ओक धरितां धरवेना । अभक्ता जिरे ना संतसंग ॥९॥**
**तुका म्हणे आतां ऐकावें वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ॥१०॥**
**(शा.अ.गाथा अ.क्र. २५९)**

लोकमत आणि त्याचे विविध पैलू तुकोबांच्या या अभंगातून स्पष्ट होतात. समाजाचे दुटप्पी व्यवहार तुकोबा या अभंगातून सांगतांना त्यांना आलेले अनुभवच त्यांनी या अभंगाद्वारा विषद केले आहेत. समाजाने आतापर्यंत कोणत्याच माणसाला दुषणे दिल्याशिवाय सोडले नाही. तुकोबाराय लौकीकाविषयी या अभंगामध्ये मोठ्या सहजतेने लिहून अपना सर्वांना जागृत करून लोकधर्म विषद करतात. लोकव्यवहार मोठा विचित्र असून कोणतीच गोष्ट समाज माणसाला करू देत नाही. संसार करणाऱ्या माणसाला हा कोशात अडलेला किडा आहे, आणि जर त्याने संसार केला नाही तर त्याला हा निव्वळ भुईला भार आहे असे म्हणतात. एखाद्याने धर्माचे व्यवस्थित आचरण केल्यास याने पसारा वाढवला आहे म्हणतात, तर कोणतेच आचरण केले नाही तर हा आचरणभ्रष्ट आहे असे म्हणून समाज हिणवत राहतो. एखादा संतांच्या संगतीने राहिला तर हा उपदेशी आहे, आणि संतसंग केला नाही तर मूर्ख आहे अशी दुषणे लावतील. लोक गरिबाला कपाळ करंटा तर श्रीमंताला अहंकारी म्हणून संबोधतात. एखादा माणूस बोलका आहे म्हणून त्याला बडबड्या



म्हणतील, तर एखादा मितभाषी असेल त्याला गर्विष्ठ म्हणून बोलावतील. एखादा माणूस नातेवाईकांच्या भेटीला गेला नाही तर निष्ठुर म्हणतील आणि वारंवार जायला लागला तर येता-जाता घर बुडव्या म्हणून चिडवतील. एखाद्याने लग्न केले तर माजला म्हणतील आणि नाही केले तर नपुंसक म्हणून त्याला दोष देतील. एखाद्याला मुलं-बाळ नसेल तर निपुत्रिक म्हणतील, जास्त मुले असतील तर पोरवडा वाढवून ठेवला म्हणतील. हा सगळा लोक व्यवहार पाहून तुकोबाराय व्यथित होतात आणि या सर्व लोकव्यवहाराला 'ओकारी' ची उपमा देतात, ज्याप्रमाणे माणसाला आलेली उलटी थांबवून ठेवता येत नाही त्याप्रमाणे लोकव्यवहार रोखून किंवा थांबवून जीवन जगणे कुणालाही शक्य नाही, तसा अभक्त माणसाला संतसंग सहन होत नाही. तेंव्हा यावर सरळ-सोपा उपाय म्हणजे 'ऐकावे जणाचे आणि करावे मनाचे' या म्हणीप्रमाणे आपण लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपल्याला योग्य वाटेल तेच करावे असा सल्ला तुकोबाराय आपणांस देतात. प्रत्येक वाचकाने हा अभंग अत्यंत काळजीपूर्वक वाचवा, कारण आज आपण सर्व मिडीयावर वावरत आहोत आणि त्यावेळी कोण काय प्रतिक्रिया देतो याकडे सावधपणे पाहणे गरजेचे आहे. आजसुद्धा हा अभंग आपणास तंतोतंत मार्गदर्शक ठरतो. या अभंगातून आपण माणसांची माणसाकडे पाहण्याची नजर कशी आहे ( ?) हे लक्षांत येते. जीवनामध्ये कोणतीही कृती करतांना सद्सदविवेक जागृत ठेवून विचार आणि कार्य करणे गरजेचे आहे. विवेक माणसाला पथभ्रष्ट होऊ देत नाही. तेंव्हा हा अभंग वर्तमानात असो किंवा भविष्यकाळात असो, अत्यंत कळीचा आहे. सर्वत्र प्रतिक्रिया देणाऱ्या लोकांचे वारूळ उठलेले असतांना हा अभंग बुडत्याला सुकाणूचा आधार होऊन आपल्यासोबत उभा आहे. तुकोबांचा हा अभंग सर्वकाळ सोबत ठेवण्यासारखा आहे, याचे कारण म्हणजे आपण सर्वजण 'सबसे बड़ारोग, क्या कहेंगे लोग' यामध्ये गुरफटलेलो असतांना आपल्याला सामान्य माणसांचा गुणधर्म लक्षांत घ्यावा लागेल. सामान्य माणूस कुणाविषयी काय चर्चा करतो ( ?) हे महत्वाचे असून त्याच अनुषंगाने हा अभंग अत्यंत महत्वाचा आहे.

आज तुकारामनीती अंतर्गत विवेचनाकरिता घेतलेला अभंग हा दहा चरणांचा असून हे दहा चरण म्हणजेच पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कामेंद्रीये यांना मार्गदर्शक आहे. संत-विचारवंत हे त्रिकालात विचार करून त्यापलीकडचे चिंतन आपल्या लेखणीद्वारे निर्माण करून ठेवत असतात. त्यांना कोणताही काळ हा बंधनात ठेऊ शकत नाही. आज या विचारांची नितांत आवश्यकता असून दैनंदिन जगणे हे मोठे आवाहनात्मक झाले असतांना आपण लोकांच्या प्रतिक्रियांकडे सहजतेने पाहून, त्यांचा साधक-बाधक विचार करून जीवन व्यतीत करणे क्रमप्राप्त ठरते. आज भोवताल पाहत असतांना सर्वच गोष्टींचे स्तोम वाढले आहे. योग्य-अयोग्य याची निवड करणे कठीण होऊन बसले असतांना आपल्याला हा अभंग पथदर्शी ठरतो आहे. संत तुकोबांच्या या अभंगाकडे पहिले असता आपल्या हे लक्षात येते की; तुकोबाराय केवळ भजन-पूजन करणारे वारकरी नव्हते, तर त्यांनी आपल्या विचारांच्या फाळाने येथील जमीन भुसभुशीत करून सामान्य लोकमतांची खोलवर नांगरणी केलेली दिसून येते. माणसांचे सामान्य गुणधर्म तुकोबा सहजतेने लिहून जागृती करत गेले आणि आजही करत आहेत. त्यांच्या अभंगांचा हा अनमोल ठेवा सर्वकाळ-सर्वांना मार्गदर्शक असून आपण सर्वानीच त्याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे आणि जीवन आनंदी करणे क्रमप्राप्त आहे.

आज सगळीकडे धर्म-जात-रंग अन कट्टरतेचे वादळ उठले असतांना, भरकटलेल्या जीवन नौकेला तुकोबांचे अभंग होकायंत्राच्या रूपाने मार्गदर्शक ठरणारे आहेत.

आजचा लोकव्यवहार त्यांच्या या अभंगातून आपल्यासमोर येत असून लोक काय प्रतिक्रिया देतात याचे अवलोकन करावे आणि नंतरच अपण त्याचा साधक-बाधक विचार करून आपल्या जीवनात ते अंगीकारावे. असे झाले की मगच खऱ्या अर्थाने या अभंगाचे सार्थक होणार आहे. नाहीतर समाजाच्या सर्वच प्रतिक्रिया गांभीर्याने घेतल्यास आपल्यावर 'गाढव नदीत फेकून पश्चाताप करणाऱ्या बापलेकासारखी' वेळ येईल आणि कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही. 'तेलही गेले, तूपही गेले आणि हाती धुपाटणे आले' अशी वेळ येऊ नये यासाठी नित्य जागृत असणे अत्यंत गरजेचे आहे. तेंव्हा चला तर मग आपण आपले वर्तन सुधारून घेऊ आणि लोकांच्या प्रतीक्रीयाकडे डोळे झाकून न पाहता तसेच त्यांना आपल्या जीवनाला लावून न घेता आपले जीवन विवेक-विचाराने पूर्ण करून घेवूयात! हाच महत्वपूर्ण संदेश तुकोबा या अभंगाद्वारा देतात आणि तो आपण अंगीकारून जीवन सफलतेच्या मार्गाने पुढे घेऊन जाऊयात !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# सुगम संगीत सोपं असतं...?

**गाण्याचं शिक्षण घेताना : भाग 23**



दिनेश संन्यासी
संपर्क क्र. 9611687940

आधुनिक केसरी

**सुगम या शब्दाचा अर्थ सहज सोपे असा होतो. सुगम संगीत म्हणजे सहज गाता येते ते. शब्दाचा अर्थ किंवा व्याख्या यातील शब्दशः अर्थ घेतला म्हणजे आपण गळ्यातून केव्हाही आणि कसंही गाणं काढलं की ते सहज येतं आणि चांगलं येतं, असा नकळत अर्थबोध करून घेतला जात असतो. आणि त्यानुसार शास्त्रीय संगीत शिकायला अवघड असतं. त्यामुळे आम्ही ते न शिकता, सुगम संगीत शिकतो, कारण की ते सोपं असतं म्हणून. हा समज की गैरसमज? याविषयी आजचा लेख लिहीत आहे.**



कोणतं संगीत चांगलं, कोणतं संगीत वाईट, कोणतं संगीत सहज येत असतं, कोणतं संगीत अवघड असतं, हा माझा विषय नाही. वारकरी संप्रदायातील काही व्यक्ती जेव्हा भेटतात तेव्हा ते सहज मान्य करतात की आम्ही गातो; पण काय गातो ते आमचं आम्हालादेखील कळत नसतं. आम्हाला एक विशिष्ट चाल कळते आणि त्यानुसार आम्ही अभंगांचे गायन करत असतो. (खरं तर चाल म्हणजे एखादा राग असतो. फक्त तो कोणता, त्याचे नियम, त्यांच्यासाठी नसतातच, आणि त्याचं पालन झालंच पाहिजे असा आग्रहही नसतोच) पण त्या चालीच्या आधारे ते त्यांच्या गोड गळ्यानी "आनंदाचे डोही आनंद तरंग" असं वातावरण निर्माण करत असतात आणि मनसोक्तपणे, देहभान विसरून त्याचा आनंद घेत असतात. खरं तर संगीताचा उद्देशच तो असतो. तो म्हणजे मनस्वी आनंद घेणं. ज्ञान न घेता, स्व आनंदासाठी कुणी कसंही गात असेल, तर ते ठीक आहे. (फक्त ऐकणाऱ्याला गळ्यातून बंदुकीच्या गोळ्या निघतात असा कटू अनुभव येऊ नये इतकंच) पण संगीताचं शिक्षण घेत असणाऱ्या व्यक्तीने गायनाचे किमान नियम, जे अत्यावश्यक असतात आणि सहज सांभाळले जाऊ शकतात, ते नियम पायदळी तुडवत गाणं कितपत योग्य म्हणावं? ज्यांना निसर्गतःच छान, सुरेल आवाज आहे. गाण्याची समज उत्तम आहे. अशांनी छोट्या-मोठ्या नियमांची माहिती करून गायन करणं, हे त्यांचं गाणं आणखीनच चांगलं करण्यासाठी उपयुक्त ठरतं. जे आत्मसात करायला खूप काही अवघड नसतात. अगदी सहज येऊ शकतात. मानवाने मानवाच्या आनंदासाठी जी कला निर्मिली तिला लोककला म्हटले जाते. पण तिलादेखील नियम असतात. मग सुगमसंगीत ज्यात भावगीत, भक्तिगीत, गझल, सिनेगीत इत्यादी प्रकार येतात त्यांना नियम नसतील असं कसं होईल? मुळात संगीत हे भावनाप्रधान असतं; सुगम संगीत त्याचाच प्रकार आहे. गाण्यातील भावनेला समरूप होऊन गाणं सुगम संगीतात अतिमहत्त्वाचं ठरतं. त्याच सोबत गाणं कुठल्या भाषेत आहे, त्या भाषेचे उच्चार व्यवस्थित करता येणं, भाषेला आणि शब्दोच्चारणाने अर्थाला हानी न पोहोचणे, हे सर्वात महत्त्वाचे असते. त्यासाठी भाषेचा अभ्यास आलाच. मराठी भाषकांना जेव्हा हिंदी गाणी गाण्याचा प्रसंग येतो त्या वेळी हिंदीचे उच्चार मराठीसारखे भासायला नकोत. हे ऐकण्यासाठी वाचण्यासाठी जरी सोपं वाटत असलं; तरी त्याच्या अभ्यासासाठी मेहनत घ्यावीच लागते. सुगम गाताना स्वतःच्या आवाजाच्या क्षमता आणि मर्यादा लक्षात आल्या पाहिजेत. आवडीचं गाणं गाता येणं आणि गळ्याला ते पेलेल असं गाणं गाता येणं यात फरक आहे. प्रत्येकाचा आवाज हा निसर्गतः वेगळा असतो. म्हणून खूप जास्त उंच स्वराचं गाणं ऐकायला छान वाटत असतं. पण ते गळ्यातून काढणं हे आपल्या गळ्याच्या क्षमतेवर आधारलेलं असतं. विनाकारण ओढून ताणून तसा आवाज काढण्याचा प्रयत्न करणे; किंवा त्या स्वरात बळजबरीने गाण्याचा प्रयत्न करणे चांगल्या आवाजला हानी पोचवू शकतं. सर्वात जास्त महत्त्वाचे स्वरात गाणे. तालातील खंडानुरूप लयीला धरून गाणे अतिमहत्वाचे असते. या ठिकाणी शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाची आवश्यकता असते.


आपण ज्यांना ऐकतो त्यांचं गाणं आपल्याला खूप मनापासून आवडत असतं. उदाहरणार्थ स्वर्गीय भारतरत्न भारताची गानकोकिळा असलेल्या लतादीदी. ऊर्फ लता मंगेशकर, यांचे एक उदाहरण आपण डोळ्यासमोर ठेवू. त्यांना जन्मतःच छान आवाज होता. त्यात त्यांनी शास्त्रीय गायनाचा देखील सखोल अभ्यास केलेला होता. युट्युब वर त्यांनी गायलेला राग मालकंस आहे, तो सर्वांनी ऐकावा, त्यांच्या मुलाखती ऐकाव्यात. ज्यात त्यांनी शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाचे महत्त्व सांगितलेलं आहे.

रियाजाने काय होते? ज्यांना निसर्गतः आवाज आहे ते सहज गाऊ शकतात. पण ज्यांना म्हणावा तसा निसर्ग नाही, आवाजात सहजता नाही, या बाबी रियाजाने येऊ शकतात. रियाजाने आवाजातील सहजता वाढते, स्वरांचं प्रभुत्व वाढत, स्वर लगाव सुधारतो, सरांची स्पष्टता वाढते, त्यामुळे सुगम गाताना त्याचा परिणाम जाणवतो. गाणं सहज शक्य होतं, श्वसनाची क्षमता वाढते, गळ्यात सहजता येते त्यामुळे भाव संगीतात गायल्या जाणाऱ्या हरकती सहजतेने निघू शकतात. जर गळ्यातील हरकती सहज येत नसतील तर ते गाणं रुक्ष भासतं. ऐकणाऱ्याला भावत नाही. शास्त्रीय संगीताच्या आवाज लगावात आणि सुगम संगीताच्या आवाज लगावात फरक आहे. हे समजून घेण्यासाठी रियाज करणं आवश्यकच असतं. पण रियाजाला पर्याय नाही हे तितकंच खरं आहे.

माझ्याकडे येणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये गळा दाबून, चिरकलेला आवाज काढण्याची सवय म्हणजे एक गंभीर चूक अंधानुकरण केल्यामुळे वाढलेली दिसते. सारखं उंच स्वरातील गाणं ऐकून, नकळत त्याच्या मागे मागे गायल्यामुळे तसं झालेलं असतं. स्वतःच्या आवाजाच्या क्षमता न लक्षात घेतल्यामुळे स्वरयंत्रावर परिणाम झाल्याचंही जाणवतं असतं. शिवाय सातत्याने चुकीच्या पद्धतीने गाण्याची सवयदेखील लागलेली असते. एखाद्या गायकाने गायलेलं गाणं शिकायचं असतं; त्याचा आवाज शिकायचा नसतो. यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक असतं, आणि तेही योग्य वेळी. जगातील वाट्टेल ते संगीत गाणं हे आपलं व्यक्तीस्वातंत्र्य झालं, आपली आवड झाली, पण ते योग्य पद्धतीने गाण्यासाठी उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे ज्ञानार्जन करणे हे आपल्या हातात आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया रियालिटी शो मध्ये बसलेले परीक्षकसुद्धा देत असतात. त्यातली पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी दिलेली एक सुंदर प्रतिक्रिया मला आठवते.

एका सादरीकरणानंतर त्यांनी सांगितले होते की, चांगल्या गायकाने दररोज सकाळी तानपुरा लावून शुद्ध स्वरांचा रियाज केलाच पाहिजे.

# शेतकरी पारतंत्र्य दिवस



अमर हबीब
संपर्क क्र. ८४११९०९९०९

आधुनिक केसरी

**आपण ज्या महात्म्यांचा आदर करतो, त्यांची पुस्तके वाचत नाहीत, त्यांच्या वचनांचे आचरण करीत नाहीत. ज्या ग्रंथांबद्दल श्रद्धाभाव असतो, ती आपण वाचलेली नसतात. अनेक धर्मांच्या अनुयायांमध्ये त्यांच्या धर्मग्रंथांचे अध्ययन केलेले अभावानेच दिसून येतात. पण त्या महात्म्याबद्दल किंवा धर्मग्रंथाबद्दल कोणी ब्र काढला तर त्यांचे अनुयायी अक्षरश: तुटून पडतात. धर्मग्रंथ आणि महात्मे यांच्या बाबत जी विसंगती दिसून येते, तशीच विसंगती भारतीय राज्यघटनेबद्दल देखील दिसू लागली आहे. घटना आणि कायद्याचे काही कळत नसले तरी 'खबरदार' वगैरे भाषा वापरली जाते. या श्रद्धाभावाचा अनेकजण गैरफायदा घेतात.**

मी एका सभेत लोकांना विचारले की, 'तुमच्या पैकी किती जणांनी भारतीय राज्यघटना वाचली आहे, कृपया हात वर करा.' कोणाचाच हात वर झाला नाही. मला वाटले, विचारण्यात काही चुकले असेल म्हणून लोकांच्या लक्षात आले नसेल. पुन्हा विचारले, तरी कोणीच हात वर केले नाही. मी प्रश्नात दुरुस्ती केली व विचारले की, तुमच्या पैकी किती जणांनी भारतीय राज्यघटनेचे पुस्तक पाहिले आहे? दोन जणांचे हात वर झाले. चौकशी केली तर कळले की, ते दोघे वकील आहेत आणि भारतीय राज्यघटना त्यांच्या अभ्यासक्रमात होती. ती अभ्यासक्रमात नसती तर किती जणांनी अभ्यासली असती कोणास ठाऊक?

'घटना बचाव' करणार्यांची मी काही व्याख्याने ऐकली. त्यात ते घटनापीठाने तयार केलेल्या घटनेची माहिती देतात. त्याचा गुणगौरव करतात. पण मला प्रश्न पडतो की, घटनापीठाने तयार करून दिलेले संविधान आज जसेच्या तसे राहिले आहे का? त्यात काही बदल झाले नाहीत का? (१९५१ ते २० पर्यंत १०४ घटनादुरुस्त्या झाल्या. त्यांनी घटनेत ३७३ बदल झाले.) हे बदल योग्य होते का? केलेल्या बदलामुळे मूळ घटना बळकट झाली का दुबळी झाली? भारतीय नागरिकांवर या घटनांदुरुस्त्यांचा काय परिणाम झाला? याच्याबद्दल ते अवाक्षार काढीत नाहीत. मूळ संविधानाचा सम्मान जरूर करू. कारण ते स्वातंत्र्य आंदोलनातील योद्ध्यांनी तयार केले, या देशाला मिळालेले ते पहिले संविधान आहे. पहिल्यांदा देशातील नागरिकांना अनेक अधिकार या घटनेने दिले. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण गेल्या सत्तर वर्षात केलेल्या घटनादुरुस्त्यांनी मूळ घटनेचा श्वास कोंडला गेला, हेही सांगायला हवे की नाही? आज एवढ्या वर्षांनंतर घटनेबद्दल बोलायचे असेल तर घटनादुरुस्त्यांचा आढावा घेणे अनिवार्य आहे, आणि तुम्ही तो घेत नसाल तर काही तरी असे लपवित आहात, जे कोणाच्या तरी फायद्याचे आहे. असा अर्थ काढावा लागेल. तुम्ही नव्या पिढीची दिशाभूल करीत आहात असा आरोप तुमच्यावर ठेवता येईल.

**पहिली घटनादुरुस्ती**

आपली घटना तयार करायला साधारणपणे तीन वर्षे लागली. २६ जानेवारी १९५०ला ती देशाने स्वीकारली. तीन वर्षे प्रदीर्घ चर्चा करून संविधान तयार करणारे घटनापीठ हेच आमचे हंगामी पार्लमेंट होते. तेंव्हा प्रौढ मतदानावर आधारित निवडणूक झालेली नाव्हती. ती काही महिन्यात होणार होती. राज्यसभा अजून अस्तित्वात आलेली नाही. थोडे थांबा, असे अनेक मान्यवरांनी सुचवून पाहिले पण काही परिणाम झाला नाही. हंगामी संसदेने अवघ्या दीडच वर्षात म्हणजे १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती केली. या दुरुस्तीने आपल्या घटनेवर मोठा आघात झाला. जाणकार मानतात की, या दुरुस्तीने नवी घटनाच साकार झाली. अनुच्छेद ३१ ए व बी जोडण्यात आले. त्यानुसार नवे ९ वे परिशिष्ट तयार करण्यात आले. मूळ घटनेत आठच परिशिष्टे होती. ३१ बी मध्ये म्हटले आहे की, या ९व्या परिशिष्टात ज्या कायद्यांचा समावेश केला जाईल, ते कायदे न्यायालयाच्या कक्षेच्या बाहेर राहतील. 'काही कायदे न्यायालायच्या कक्षेच्या बाहेर राहतील' यासाठी पहिली घटनादुरुस्ती करण्यात आली. लोकांच्या स्वातंत्र्याची कक्षा वाढविण्यासाठी पहिली घटनादुरुस्ती झाली नाही. अनुच्छेद-३२ नुसार न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार देण्यार आला आहे. त्यालाच या दुरुस्तीने निष्प्रभ करून टाकले. थोडक्यात असे की, घटनेत असे एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले की, ज्यात टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही. या दुरुस्तीने संसद, कार्यसमिती व न्यायालय यांचे संतुलन बिघडवून टाकले. त्याच बरोबर या दुरुस्तीमुळे नागरीकांच्या नैसर्गिक अधिकाराचे हनन झाले.

या घटनादुरुस्तीचे औचित्य आणि वैधते विषयी कायदा आणि घटनातज्ञ भाष्य करतील. मी एक कार्यकर्ता आहे. तब्बल सत्तर वर्षांनंतर पाहताना मला जे काय दिसते, तेवढेच मी सांगू शकतो. परिशिष्ट ९ मध्ये आज २८४ कायदे आहेत. त्या पैकी सुमारे अडीचशे कायदे थेट शेती आणि शेतकर्यांशी निगडित आहेत. उरलेल्या पैकी बहुतेक कायद्यांचा शेती आणि शेतकऱ्यांशी संबंध येतो. असे का योगायोगाने होते? शेती आणि शेतकऱ्यांशी संबंधित कायदेच तेवढे या परिशिष्टात का आले? शेतकर्यांना न्यायालयाची दारे का बंद करण्यात आली? हे काही गफलतीने झाले नसून जाणून बुजून झाले आहे, असे मला वाटते.

ही घटनादुरुस्ती करताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'ही व्यवस्था फक्त या १३ कायद्यांसाठी केली जात आहे.' असे म्हटले होते. संसदेत जाहीर आश्वासन दिले होते. पण पंडित नेहरू यांच्या हयातीत म्हणजे १९६४ पर्यंत या परिशिष्टात सुमारे ६० कायदे समाविष्ट करण्यात आले होते. पुढच्या पंतप्रधानांचे विचारायलाच नको. त्यांना आयता तयार पिंजरा मिळाला होता. शेतकऱ्यांचे कायदे या पिंजऱ्यात टाकायचा त्यांनी सपाटाच लावला.

सीलिंग म्हणजे कमाल शेतजमीन धारणा कायदा. या कायद्यात कमाल धारणेची मर्यादा फक्त शेत जमिनीवर टाकली आहे. अन्य जमिनीवर नाही. हा कायदा शेतकरी आणि इतर व्यावसायिक यात उघड पक्षपात करतो. समान संधी, व्यावसाय स्वातंत्र्य, मालमत्तेचा अधिकार नाकारणारा हा कायदा आहे. संविधानाच्या



मूळ सिद्धांताच्या विरुद्ध असूनही इतके दिवस तो कायम राहिला कारण तो परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आला होता. त्यांच्या विरुद्ध न्यायालयात जाण्यास बंदी घालण्यात आली. परिणाम काय झाला? शेतजमिनीवर सिलिंग लावल्यामुळे कल्पक उद्योजक व व्यावसायिकांनी शेतीकडे पाठ केली. शेतकर्यांच्या कंपन्या तयार होऊ शकल्या नाही, शेतीत भांडवल आटले व नवी गुंतवणूक थांबली. जमिनीचे लहान लहान तुकडे झाले. शेत जमिनींचा आकार इतका लहान झाला की, त्यावर गुजराण करणे देखील अशक्य झाले. शेवटी शेतकर्यांना आत्महत्या कराव्या लागल्या. एवढे अनर्थ करणारा हा कायदा टिकून राहिला. त्याचे एकमेव कारण परिशिष्ट-९ आणि पहिली घटना दुरुस्ती हे आहे. आवश्यक वस्तू कायदा १९५५ देखील एक घटना दुरुस्ती करूनच आला. १९७६ साली इंदिरा गांधी सरकारने तो परिशिष्ट-९ मध्ये टाकला. हा कायदा शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी वापरण्यात आला. एवढेच नव्हे तर हा कायदा लायसन्स, परमीट आणि कोटा राज निर्माण करणारा आहे. सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचाराची जननी आहे. या कायद्यामुळे शासन पोषित राजकीय संस्कृती तयार झाली. या कायद्यामुळे ग्रामीण भागात कारखानदारी सुरु होऊ शकली नाही. शेतकऱ्यांना मूल्यवृद्धीचा व किसानपुत्रांना रोजगाराचा लाभ मिळू शकला नाही. व्यावसाय स्वातंत्र्यावर उघड हल्ला चढवणारा हा कायदा देखील परिशिष्ट-९ मुळेच सरकारला बिनधास्तपणे वापरता आला. घटनाकारांनी मालमत्तेचा अधिकार मुलभूत अधिकार म्हणून दिला होता. सरकारला त्याची अडचण वाटत होती. सरकारला जमीन अधिग्रहण करण्याचा निर्विघ्न अधिकार हवा होता. सीलिंग, आवश्यक व्वस्तू, जमीन अधिग्रहण हे तीन कायदे विषारी साप आहेत. या सापांची अनेक पिल्ले आहेत. परिशिष्ट-९ हे या विषारी सापांचे आश्रयस्थान आहे. वारूळ आणि साप असे त्यांचे नाते आहे. मुळात साप मारायचे आहेत म्हणून वारूळ उध्वस्त करायचे आहे. शेतकरीविरोधी नरभक्षी कायदे हे लक्ष्य आहे.

हे कायदे लागू राहिल्यामुळे शेतकऱ्यांची वाताहत झाली. १८ जून ५१ रोजी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीमुळे हे कायदे राबविता आले. सुमारे चार लाख शेतकर्यांना आत्महत्या करावी लागली म्हणून १८ जून हा दिवस किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने शेतकरी पारतंत्र्य दिवस म्हणून पाळला जातो.

पहिल्यांदा २०१८ साली मुंबईला पहिला कार्यक्रम झाला. पुढच्या वर्षी पुण्यात झाला. २०२० ला लॉकडाऊन असल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही. 2021 साली ऑनलाइन कार्यक्रम झाला. 2022ला स्वातंत्रतावादी शेतकरी नेत्यांच्या उपस्थितीत पुण्यात पदयात्रा. व वैयक्तिकरित्या किसानपुत्र काळ्या फिती लावून हा दिवस स्थानिक पातळीवर यशस्वी करणार आहेत.

# विधवांना मिळणार सन्मान : शासनाचे पुरोगामी पाऊल



अंजली श्रीवास्तव
संपर्क क्र. ७७०९४६४६५३

आधुनिक केसरी

**हजारो वर्षाची विधवांच्या मनातली खदखद आज कुठं तरी विसावते आहे. शासनाच्या या निर्णयाचं मी आणि माझं मंडळ माझं गाव सहर्ष स्वागत करीत आहोत. या गोष्टीला उशीर झाला असला तरी देर आए दुरुस्त आए म्हणायला हरकत नाही मुळीच. नाही तरी महिलांच्या संदर्भातल्या कुठल्या गोष्टी सहजतेने निर्णय घेऊन मोकळ्या झालेल्या आहेत. शासनानं आज हा निर्णय घेतला असला तरी विधवांच्या याच प्रश्नावर माझं माझ्या मंडळाचं कार्य करमाळकरांना नवं नाही.**

संक्रांत हा सण हळदीकुंकवाचा सवाष्ण स्त्रियांचा सण हे कोणी ठरवून टाकलं होतं कोण जाणे. पण पर्याय म्हणून आम्ही शिक्षणासाठी मुलगी दत्तक घेऊन तिळगुळ देऊन समस्त स्त्री वर्गा सोबत हा सण साजरा करत आलो आहोत. हा विचार गेल्या तीस वर्षांपासून सातत्याने चालू आहे. आज आयुर्मान कमी झाले आहे.कमी वयात महिलां विधवा होऊ लागल्या. त्यांची मानसिक पडझड त्यांच्या आतला कोलाहल खरंच कुटुंब आणि समाजानं जाणून घ्यायला हवा होता. अगदी सतरा अठरा वर्षा पूर्वी माझ्या बहिणीच्या संदर्भात हे घडलं. तरुण वय. म्हणून समाज विरोध पत्करून तिला मंगळसूत्र टिकली लावण्याचा अधिकार आहे. हे ठासून सांगितलं. आजही ती विधवांची लक्तरं सोडून सन्मानानं जगते आहे. आज सगळ्या मंगल कार्यक्रमात तिचा सहभाग आम्ही करवून घेतो.



अगदी परवा म्हणजे गेल्या महिन्यात माझ्या मुलीच्या लग्नाच्या सवाष्ण कार्यक्रम होता. मी विधवा, सवाष्ण सगळ्यांनाच समान सन्मान दिला. जे नवरा असणार्या बाईला वस्तू देतात गजरा हळदकुंकू लाल हिरव्या काचेच्या बांगड्या ओटी, मेंदी कोन, महावर आणि खूप काही. त्याच सगळ्या मंगल वस्तू मी नवरा नसलेल्या ताईंना पण दिल्या. हा मानसिक दुबळा भेद नकोच नं आम्हा बायकात. आज शासनानं हे पुरोगामी पाऊल उचलून खूप मोठा निर्णय घेतला.(१७ मे२२) नवरा चितेवर जाण्याआधी तिचं कुंकू पुसणं, तिची जोडवी उतरवणं, मंगळसूत्र काढणं ह्या जीवघेण्या जाचक प्रथा बंद करणं हा निर्णय खरंच स्वागतार्ह आहे. तिला आणखी मानसिक रित्या दुबळी बनवून टाकणं हे खरंच चुकीचं आहे. या जाचक परंपरेतून आज ती मोकळी होताना दिसतं आहे. मी माझ्या कथा, कविता, कादंबरी व्याख्यानातून, विधवा बाईला सशक्तच दाखवली आहे.

काय म्हणालास?
हा ठसठशीत लाल कुंकूवाचा टिळा
माझ्या नावाचा कोरताना
कसं वाटतंय?
मुळात हा प्रश्नच चुकीचा आहे...
लाल कुंकू अन् पांढरं कपाळ
या दोन्ही रंगानं
बाईचं अस्तित्व का ठरावं?
मी म्हणते!
बाईच्या संदर्भातले हे
पुरुषी प्रश्न...
का संपू नयेत अजूनही?

अशा कितीतरी कविता बाईच्या प्रश्ननांवर आवाज उठवणाऱ्या आहेत. प्रबोधन करणाऱ्या आहेत. बाई या किचकट जाचक गुंत्यातून सुटणं खरंच खूप महत्त्वाचं होतं. बाईला मूल होत नाही म्हणून ती वांझ ठरवली जाते. पण तिच्या नशिबी मातृत्व नसलं म्हणून काय झालं आपण तिच्या स्त्रीत्वाचा सन्मान करु या नं! या गोष्टींचा ही विचार व्हायला हवा. या आनंदाच्या भरात एक सांगायचं राहूनच गेलं. विधवा स्त्रीला कुंकू लावायला गेलं तरी नको म्हणायची.तुडुंब भरलेल्या डोळ्यांनी ती विरोध करायची. कधी कधी माघार घ्यावी लागायची मला.

तिला भीती कोणाची होती?, घर आणि समाजाचीच ना?

पण आता
अंधार सारुन
लख्ख उजाडलय सारं
नवरा नसलेल्या बाईंचं जगणं ही.. आता कुठं हळूहळू उतरु
पहात आहे
समाज मनावरचं ओझं...!!

आता सवाष्ण विधवा ही फट ही दरी बाजूला सरली आहे.

सगळ्या ग्रामपंचायती मध्ये असा ठराव घेऊन आपण पुरुषांच्या सारखं जगू या. (पुरुषांना विधूर म्हणून वेगळी ओळखही नाही आणि जाचक बंधनं ही नाहीत. किती छान जगतात पुरुषं.) हे वाक्य मी कंसात यासाठी लिहिलं की कळायला हवं समाजव्यवस्थेला की पुरुषांना कुठल्याच वाईट प्रथेविरुध्द लढावं लागत नाही. पण बायांच्या या प्रश्ननांवर जेव्हा पुरुष ही साथ देतो तेव्हा निश्चितच या चांगल्या गोष्टी घडत राहतात. पुन्हा एकदा शासनाने उचललेल्या पुरोगामी पावलांचं निर्णयांच मनापासून आभार.

**(लेखिका वक्ता आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत)**


# वंजारी समाजाच्या सांस्कृतिक विकासाचे प्रतीक

आधुनिक केसरी

**औरंगाबाद शहरात सिडको भागातील वंजारी मंगल कार्यालयात (भवन) जाण्याचा योग आला. माजी सनदी अधिकारी भास्करराव मुंडे यांनी कार्यालयाची इमारत, सुविधा, नवीन योजना, अडचणी याबाबत सर्व फिरुन दाखविले. तेव्हा त्यांनी किती मन लावून सार्वजनिक वास्तु उभी केली. याचीच प्रचिती आली. भास्कर मुंडे यांच्याकडे वंजारी विकास मंडळाची सुत्रे आली आणि दोन दशकापासून अपूर्ण असलेले कार्यालय काही महिन्यात पूर्ण झाल्याने ही इमारत भास्करराव मुंडे यांच्या प्रामाणिक व विश्वासाची प्रतिक झाली. तर दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या समाजाच्या सांस्कृतिक विकासाचे हे प्रेरणा केंद्र ठरले आहे.**

दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी भाजप सेना युतीच्या काळात कम्युनिटी सेंटर साठी तब्बल अर्धा एकर (वीस हजार स्क्वेअर फुट) जागेचा भूखंड मंडळाला दिला होता. स्थानिक पातळीवरील ताळमेळा अभावी भवनाचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे अर्धवट अवस्थेतील वास्तु सुविधा अभावी खिंडार झाली. सार्वजनिक काम उभे करणे सोपे नसते. मुळात आक्रमक, राजकीय दृष्ट्या संवेदनशिल समाजात तर सार्वजनिक काम उभे करणे तारेवरची कसरतच असते. एखाद्या कामात सल्ले द्यायला, प्रश्न विचारायला कोणीच मागे नसते मात्र प्रामाणिकपणे काम उभे करायला फारसे कोणी पुढे येत नाही आणि आले तरी त्यांना काम करू दिले जात नाही हा सार्वजनिक अनुभव. अशा परिस्थितीत मंडळाच्या सर्व संचालकांनी एकमताने अध्यक्षपदाची जबाबदारी माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंडे यांच्याकडे दिली आणि त्यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू झाले.

प्रशासनात दीर्घकाळ सनदी अधिकारी म्हणून उत्तम काम केलेले भास्कर मुंडे, शिस्तीचे व प्रामाणिक म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांच्या शब्दाला प्रशासनात आणि समाजात महत्त्व आहे. सामाजिक जाणीव असल्याने त्यांनी मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. त्याच वेळी हे अर्धवट काम पूर्ण होण्याचा विश्वास होता. काही महिन्यातच त्यांनी अंतर्गत ताळमेळ जुळून, प्रशासकीय, आर्थिक अडचणी दूर करुन कामाला सुरुवात केली. प्रत्येक गोष्टीत काटकसर करून त्यांनी कमीतकमी खर्चात दर्जेदार वास्तु उभी केली. खाली सभागृह वरच्या मजल्यावर दहा खोल्या व इतर सुविधा निर्माण केल्या आहेत. अत्यंत प्रशस्त आणि देखणी वास्तू शहराच्या वैभवात भर ठरणारी आहे. ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात येऊन स्थिरावलेल्या लोकांनी



मागे राहिलेल्या लोकांना आपल्या बरोबर आणण्यासाठी प्रयत्न करावा, त्यासाठी हे कार्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक प्रगतीचे प्रेरणा केंद्र ठरावे अशी अपेक्षा भास्कर मुंडे यांची आहे.

आर्थिक, राजकीय, प्रशासकीय पातळीवर मोठे असणाऱ्यांची समाजात कमी नाही. मात्र परिस्थितीमुळे मागे राहिलेलेही पुढे आले पाहिजेत या भावनेने काम करणारे तसे विरळच. पण भास्कर मुंडे यांनी प्रतिकुल परिस्थितीची जाणीव ठेवून कायम अडचणीतील आणि धडपडणाऱ्या लोकांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच समाजात त्यांच्या बद्दलचा आदर आणि विश्वास अधिक आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी पंचवीस वर्षापूर्वी जागा देऊन सुरू केलेल्या सामाजिक कामाच्या इमारतीचा कळस भास्कर मुंडे यांनी चढवला. ही वास्तू समाजातील, वंचित, उपेक्षितांना दिशा देणारी आणि प्रगतीचे केंद्र ठरावी हीच अपेक्षा...



भास्कर मुंडे व त्यांचे संचालक मंडळ यांचे मनःपूर्वक अभिनंदन...

**वसंत मुंडे**
**प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई**

# भारत खरेच हिंदुराष्ट्र व्हावा काय ?

आधुनिक केसरी



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

**सनातन हिंदू धर्म आणि नंतर उगवलेले अन्य धर्म यातील मुलभूत फरक जेंव्हा अभ्यासला जाईल तेंव्हाच सनातन हिंदू धर्माला नावे ठेवणे, त्यावर टीका करणे थांबेल. या वेगवान विज्ञान युगात कोणालाच सर्वंकष अभ्यास करण्याची, खोलात किंवा मुळात जाऊन त्यावर शास्त्रशुद्ध विवेचन करण्याची ईच्छाच राहीली नाही. चमत्काराशिवाय नमस्कार नाही हेच खरे. त्यामुळे हिंदू देवतांनी वेळोवेळी दाखवलेले चमत्कार आज योगायोग समजले जातात. जसे की ज्ञानवापी मंदिरात सर्वे करताना नेमके सोमवारीच शिवलिंग सापडणे. हिंदू धर्मात सोमवार हा महादेवाचा, शिवशंकराचा, भोलेबाबाचा, सांबसदाशिवाचा वार समजला जातो. त्या दिवशी आवर्जून शिवभक्त पूजाअर्चा, अभिषेक वगैरे करतात. मंगळवारी कांही भागात देवीची उपासना करतात काही भागात गणपतीचा वार समजला जातो. बुधवारी विठ्ठल रुक्मिणी आणि गुरूवारी दत्त महाराज आणि दत्त संप्रदायातील सर्व अवतार, संत महात्मे यांची उपासना, पूजा, उपवास करतात. शुक्रवारी बालाजी राया, विष्णू भगवंताचे सर्व अवतार पूजले जातात तसेच अनेक ठिकाणी देवीची उपासना केली जाते. शनिवारी मारोती राया, म्हणजे हनुमान, शनी देव आणि नवग्रह पूजले जातात आणि रविवारी सुर्यनारायणाची पूजा करतात.**

प्रत्येक हिंदू कुटूंबात कुलदैवत तथा कुलदेवता असतात. बऱ्याच कुटुंबांना हे माहीतच नाही की आपले कुलदेव कोण आणि कुलदेवी कोण? प्रत्येक घराण्याची एक उपास्य देवी असते. माहूरगड ची रेणुकामाता आणि तिची विविध रूपे किंवा अवतार. जसे सौदंतीची कर्नाटकातील देवी, यमाई, यल्लम्मा, मोहटा वगैरे. तुळजापूरची तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी अंबाबाई आणि वणिची सप्तशृंगीदेवी. हि साडेतीन पीठे आहेत देवींची. आणि यांपैकी एक आपली कुलदेवता असते. ती आपल्या कुळाचे रक्षण करते. घरात कोणतेही मंगलकार्य ठरले की सर्व प्रथम कुलदेवीला निमंत्रण देऊन कार्य निर्विघ्न पार पडू दे अशी विनवणी, प्रार्थना करण्याची पध्दत आपल्या कडे रूढ आहे. कार्य पार पडल्यानंतर ही दर्शनाला सहकुटुंब सहपरिवार जाऊन दर्शन घेऊन, अभिषेक पूजा करून आभार मानायचे असतात आणि घरात नवीन येणाऱ्या पाहूणीची, पाहूण्याची ओळख करून देत असतात. जागरण गोंधळ घालून शुभाशिर्वाद मिळवले जातात. तसेच अगदी कुल देवाचे बाबतही असते.

खंडोबा, महादेव/ शिव, बालाजी/ व्यंकटेश, विष्णुचे सगळे अवतार हे कुलदेव असतात. नित्यनेमाने कुलदेव आणि कुलदेवीची घरोघर पूजा होणे अपेक्षित असते. स्त्री दैवत आणि पुरूष दैवत याबाबत खरे तर पिढी दर पिढी आईवडिलांनी आपल्या मुलांना निट समजावून सांगायला हवे. नेमके हेच घडत नाही आणि त्यामुळेच सनातन धर्मावर अनेक आघात होत आहेत, प्रथा मोडकळीला आणल्या जात आहेत. थोतांड किंवा बुरसटलेले विचार म्हणून हिणवले जाते. पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करत आपल्या रितीरिवाजांचे पावित्र्य, त्यामागील प्रेरणा तथा वैज्ञानिक संदर्भ यांना तिलांजली दिली जात आहे.



मनुस्मृती म्हणून हिणवताना जातीपातींचे चूकीचे अर्थ पसरवले जात आहेत.

देवांची संख्या, उपासना पध्दती, तसेच येणारे बरेवाईट अनुभव आणि त्यांचे आपल्या सोयीनुसार अर्थ लावायची लागलेली सवय याला कारणीभूत आहे. जर नंतरच्या पिढीला शास्त्रोक्त पध्दतीने परंपरांचे, मंत्रांचे, उपासनेचे, पूजेचे महत्व आणि गरज समजावले तर वाद होणारच नाहीत. दैनंदिन जीवनात राजकारणाची आणि राजकारण्यांची ढवळाढवळ येवढी वाढली आहे की धर्मा पेक्षा वैयक्तिक जातींचे महत्व आणि अवडंबर वाढले आहे. नित्यनेमाने देव पूजा करणारा किंवा सोमवती अमावस्येला आवर्जून खंडोबाचे दर्शनाला जाणारा ही जाहीर रित्या अंधश्रद्धेवर, अंधविश्वासावर टीका करतो. हे मान्यच आहे की घरातील देवघरापूरतेच आपले देव पूजन सीमित असावे त्याचा उदोउदो किंवा प्रदर्शन गरजेचे नाही. परंतू घरात देव मानत असताना, मनोभावे पूजा करूनच घराबाहेर पाऊल टाकण्याचा शिरस्ता जपताना समाजात वावरताना जाहीररित्या धर्मावर किंवा पूजेवर टीका करणे बरोबर नाही. माझ्या माहितीतले एक मोठे वकील आहेत. मी त्यांना भाऊजी म्हणत असे, कारण ते माझ्या मित्राचे मेव्हणे आहेत. ते समाजवादी विचारसरणीचे आहेत. जानवे तोडा, बामणी प्रथा बंद करा. देव सगळे पाण्यात बुडवा. असे सतत भाषणे ठोकत असतात.

नानासाहेब गोरे, एस एम जोशी, जॉर्ज फर्नांडिस, यांचे शिष्य म्हणवत असत स्वतः ला. मी त्यांना नेहमी म्हणायचा भाऊजी तुम्ही वकील आहात म्हणजे सुशिक्षित आहात. कशाला या मोठ्या लोकांची नावे बदनाम करता. आहो ना. ग. गोरे, एस एम जोशी, पु. ल. देशपांडे ही सर्व ब्राम्हण मंडळी आहेत. थोर विचारवंत आणि समाज सुधारक आहेत त्यांची शिकवण, विचारसरणी, जीवनोद्देश, निट शिका समजून घ्या. पण एकदा अचानक त्यांचे घरी गेलो तर त्यांचे खुर्चीचे मागे भिंतीवर देवघर, त्यात सुबक गणेशाची आणि माता सरस्वतीची मुर्ती ठेवलेली, हार घातलेले, अगरबत्ती लावलेली, मी अवाक झालो. म्हणालो आहो भाऊजी मी हे काय पाहतोय. तुम्ही तर देव बुडवा म्हणता, पूजा अर्चा झूट आहे, दांभिकपणाचे लक्षण आहे म्हणून जोरजोरात भाषणं ठोकता आणि तुमचेच घरी हे सगळे तर आहे. ते म्हणाले अरे बायको समोर नाही चालत बाबा. तीच्या साठी आणि घरात शांतता, समृध्दी नांदावी म्हणून हे करावे लागते.

मी हसून म्हणालो मग मुलाची मौंज कधी करताय? आतून ताई आली म्हणाली बरे झाले तूच विषय काढलास ते. पुढच्या महिन्यातील तारीख कोणती चांगली आहे उपनयन संस्काराला ते बघ बरं. भाऊजी म्हणाले अगं त्याला काय विचारतेस मी गुरूजींकडे जाऊन योग्य तारखांचे पर्याय लिहून आणलेत. हे असे दांभिक लोक घरात एक बाहेर एक वागतात. आणि मग पुढच्या पिढ्यांसमोर चूकीचे उदाहरणं ठेवतात. म्हणून हिंदू धर्म बदनाम होतो. भारतात असे असंख्य हिंदू आज नांदत आहेत, ज्यांना हे राम मंदिर, ज्ञान वापी मंदिर, श्रीकृष्ण मंदिर, वृंदावन, मथुरा हे अनावश्यक वाद वाटतात. नरेंद्र मोदी सरकार आणि आरएसएस विनाकारण हे वाद काढून हिंदू मुस्लिम वादाला फोडणी देत आहेत असे यांचे मत आहे. पण ते हे फक्त हिंदूंनाच सुनावतात. यांचे मुसलमानांना कांहीच म्हणने नसते. जर हे काही काढू नये असे वाटत असेल तर मग आभ्यासक्रमातून इतिहास हा विषयच रद्द करावा. चूकीचा इतिहास शिकवणे किंवा प्रसारित करणे, प्रकाशित करणे, जनमनावर बिंबवणे हा ही गंभीर गुन्हा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे, महाराणा प्रताप, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, पराक्रमी पेशवे, ज्योतिबा फूले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे महाराज, संत तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज, अन्य असंख्य संत महंत, महात्मे शिकवा, मोगलांचे उदात्तीकरण, पराक्रम, यांचेच प्रदर्शन का, गेली सत्तर वर्षे खोटा इतिहास शिकल्या मुळे, आणि कांही अग्रणी राजकीय नेत्यांच्या अगोचरपणा मुळे छत्रपतींना फक्त मराठ्यांचे नेते म्हणताना दादोजी कोंडदेव, समर्थ रामदास यांचे योगदान नाकारून जातीभेद उत्पन्न करणे गैर आहे. हे जे तथाकथित पुरोगामी, बुध्दीजीवी, विरोधक आहेत नां ते फक्त स्वतः पुरताच विचार करतात. नंतरच्या पिढीच्या सुरक्षिततेचे यांना काहीच देणेघेणे नसते.

या उलट मुसलमान संघटितपणे आपला विस्तार, कट्टरतावाद, धार्मिक प्रपोगंडा राबवत आहेत. आक्रमक होत आहेत. कोठेही विस टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या यांची झाली की स्वतंत्र राज्य मागत आहेत. दहशत पसरवून आपला विस्तार करत आहेत आणि खोटे पुरोगामी, दांभिक बुध्दिवादी हिंदूंनाच शिकवत आहेत. हीच वेळ आहे हाच योग्य काळ आहे. भारतभूमीवरिल सर्व मुस्लिम अतिक्रमणे, मंदिरांचा केलेला विध्वंस, हिंदू संस्कृतीचे वैभव पुन्हा व्यवहारात आणने ही कामे झालीच पाहीजेत. संघटीत हिंदू, संयमी परंतू आक्रमक हिंदूच हे करू शकतो. कोणत्याही मुस्लिम, ख्रिस्ती धर्मावर घाव न घालता जे आपले होते आहे, आणि तोडमोड करून अधिग्रहित केलेले आहे ते परत मिळवायलाच हवे. त्यासाठी कायदेशीर सनदशीर मार्गाने जायलाच हवे. भारतातला प्रत्येक मुसलमान हा कनव्हर्टेट आहे. शहाण्या मुसलमानांनी आपल्या पूर्वजांनी अन्याय्य पध्दतीने हिंदूंची मंदिरे, श्रध्दास्थाने उद्ध्वस्त केलेली आहेत, अतिक्रमण करून अधिग्रहित केलेली आहेत हे शांतपणे मान्य करून सौहार्दता टिकविण्यात मदत केली पाहीजे. हिंदू कर्तव्ये पार पाडतात, विविध कर भरतात, देशाच्या अर्थव्यवस्थेला आपला हातभार लावतात आणि उलट मुसलमान फूकट सर्व लाभ घेतात, लुबाडतात हे कधीतरी बदलायलाच हवे नां. त्यामुळे आज भारतभूमीवरिल मुळ हिंदूंची असलेली ठिकाणे परत हिंदूंना बहाल करायला हवीत.



# पैनगंगेत अनुभवली पर्यटकांनी वैशाख पौर्णिमेची रात्र

## वाघासह विविध प्राण्यांचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** वन विविधतेने नटलेल्या पैनगंगा अभयारण्यात वैशाख पौर्णिमेच्या म्हणजेच बौद्ध पौर्णिमेच्या रात्री पर्यटकांनी एक वेगळी रात्र अनुभवली. गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेली प्राणी गणना कोरोनानंतर यावर्षी प्रथमच करण्यात आली. साडेतीनशे किमीमध्ये पसरलेल्या पैनगंगा अभयारण्यात प्राणी गणणेसाठी एकूण 7 मचाणी उभारण्यात आल्या होत्या. अभयारण्यातील पाणवठ्याजवळ ह्या मचाणी होत्या.

वैशाख पौर्णिमेची रात्र म्हणजे वर्षातील सर्वात मोठी प्रखर प्रकाश देणारी रात्र. त्यामुळे याच दिवशी वनविभागातर्फे प्राणी गणना केली जाते. या प्राणी गणनेमध्ये पर्यटकांना सुद्धा सहभागी होता येते. पैनगंगा अभयारण्यातील या प्राणी गणणेमध्ये पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि वनविभागाने सुद्धा त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करून वन्य प्राणी व वनस्पतीची माहिती दिली. रात्रीच्या वेळी पाणवठ्यावर पर्यटकांना वेगवेगळ्या जंगली प्राण्यांचे दर्शन झाले. यामध्ये प्रामुख्याने बिबटे, अस्वल, रान डुकर, नीलगाय, मोर इत्यादी प्राणी होते. सध्या पैनगंगा अभयारन्य विविध प्राण्यांनी व वनस्पतीनी नटलेली असून इथे जंगल सफारी सुद्धा सुरू करण्यात आलेली आहे आणि याचा पर्यटक पुरेपूर फायदा सुद्धा घेत आहेत. रात्रीच्या वेळी विविध पक्षांचे आवाज व प्राण्यांच्या हालचालींनी पर्यटकांची जंगली प्राणी पाहण्याची हौस पूर्ण झाली. यावेळी कर्तव्यावर असलेल्या व कर्मचाऱ्यांनी सुद्धा पर्यटकांना पूर्ण सहकार्य केल्याचे पर्यटकांनी सांगितले.

# जावयाचा सासऱ्यावर कोयत्याने हल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**आष्टी ता. परतूर :** पत्नीला नांदायला पाठवत नाही म्हणून जावयाने सासऱ्यावर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना आष्टी येथील पोलीस ठाण्यासमोर शुक्रवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. यात सासरा मुक्तीराम आबाजी इंगोले रा.गोळेगाव तालुका परतुर जिल्हा जालना हे गंभीर जखमी झाले आहेत.

मुक्तीराम इंगोले यांच्या मुलीचा विवाह गेवराई तालुक्यातील काठोडा येथील नागोराव पवार यांच्या सोबत झालेला आहे. त्यांच्यात नेहमीच किरकोळ वाद होत असल्यामुळे इंगोले यांची मुलगी माहेरी आली होती. वादामुळे ते मुलीला पाठवत नव्हते. शुक्रवारी आष्टी येथील आठवडी बाजार होता. त्यामुळे मुक्तीराम इंगोले हे बाजारात आले होते. जावई नागोराव पवार हा त्यांचा पाठलाग करीत दुपारी दोन वाजेच्या सुमारास आष्टी पोलीस ठाण्यासमोर आल्यावर जावई पवार यांनी पाठीमागून इंगोले यांच्या डोक्यात व पाठीवर कोयत्याने वार केला.



यावेळी सपो उपनी बि.एस. जाधव घटनास्थळी पोहोचले आणि आरोपीला ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. मुक्तीराम इंगोले यांची प्रकृती चिंताजनक असून उपचारासाठी त्यांना जालना येथे हलविण्यात आल्याची माहिती सपोनि शिवाजी नागवे यांनी दिली.

# हिवरा पिंपरखेड सोसायटीच्या चेअरमनपदी रामेश्वर चव्हाण यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** तालुक्यातील हिवरा, पिंपरखेड, भोजेवाडी, कुंभारवाडी, कन्हेरवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी सुरेश धस यांचे कट्टर समर्थक रामेश्वर चव्हाण यांची आज दि.20 रोजी बिनविरोध निवड करण्यात आली.

23 एप्रिल रोजी पार पडलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे समर्थकांनी एकहाती विजय मिळवला होता. यामध्ये गव्हाणे अरुण कारभारी, चव्हाण अशोक मारुती, चव्हाण जयसिंग रामराव, चव्हाण भास्कर भगवान, चव्हाण रामेश्वर श्रीपती, पारखे देवकी बाबा, लगड वल्लभ विनायक, वामन चंद्रभान उत्तम, लगड छायाबाई अशोक, लगड सुमनबाई मुरलीधर, वाळके ज्ञानदेव श्रीपती, काळपुंड रमेश नारायण हे विजयी झाले होते. आज दि. 20 रोजी आमदार सुरेश धस यांचे कट्टर समर्थक तसेच सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे शांत संयमी स्वभावाचे दादेगाव गणप्रमुख म्हणून काम करणारे रामेश्वर चव्हाण यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

# आयेशा फारूकीचे एमबीबीएस परीक्षेत सुयश

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** शहरातील आझाद उर्दू हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य फारुकी मोहम्मद इद्रिस शेख हसन यांची कन्या आयेशा तझीन मोहम्मद इद्रिस हिने एमबीबीएसच्या अंतिम वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले असून मुस्लिम समाजामधून आष्टी शहरातून प्रथमच एमबीबीएस करणारी आयेशा ही पहिली मानकरी ठरली आहे. ग्रामीण भागात राहुनही उच्च शिक्षण घेता येते हे आयेशाने दाखवून दिले आहे. डॉ.आयेशाने नीटमध्ये घवघवीत यश संपादन करून औरंगाबादनजीक असलेल्या बदनापूर येथील मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले आहे. जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास या जोरावर तिने यश मिळवले



असून आष्टी तालुक्याचे नाव मोठे केले आहे. भविष्यामध्ये उच्च शिक्षण म्हणजेच एमडी पदवी प्राप्त करून रुग्णांची सेवा करण्याचा मानस डॉक्टर आयेशा फारूकी यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

तिच्या या यशाबद्दल माजी शिक्षण सभापती मिर्झा नियामत बेग, नगरसेवक अस्लम बेग, महात्मा गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद पठाण, मुख्याध्यापिका शेख नसरीन हारून, प्रा.मोहसिन चाऊस सय्यद शफी, सायकड संतोष, पोकळे हनुमंत, संदेश जगताप, सय्यद अझीम, तकी आदी शिक्षकांनी अभिनंदन केले आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# खून प्रकरणी धुळे येथे दोघांना घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शुक्रवारी अंबिका नगरात हातपाय बांधून इसमाला केलेल्या बेदम मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी चाळीसगावरोड पोलिसात तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला तर पोलिसांनी यातील दोघांना रात्रीच अटकही केली आहे.

मुस्लिम नगरात रहाणारा जावेदअली शौकतअली सय्यद या ३६ वर्षीय इसमाला काल सकाळी दहाच्या सुमारास जुनेद सलीम शेख, तौसिफ शाह ऊर्फ तौसिफ कपाशी, अजिज शाह व शोएब ऊर्फ बबल्या या तिघांनी सना स्कुल समोरील एका पत्री शेडमध्ये नेवून त्याचे हातपाय बांधले. त्यानंतर खाटेवर टाकून त्याला लाकडी दांडके व लोखंडी हत्याराने बेदम मारहाण केली. या मारहाणीत जावेदअली मरण पावला. मारहाणीचे कारण समजले नसले तरी याप्रकरणी भिकनअली सय्यद याने पोलिसात फिर्याद दिल्याने मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल झाला. घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, डीवायएसपी ईश्वर कातकाडे, चाळीसगावरोड पोलीस ठाण्याचे सपोनि. संदीप पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली तर या प्रकरणातील आरोपी जुनेद शेख आणि तौसिफ कपाशी या दोघांना रात्रीच पोलिसांनी ताब्यात घेतले. तपास सपोनि. संदीप पाटील करीत आहेत.



# अहिल्याबाई होळकर उत्सव समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त उत्सव समितीची परतूर विश्रामगृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीत अहिल्याबाई होळकर उत्सव समिती परतूर अध्यक्षपदी नामदेव गोरे, उपाध्यक्षपदी दत्ता कोल्हे तर सचिवपदी हनुमंत दवंडे यांची निवड करण्यात आली. अहिल्याबाई होळकर जयंतीच्या नियोजनासंदर्भात विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर जयंती सर्वधर्मीय व सर्वपक्षीय घेण्याचे निश्चित करण्यात आले. सर्व समाज बांधवांना जयंती उत्सव कार्यकारणीमध्ये सामाविष्ट करून घेऊन जयंती उत्सव बहुजन प्रबोधनपर कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे. राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने 31 मे रोजी समाज बांधव अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यासाठी चौंडी येथे जात असतात. त्यामुळे परतूर येथे 3 जून रोजी कार्यक्रम घेण्यात येणार आहे. भव्य दिव्य अशी मिरवणूक परतूर रेल्वे गेट ते परतूर तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे व शेवटी समारोप तहसील कार्यालयासमोर होईल, असे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

या बैठकीला हारेराम माने, शिवाजीराव भालेकर, शिवाजीराव तरवटे, रासपा नेते सोपान गोरे, बाबुराव गोसावी, विष्णू गुंजाळ, नारायणगाव भिसे, रमेशराव आढाव, हरणाजी आढाव, विष्णू पितळे, नारायण काळदाते, राम दुगाने, उद्धवराव शेंडगे, बाबासाहेब आढाव, प्रकाश दिवटे, गणेश डुकरे, महेश हिंगे, तात्याराव धोत्रे, विलास रोकडे, प्रमोद पिसाळ, अक्षय आढाव, कृष्णा गायकवाड, ज्ञानोबा बोराटे, विलास तरवटे, मंगेश आढाव, शंकर भालेकर, महादेव गायकवाड, जीवनर रेगले, दादाराव बकाल, भारत मोगरे आदींची उपस्थिती होती.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY



MAHAVIR
GHAR SANSAR

- Wholesale & Retail
- Kirana, Dry Fruits, Spices
- Crockery, Home Appliances
- Home Cleaning Material, Steel & Aluminium
- Plastic Items & Many More

Sumit 7620111118
Rajesh Jain 7588348738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad

# रवळा ते जामठी रस्त्याची झाली अक्षरश: चाळणी

## जि.प. बांधकाम विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष; तत्काळ काम चालू करा; संभाजी पवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील रवळा येथील रवळा ते जामठी या रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस खराब होत चालली असुन, राजकीय नेते व संबंधित विभागाकडून दुर्लक्ष झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले असुन, पावसाळ्या पुर्वीच रसत्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी संभाजी पवार (सामाजिक कार्यकर्ते) रवळा ता सोयगाव यांनी केली आहे.

हाच रस्ता पुढे रवळा, जवळा, जामठी, तोंडापूर, फर्दापूर व सोयगाव जाण्यासाठी हा रस्ता एकमेव पर्याय आहे. रस्त्याने रवळा ते जामठीकडे जाणाऱ्या चार किलोमीटर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून रस्ता शेवटचा श्वास घेत आहे. ठिकठिकाणी आर्धा फुटांपर्यंत जागोजागी खड्डे पडले आहेत. मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्यांमधे पाणी साचले होते. अनेक ठिकाणी खड़ी बाहेर उघडली पडली. यामुळे वाहन चालकांना जीव मुठीत धरून वाहन चालावे लागत आहे. विषेश म्हणजे या रस्त्यावर सोयगाव व औरंगाबाद येथे रोजच ग्रामस्थांना विविध कामासाठी जावे लागते आणि या रस्त्यावरून फर्दापूर, सोयगाव येथे शाळा, कॉलेज व शासकीय कामे असल्याने मोठी रहदारी सुरुच असते, नेतेमंडळी रवळा गावात फक्त विलेक्षण पुरते येतात. नंतर पाच वर्षे या ग्रामीण भागातील गावाकडे फिरकत शुद्धा नाही.

हाच रस्ता पुढे मार्गाने तोंडापूर फर्दापूर ते औरंगाबाद - जळगाव रस्त्यावर जुळतो म्हणून रहदारी मोठ्या प्रमाणात सुरु असते. रस्त्यावर खड्डेच खड्डे झाल्याने वाहन धारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. वाहनधारकासह नागरिक यांना त्रास सहन करावा लागत आहे. त्याकाळ रवळा ते जामठी या रस्त्याचे काम चालू करावे अन्यथा अंदोलन करण्यात येईल, अशा इशारा सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार व नागरिकांनी यांनी दिला आहे.

**“अतिवृष्टीमुळे सततच्या पावसामुळे या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने पाणी साचले होते. पाऊस उघडल्यानंतर या रस्त्याचे काम होईल असे परिसरातील वाहनधारक व नागरिकांना यंदा रस्त्याचे काम होईल अशी अपेक्षा होती. मात्र पत्रकारांच्या बातम्यांना सार्वजनिक बांधकाम खाते केराची टोपली समजतात असे चित्र दिसून येत आहे. संबंधित विभाग, नेते व पुढाऱ्याचे दुर्लक्ष रवळा ते जामठी या रस्त्याबाबत विविध पक्षांच्या राजकीय नेते मंडळी तसेच संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लांबणीवर गेल्याने पुढाऱ्यांचे तसेच संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे नागरिकांकडून चर्चा होत आहे.**

**मो.आरिफ मो.लुखमान**
**उपसरपंच सावळदबारा ता सोयगाव**





# बाजारीकरण आणि खासगीकरण यांना नवीन शैक्षणिक धोरण रोखू शकेल? : डॉ. निर्मला जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** खालावलेली शैक्षणिक गुणवत्ता, बेरोजगारी, शिक्षणाचे वाढते बाजारीकरण आणि खाजगीकरण यांना नवीन शैक्षणिक धोरण २०२० रोखू शकेल काय? असे प्रतिपादन डॉ.निर्मला जाधव केले आहे. औरंगाबादच्या होल्डिंग हँडस बहुउद्देशिय संस्थेने नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात त्या बोलत होत्या.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची ओळख करुन देताना डॉ.निर्मला जाधव यांनी नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची मुख्य वैशिष्ठ्ये सांगितली. पारंपारिक १०+२ हे प्रारुप जावून ५+३+३+३+४ हा नवीन बदल शालेय शिक्षणामध्ये आणला जाईल. यातून कोचिंग क्लासेसच्या बाजरिकरणाला व बोर्डांच्या परिक्षा आणि गुणांना दिले जाणारे अवास्तव महत्व व यामुळे विद्यार्थांवरील वाढता ताण याला आळा बसेल असे नमुद करण्यात आले आहे. तसेच पूर्व प्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणाचा भाग बनवण्यात येवून घोकंमपट्टी ऐवजी मुलांना खेळ, गाणी, चित्र अश्या वेगवेगळ्या आनंददायी मार्गातून शिक्षण देण्याचे उद्दिष्ट या धोरणात नमूद करण्यात आलेले आहे. त्याच सोबत शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर कौशल्याधारित शिक्षणाचा समावेश करुन शालेय स्तरातंच इंटरनशिपची संकल्पना समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण आणि व्यावहारिक उपयोगिता याची सांगड घातली जाईल असे यात नमुद केले गेले आहे. त्यासोबत MULTIPLE ENTRIES AND MULTIPLE EXITS या नुसार विद्यार्थी कधीही शिक्षणामधून ब्रेक घेवून परत हवं तेंव्हा पुन्हा प्रवेश घेवू शकतात व ACADEMIC BANK OF CREDITS या संकल्पनेनुसार विद्यार्थ्याने एक वर्ष पूर्ण केले तर सर्टिफिकेट, दोन वर्ष पूर्ण केले असेल तर डिप्लोमा, तीन वर्ष पूर्ण केले तर पदवी व चार वर्ष पूर्ण केले तर संशोधनसहित पदवी प्राप्त होइल. एम. फिल हा पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणात बंद करण्यात आलेला आहे. तसेच मातृभाषेतून शालेय शिक्षण, शालेय शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर संस्कृत भाषेचा उपलब्ध पर्याय, पारंपरिक ज्ञानशाखांऐवजी MULTIDISCIPLINARITY म्हणजे बहुज्ञानशाखीयता, ऑनलाईन ओपन लर्निंग व महाविद्यालये व विद्यापिठांच्या स्वायत्ततेला या धोरणामध्ये बढावा देण्यात आलेला आहे. तसेच स्कुल क्लस्टर/ कॉम्प्लेक्स, UGC या संस्थेऐवजी HIGHER EDUCATION COUNCIL OF INDIA आणि तिच्या नियंत्रणाखालील इतर चार संस्था, राष्ट्रीय संशोधन संस्था, GDP च्या ६% शिक्षणावरील नियोजित खर्च ही काही महत्वपूर्ण वैशिष्ट्ये नमुद केली. अशाप्रकारे कागदावर अनेक महत्त्वपूर्ण बदल सुचविणारे प्रत्याक्षात कसे कार्यान्वित केले जाते व खालावलेली शैक्षणिक गुणवात्ता, बेरोजगारी, शिक्षणाचे वाढते बाजारिकरण आणि खाजगीकरण नवीन शैक्षणिक धोरण २०२० रोखू शकते काय हे खरे आव्हान असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सावित्री बाई फुले स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका प्रा. डॉ. निर्मला जाधव यांनी होल्डिंग हँडस बहुउद्देशिय संस्थेने आयोजित केलेल्या परिसंवादात प्रतिपादन केले.

सुरेश सिरसीकर संस्थापक अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशिय ही राज्यभरात व राज्याच्या बाहेर ही आरोग्य शिक्षण पर्यावरण सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम राबवित असते. तसेच अनेक सामाजिक विषयावर व मानव निगडित समस्येवर परिसंवाद घेत असते. होल्डिंग हँड्स च्या महाराष्ट्र राज्य शिक्षण प्रमुख सुरेखा कलबुर्गे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. तर उपाध्यक्ष रवींद्र बनकर यांनी प्रास्तविक केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, अण्णा वैद्य, योगेश खोसरे, भगवान वाघ, विवेक याद्री, किरण वनगुजर, अजय जोशी, प्रतिभा शर्मा, प्राची सिरसीकर, मंजुषा राजेभोसले, केदार अनमोले, ज्योती अनमोले, अनिकेत कुहिरे, आदिती देशमुख इत्यादी उपस्थित होते.

# मान्सूनपुर्व नालेसफाई तत्काळ सुरु करा अन्यथा नाल्यातील कचरा मनपा कार्यालयात टाकू

## प्रहार जनशक्ती पक्षाचा निवेदनाद्वारे इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** मान्सून अवघ्या १० दिवसांवर येऊन ठेपला असतानाही परभणी शहर महानगरपालिका प्रशासन कुंभकर्णाच्या झोपेत असून अद्यापही परभणी शहरातील मुख्य नाले व इतर नाल्यांची सफाई करण्यात आलेली नाही. दरवर्षी ही नालेसफाई मे महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये सुरु होऊन मे महिन्याच्या तिसऱ्या आठवडयापर्यंत संपते परंतु यावर्षी मे महिना संपत आला तरीही परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीने अद्यापही शहराची नालेसफाई झालेली नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.

परभणी शहरातील नाल्यांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की थोडा देखील पाऊस पडला तर नाल्यातील पाणी रस्त्यांवर वाहू लागते. मागील वर्षी नालेसफाई व्यवस्थित न झाल्यानेच परभणी शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या होत्या. आज रोजी शहरातील सर्वच प्रमुख नाल्यांमध्ये पाच फुटापर्यंत झाडे व वेली उगवली असून प्लास्टिक व इतर कचऱ्यांनी नाले तुडुंब भरून गेलेले आहेत अश्या अवस्थेत शहरात एखादा मोठा पाऊस झाला तर शहराला गटाराचे स्वरूप येईल.

मागील वर्षी तुंबलेल्या नाल्या व वस्त्यात शिरलेले पाणी या घटनांमधून परभणी शहर महानगरपालिका प्रशासन कुठलाच धडा घेणार नसेल व वारंवार विनंत्या करुनही शहरातील नालीसफाई होत नाही. परभणी शहर महानगरपालिका आपली जबाबदारी पार पाडत नाही म्हणून आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख या नात्याने परभणी शहर महानगरपालिका प्रशासनास तात्काळ सूचना देऊन शहरातील नालेसफाई तात्काळ सुरु करावी अशी निवेदनाद्वारे विनंती करण्यात आले आहे.

परभणी शहर महानगरपालिका प्रशासन शहरातील नालेसफाई करण्यास दिरंगाई करणार असेल तर प्रहार जनशक्ती पक्ष परभणीच्या वतीने शहरातील नाल्यांमधील गाळ काढून तो गाळ परभणी शहर महानगरपालिका कार्यालयात आणून टाकला जाईल व यावेळी उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या बाबत निर्माण होणाऱ्या प्रश्नासाठी आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका जबाबदार असतील असे ही या निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, युवा आघाडी जिल्हा प्रमुख गजानन चोपडे, शहर चिटणीस वैभव संघई, सर्कल प्रमुख श्याम भोंग, धर्मेंद्र तूपसमिद्रे, शेख बशीर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# मोटार सायकलच्या धडकेत महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराजवळील मुंबई - आग्रा महामार्गावरील रोकडोबा हनुमान मंदिराच्या पुढे भरधाव टॅम्पोने मोटरसायकलच्या साईड मिररला धक्का मारल्याने चालकाचा तोल जावून मोटरसायकल डिव्हायरडवर आदळून झालेल्या अपघातात तिघे जखमी होवून महिला ठार झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत धुळे तालुका पोलिस ठाण्यात बन्सी दयाराम परदेशी रा. बायगांव मालेगाव कॅम्प रस्ता, मालेगाव यांनी फिर्याद दिली. त्यानुसार दि.२० मे रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बन्सी परदेशी आणि त्यांचा मुलगा कृष्णा बन्सी परदेशी तसेच सुन डिंपल कृष्णा परदेशी हे तिघे जण म्हसावद ता. एरडोल येथून मालेगावच्या दिशेने मोटरसायकल क्र. एमएच ४१ एक्यु २४९४ हिच्याने जात होते. महामार्गावर रोकडोबा हनुमान मंदिराच्या पुढे एका भरधाव टॅम्पो वाहनाने जवळून जाताना मोटरसायकलच्या साईड मिररला धक्का दिला.

यात मोटरसायकलचा तोल जावून रस्त्याच्या दुभाजकावर आदळली. त्यामुळे कृष्णा परदेशी बन्सी परदेशी आणि सुन डिंपल कृष्णा परदेशी हे तिघे जबर जखमी झाले तिघांना धुळे जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डिंपल परदेशी हिचा मृत्यू झाला. याप्रकरणी धडक देणाऱ्या अनोळखी टेम्पो चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in